The Department of Public Instruction, Bombay.

MARATHI THIRD BOOK.

BY

Major T. CANDY.

THE LATE MARÁTHÍ TRANSLATOR, E. D.

STEREOTYPED.

Nineth Edition.—40,000 COPIES.

Registered for copy-right under the Government of India's Act XXV of 1867.

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT

1885.

Pric[illegible] Annas.

BOMBAY:

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळांखातें.

मराठी तिसरें पुस्तक.

मेजर टी० क्यांडी-

माजी मराठी ट्र्यान्स्लेटर ए. डि.

ह्यांनीं केलें.

कायम ठशांनीं छापिलेली

आवृत्ति नववी—४०,००० प्रती.

मुंबई:

गवर्नमेंट सेंट्रल बुक्‌डीपो.

सन १८८५ इसवी.

किंमत साडेचार आणे

मुंबई.
" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलें.

तिसऱ्या पुस्तकाची अनुक्रमणिका.

धडा.	गोष्ट.	पृष्ठ.
१	खरा व्यापारी.	१
२	आंधळा मुलगा.	२
३	घड्याळ.	३
४	दालचिनीचें झाड.	४
५	माझें नांव काय.	६
६	म्हातारा मनुष्य आणि त्याचा बैल.	८
७	कविता. परमेश्वराची प्रार्थना.	९
८	मेंढरूं आणि बकरें. भाग १	१०
९	भाग २	१२
१०	भाग ३	१४
११	भाग ४	१६
१२	लवंग आणि वेलदोडा.	१८
१३	उंदीर आणि अंडीं.	२०
१४	बहिरी आणि मुकी आई.	२०
१५	भाकर.	२२
१६	जायफळ.	२३
१७	कविता. मुलांस उपदेश.	२५
१८	उत्तर अमेरिकेंतील इंदियन व चोरीस गेलेलें मांस.	२६
१९	बदाम.	२७
२०	अक्रोड.	२८
२१	केशर. चंदन	३०

अंक.	गोष्ट.	पृष्ठ.
२२	मानुषी कुटुंब....................	३२
२३	न्याय करण्याचें चातुर्य............	३४
२४	प्रामाणिकपणा आणि सत्य ह्यांचीं उदाहरणें...	३५
२५	कविता. ईश्वराचें महत्व.	३६
२६	पापाची वासना मोडणें.	३७
२७	मनुष्य जातीचे प्राणी—इंद्रियें.	३९
२८	खरें बोलणारा मुलगा जार्ज वाशिंग्तन.....	४१
२९	फुटलेला आरसा.	४३
३०	चतरशिंगीची यात्रा................	४६
३१	झाडें, फुलें, आणि बीं.	४८
३२	कलमी आंबे....................	५१
३३	कविता. विद्येची प्रशंसा.	५४
३४	चांगली बुद्धि....................	५४
३५	दक्षिण महासागरांतील बेटांत राहणारा मनुष्य आणि बोलका ढलपा.	५७
३६	तारू........................	५९
३७	घर बांधणें.	६१
३८	पागोटें.	६३
३९	साखर.	६५
४०	कबूतर.	६६
४१	स्लेट........................	६८
४२	कविता. नीतिपर..................	७१
४३	राग घालविण्याचा उपाय.	७२

धडा.	गोष्ट.	पृष्ठ.
४४	मुंग्या आणि माश्या ह्यांची गोष्ट........	७२
४५	खोटें बोलणें....................	७५
४६	धोतरजोडा......................	७७
४७	गरीब मुलगा आणि धनवान् पुरुष.........	७९
४८	पाणपोई......................	८०
४९	भागीचा अर्धा वांटा..................	८२
५०	सुखी होण्याचा उपाय...............	८४
५१	कविता. नीतिपर...................	८६
५२	पैसा........................	८७
५३	अदलाबदल....................	८९
५४	व्यापार.......................	९०
५५	बाजार.......................	९२
५६	स्वच्छपणाविषयीं..................	९५
५७	सत्याविषयीं मुलांस वृद्ध मनुष्याचा उपदेश..	९७
५८	सर जमशेटजी जीजीभाई बारोनेत ह्यांचें संक्षिप्त वर्णन.....................	९९
५९	कविता. पद उपदेशपर................	१०४
६०	घोडा.......................	१०५
६१	गाढव.......................	१०८
६२	गाय बैल......................	१११
६३	म्हशी रेडे.....................	११४
६४	बकरें.......................	११६
६५	कुत्रा.......................	११९

धडा.	गोष्ट.	पृष्ठ.
६६	मांजर.	१२३
६७	उंट.	१२७
६८	कविता. मुलांस उपदेश.	१३०
२९	कविता. परस्पर प्रीति विषयीं उदाहरण.	१३१
७०	कविता. पद उपदेशपर.	१३२
७१	टिपण कवितांतील शब्दांवरील.........	१३३

तिसरें पुस्तक

धडा १.

खरा व्यापारी.

चीन देशांत कोणी एक व्यापारी प्रामाणिकपणा विषयीं प्रसिद्ध होता. त्याच्या घरीं एके दिवशीं दुसऱ्या गांवचा कोणी व्यापारी आला. तो त्या जवळ सुमारें दोन हजार रुपयांचे चांदीचे गट अनामत ठेवून परत आपल्या गांवीं गेला, आणि एकाएकीं कांहीं उपद्रव होऊन मरण पावला. पुढें तीन वर्षें पर्यंत त्या प्रामाणिक व्यापाऱ्यानें त्याची वाट पाहिली; परंतु तो कांहीं आला नाहीं; तेव्हां त्याला मोठा विचार पडला. मग त्यानें त्या गृहस्थाचा शोध काढण्याकरितां आपला चाकर त्याच्या गांवीं पाठविला.

चाकरानें त्याचा शोध लावून अशी खबर आणिली कीं, तो मरण पावला, आणि घरीं त्याची बायको व पंधरा सोळा वर्षांचा एक मुलगा आहे. तें ऐकून त्या व्यापाऱ्यानें त्या मुलास पत्र पाठवून आपल्या घरीं आणविलें; आणि त्याला ते चांदीचे गट दाखवून सांगितलें कीं, हें द्रव्य तुझें आहे, घेऊन जा. हें ऐकून तो मुलगा घाबरून त्या व्यापाऱ्याच्या तोंडाकडे पाहत स्तब्ध राहिला. तेव्हां त्या व्यापाऱ्यानें पूर्वींचें वर्तमान त्या मुलास सांगून तें द्रव्य त्याच्या स्वाधीन केलें.

पहा! त्याचा प्रामाणिकपणा त्यास कसा फळास आला कीं त्याचीं मुलें सद्गुणी आणि चतुर निघालीं. त्याच्या एका मुलास

चीन देशामध्यें मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं, आणि त्यानें तो कारभार मोठ्या दक्षतेनें चालविला. हल्लींही त्याचे नातू पणतू त्या देशांत मोठमोठीं सरकारी हुद्याचीं कामें करीत आहेत.

धडा २.

आंधळा मुलगा.

पहा, तो दरवाज्याजवळ आंधळा मुलगा उभा आहे. बापडा बिचारा, तो अगदींच आंधळा आहे. सूर्याचा मोठा प्रकाश पडला तरी तो त्याला दिसत नाहीं. पहा, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे कीं मुळींच प्रकाश नसून जी अवस्था सर्वांची व्हाव-याची, तीच अवस्था त्या बापड्यास प्राप्त झाली आहे.

त्याला कसें वाटतें हें जर तुम्हाला जाणावयाची इच्छा असेल, तर तुम्ही एका अंधारकोठडींत कोंडून घ्या, म्हणजे तेथें जोंपर्यंत तुम्ही असाल तोंपर्यंत जसें तुम्हाला वाटेल तसेंच त्याला वाटत असेल.


आमची दृष्टि शाबूत आहे, त्याच्या दृष्टीसारखी गेली नाहीं, हा देवाचा आम्हावर केवढा उपकार आहे बरें! चंद्र, सूर्य, तारे, हे आकाशांत चालतांना आम्ही पाहतों. कुरणांत किंवा माळावर गुरें मेंढरें चरतांना आम्ही पाहतों. कोंकरें, करडें उडतां बागड-तांना आम्ही पाहतों. गवत, धान्य हें जमिनीवर उगवतें, वाढतें; झाडें, झुडपें ह्यांस फुलें फळें येतात; हेंही आम्ही पाहतों. तसेंच पांखरें आकाशांत उडतात, व ह्या झाडावरून त्या झाडावर जातात, हें आम्ही पाहतों. आम्हांला पुस्तक वाचायास दिसतें, आणि नव्या नव्या चमत्कारिक गोष्टी आम्ही त्या वाचितों व

ऐकितों, त्यांतून कांहीं आमच्या दृष्टीस पडतात; परंतु त्या बिचाऱ्या आंधळ्या मुलास त्यांतलें कांहींच दिसत नाहीं.

जीं आईबापें व सोयरींधायरीं आम्हांवर ममता करितात त्यांस आम्ही पाहतों; त्या बिचाऱ्यास कोणी दिसत नाहीं. हाय हाय, दृष्टीवांचून असणें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे! एक दृष्टि नसल्यामुळें त्याला सगळें जग नाहींसारखें झालें ना! अरेरे गरीब बापडा! ह्यासारखा दुःखी कोणी नसेल; म्हणून आपण ह्या गरीब बिचाऱ्यावर दया करावी, हें योग्यच आहे.

धडा ३

घड्याळ.



हें चित्र घड्याळाचें आहे. घड्याळावर वर्तुलाकार तकट बसविलेलें आहे, त्यास तबकडी म्हणतात. तिजवर १ पासून १२ पर्यंत जे आंकडे मांडलेले आहेत, ते रोमन लोकांचे आंकडे आहेत. कोणाच्या साह्यावांचून आपणास घड्याळ पाहतां यावें म्हणून हे आंकडे ओळखायास सर्वांनीं शिकलें पाहिजे.

ह्या घड्याळांत एक लहान आणि एक मोठा असे दोन कांटे आहेत. एखाद्या घड्याळांत तिसरा लहान कांटा आंत असतो. लहान कांटा किती अवर म्हणजे तास झाले हें दाखवितो. आणि मोठा कांटा किती मिनिटें झालीं हें दाखवितो. अति लहान तिसरा कांटा असतो त्याचें चक्र निराळें असतें, व त्यांत सेकंदें समजतात.

ह्या चित्रांत अवर कांटा ९ ह्या आंकड्यावर आहे, आणि मिनित कांटा मिनितांच्या सहाव्या भागावर आहे, तेव्हां ९ वाजून सहा मिनिटें अधिक झालीं. घड्याळांत मांडलेले आंकडे आहेत ते ह्या खालीं लिहून त्यांच्या खालीं मराठी आंकडे मांडिले आहेत.

रोमनआंकडे	I,	II,	III,	IV,	V,	VI,	VII,	VIII,	IX,	X,	XI,	XII,
मराठीआंकडे	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२.

हे वरील आंकडे पाहून तुम्हांस घड्याळाचे आंकडे ओळखायास लवकर शिकलें पाहिजे. कित्येकांस घड्याळ पाहतां येत नाहीं, त्यांस वेळ समजायासाठीं लोकांचें आर्जव करावें लागतें, अशा हलक्या गोष्टींविषयीं अज्ञानी असावें हें फार लज्जेस कारण आहे.

धडा ४.

दालचिनीचें झाड.

सिंहलद्वीप, ज्यास हिंदु लोक लंका असें म्हणतात, ह्या बेटांत दालचिनीच्या झाडांची उत्पत्ति फार होते. तेथें ह्या झाडांचीं मोठमोठालीं अरण्यें आहेत, आणि लोकही ह्या


झाडांचे मळे लावितात. दालचिनीचें झाड तीन वर्षांचें झालें म्हणजे त्याची साल काढून उन्हांत वाळवितात; तिला दालचिनी असें म्हणतात. ह्या झाडांच्या मुळ्यांचें, व दालचिनीच्या फळांचें, तेल काढितात; परंतु फळांचें तेल चांगलें असतें. हें तेल थंड झालें म्हणजे मेणासारखें घट्ट होतें. पूर्वी ह्या तेलाच्या मेणबत्त्या ह्या बेटांतील राजाकरितां करीत असत.

हें बेट डच लोकांच्या स्वाधीन होतें तेव्हां ते लोक दालचिनीचा व्यापार इतर लोकांस करूं देत नसत. तिचा मक्ता आपण करून पाहिजे त्या दरानें विकीत असत. त्यांनीं असा बंदोबस्त ठेविला होता कीं, दालचिनीचा एखादा रोपा सहज कोणीं आपल्या बागेंत लाविला, तर त्यास मोठें शासन करीत. अशा व्यापारानें त्यांनीं पुष्कळ द्रव्य कमाविलें; परंतु अलीकडे हें द्वीप इंग्रज लोकांच्या हस्तगत झाल्यापासून दालचिनीचा व्यापार पाहिजे ते लोक करितात. सिंहलद्वीपांत हीं झाडें इतकीं आहेत कीं तेथील लोक जाळावयास देखील त्यांचीं लाकडें घेतात. हीं झाडें अलीकडे जमैका बेटांत लोक लावूं लागले आहेत.

दालचिनी मसाल्यांत फार घालतात, व ती औषधास उपयोगीं पडते. वातीचा किंवा पित्ताचा उपद्रव झाला असतां तिचा काढा करून घेतात. वाताची विकृति झाली असतां दालचिनीचा अर्क आंगाला चोळतात. असे ह्या झाडाचे अनेक उपयोग आहेत. दालचिनी सिंहलद्वीपांतून इतर ठिकाणीं जाते, आणि तीवर हजारों रुपयांचा व्यापार चालून लोकांची उपजीविका होते.

धडा ५.

माझें नांव काय?



मुला, मी कोण आहें, आणि माझें नांव काय, हें तुला ठाऊक आहे काय? मी पूर्व दिशेकडून येतों, आणि मी आलों कीं दिवस सुरू झाला. तुझी उठण्याची वेळ आली म्हणजे मी आपला सोन्यासारखा हात तुझ्या खिडकींतून आंत घालून तुला उठवितों. अंथरुणावर पडलेला न राहतां त्वां उठून स्नान करावें, पुस्तक वाचावें, शाळेंत जावें, म्हणून मी येतों.

मी मोठा चालणारा आहें. मी सगळ्या आभाळावरून एका दिवसांत वाट चालतों. मी कधीं थकत नाहीं, कधीं थांबत नाहीं. माझ्या मस्तकावर चकचकीत सोन्याचा मुकुट आहे, आणि मी त्याची प्रभा सर्वत्र पाडितों. झाडें, घरें, आणि पाणी, ह्या सर्वांवर मी प्रकाश पाडितों. ज्या ज्या वस्तूवर माझा प्रकाश पडतो ती ती वस्तू सुंदर आणि चकचकीत दिसते. मी तुला उजेड देतों, आणि ऊनही मीच तुला देतों. फळें आणि धान्यें हीं मीच पिकवितों. मी आभाळांत फारच उंच आहें. सर्व झाडांपेक्षा, डोंगरांपेक्षा, आणि ढगांपेक्षांही उंच आहें.

आतां मी आहें ह्याहून जर जवळ आलों तर तूं भाजून मरशील, आणि सर्व झाडें गवतें जळून जातील. कधीं कधीं मी आपला चकचकीत सोन्याचा मुकुट काढितों, आणि पातळ रुपेरी ढगांच्या शेल्यानें डोकें गुंडाळितों; अशा वेळेस तुझ्यानें मजकडे पाहवतें; परंतु जेव्हां माझ्या डोक्यावर मुकुट असतो, आणि दुपारच्या वेळेस मी आपल्या सगळ्या तेजानें प्रकाशतों, अशा वेळेस तुझ्यानें मजकडे पाहवत नाहीं; कांकीं, पाहिलें तर मी तुझ्या डोळ्यांस दिपवीन, आणि तुला आंधळें करीन. अशा वेळेस घारीच्यानें मात्र मजकडे पाहवतें. घारीच्यानें सर्वकाळ मजकडे टक लावून पाहवतें.

सकाळीं उठून मी दिवस करावयास निघणार, तेव्हां चंडोलपक्षी मला सामोरा यावयास आभाळांत उडतो, आणि सुंदर गायन करितो. आणि मी येत आहें हें सर्वांस सांगण्याकरितां कोंबडा मोठ्यानें आरवतो; परंतु घुबडें आणि पाकोळ्या मला पाहून भयानें उडून जातात, आणि झाडांच्या ढोलींत, व जुन्या भिंतींच्या फटींत जाऊन लपतात. आणि सिंह व वाघ हेंही मला पाहून आपल्या गुहांत जाऊन दिवसभर निजतात.

मी सर्व ठिकाणीं प्रकाशतों; हिंदुस्थानांत, अरबस्थानांत, इंग्लंदांत, व सर्व पृथ्वीवर प्रकाशतों. सर्व पृथ्वीवर जे सुंदर आणि तेजस्वी पदार्थ आहेत, त्या सर्वांहून मी सुंदर व तेजस्वी आहें. तर मुला, मी कोण आहें, आणि माझें नांव काय, हें सांग.

धडा ६.

म्हातारा मनुष्य आणि त्याचा बैल.

कोणी एक म्हातारा मनुष्य व त्याचा मुलगा असे दोघे आपला बैल बाजारांत विकण्याकरितां हांकून नेत असतां, रस्त्यावरील कोणी गृहस्थ बोलला, कायहो, हा मनुष्य केवढा मूर्ख आहे! आपल्या बैलास ओझें न व्हावें म्हणून आपण आपल्या मुलासहवर्तमान पायीं चालून पाय झिजवीत आहे! हें ऐकून म्हाताऱ्यानें आपल्या मुलास बैलावर बसविलें, आणि आपण बैल हांकीत त्याच्या मागें चालला.

दुसरा कोणी गृहस्थ त्या मुलाला म्हणतो, कायरे लुच्चा, बिचारा म्हातारा तुझा बाप पायीं चालत असतां त्वां बैलावर बसावें, हें चांगलें काय? हें ऐकतांच तो म्हातारा मुलास खालीं उतरून आपण वर बसला. तिसरा म्हणाला, पहाहो, बापडा लहान मुलगा चालतां चालतां थकला असतां हा आळशी थेरडा कसा मौजेनें बैलावर बसून चालला आहे! हें ऐकतांच म्हाताऱ्यानें आपला मुलगा आपल्या पाठीमागें बसवून घेतला.

चवथा म्हणाला, काय म्हातारे बाबा, हा बैल तुमचाच खुद्द आहे काय? म्हातारा म्हणाला, होय. त्या गृहस्थानें उत्तर केलें कीं, तुम्ही निर्दयपणानें हा असा लादला आहे ह्यावरून हा बैल तुमचा आहे असें कोणास वाटावयाचें नाहीं. त्यानें तुम्हां दोघांस वाहून न्यावें त्यापेक्षां तुम्हां दोघांच्यानें त्यास सहज वाहून नेववेल. म्हातारा म्हणाला, बरें तुमच्या मर्जीसाठीं तसें का होईना! असें म्हणून तो आणि त्याचा मुलगा हे उभयतां

खालीं उतरून त्या बैलाचे चान्ही पाय एकत्र बांधून, मध्यें वांसा घालून, त्यास खांद्यावर घेऊन ज्या पुलावरून शहरांत आण्याचा रस्ता होता, त्या पुलावरून घेऊन चालले.

ही इतकी चमत्कारिक गोष्ट झाली कीं ती पहावयास लोकांचे थव्यांचे थवे धांवले. शेवटीं धन्याचा अति कृपाळूपणा त्या बैलास न आवडून तो मोकळा होण्याकरितां आपले पाय झाडूं लागला असतां ज्या दोन्यांनीं त्याचे पाय बांधिले होते त्या दोन्या तुटून तो वांशापासून निसटला, आणि खालीं नदींत पडून बुडून मेला. बापडा म्हातारा! त्यानें ज्याला त्याला संतुष्ट करण्याकरितां जे प्रयत्न केले त्यांनीं कोणास संतोष तर झाला नाहीं, पण त्याला मात्र श्रम पडले; वरतां बैलही गेला; ह्यावरून तो फारच लाज आणि खेद पावून माघारा तडक आपल्या घराकडे चालता झाला.

धडा ७.

परमेश्वराची प्रार्थना.

श्लोक कामदाछंद.

भास[१] ही तुझी फार लागली ॥
दे दयानिधे[२] बुद्धि चांगली ॥
देऊं तूं नको दुष्ट[३] वासना[४] ॥
तूंच भांवरीं[५] माझिया मना ॥१॥
देह देउनी तूंच रक्षिसी[६] ॥
अन्न देउनी तूंच पोशिसी[७] ॥

बुद्धि देउनी काम सांगशी[८] ॥
ज्ञान देउनी तूंच तारिशी[९] ॥२॥
वागवावया[१०] सर्व सृष्टिला[११] ॥
शक्ति[१२] वा[१३] असे एक तूजला ॥
सर्वशक्ति[१४] तूं सर्वदेखणा[१५] ॥
कोण जाणिजे[१६] तुझिया गुणा ॥३॥
नाम रूप हें तूजला नसे ॥
त्या तुला मुखें वर्णवे[१७] कसें ॥
आदि अंत ना[१८] मध्यही तुला ॥
तूंच दाविशी मार्ग आपुला[१९] ॥४॥
माणसें अम्ही सर्व लेंकरें ॥
माय बाप तूं हें असे खरें ॥
तुझिया कृपेवीण ईश्वरा ॥
आसरा[२०] अम्हां नाहिं दूसरा ॥५॥
तूंच आहसी[२१] आमुची गती[२२] ॥
देइं आमुतें उत्तमा मती ॥
प्रार्थितों तुला जोडुनी करा ॥
हे दयानिधे कीं कृपा करा ॥६॥

धडा ८

मेंढरूं आणि बकरें.

भाग पहिला.

एका पंतोजीचें किती एक मुलांशीं बोलणें झालें, तें असें.

पंतोजी.— मुलांनो, आज कोणत्या जनावरा विषयीं आपण बोलणें चालावें बरें!

सदू.— तात्या, आज मेंढरा विषयीं बोलणें चालवावें.

हरी.— नाहीं तात्या, मला वाटतें बकऱ्या विषयीं बोलावें.

पंतो०— बरें, दोहों विषयीं बोलूं. आणि तीं कोणत्या गोष्टीं विषयीं सारखीं आहेत, व कोणत्या गोष्टीं विषयीं सारखीं नाहींत, हें पाहूं या. आतां तुम्ही सांगा कीं मेंढरूं आणि बकरें हीं कोणत्या गोष्टीं विषयीं सारखीं आहेत.

सदू.— दोहोंला चार चार पाय असतात.

पंतो० — हो, हो, कुत्र्याला चार पाय असतात. तरी कुत्र्याच्या व मांजराच्या पायां पेक्षां सारखेपणा विषयीं बकऱ्याचे पाय मेंढराच्या पायांला जवळ आहेत.

रामा— बकऱ्याच्या पायांला आणि मेंढराच्या पायांला खूर असतात.

पंतो०— हें खरें, पण घोड्याच्या पायांलाही खूर असतात. तरी घोड्याच्या खुरांपेक्षां बकऱ्याचे खूर मेंढराच्या खुरांला जवळ आहेत. हा सारखेपणा कशा विषयीं हें कोणाला सांगतां येईल?

गजो.— बकऱ्याच्या खुराला दोन गेळें असतात. मेंढराच्या खुरालाही तशींच दोन गेळें असतात.

पंतो०— ठीक. आतां दुसऱ्या कोणत्या गोष्टी विषयीं बकरें आणि मेंढरूं हीं सारखीं आहेत?

सदू.— दोन्ही गवत खातात.

विठू.— दोहोंला शिंगें असतात.

महिनो.— नाहीं विठू. मेंढरास शिंगें नसतात; असतात काय तात्या?

पंतो०— मेंढराच्या कांहीं जातींला शिंगें असतात. आणि शिंगें नसतात अशा बकऱ्याच्याही कांहीं जाती आहेत. म्हणून तुम्ही दोघेही थोडेंसे चुकलां. किती एक देशांत मेंढराच्या अशा चमत्कारिक जाती आहेत कीं त्यास तीन तीन, चार चार, पांच पांच देखील, शिंगें असतात.

सगळीं मुलें.— काय, पांच पांच शिंगें? तर मग तीं मोठ्या मौजेचीं दिसत असतील!

धडा ९.

मेंढरूं आणि बकरें.

भाग दुसरा.

पंतोजी— आतां, कोणत्या गोष्टींविषयीं मेंढरूं आणि बकरें हीं सारखीं नाहींत, तें पाहूं. सांगा कोणी.

गहिनी— मेंढराला लोंकर असते, आणि बकऱ्याला केंस असतात.

विठू— कड्यावर अवघड जागीं बकऱ्याला चांगलें चढतां येतें, तसें मेंढराला येत नाहीं.

गजो— आणखी एक, बकऱ्याला दाढी असते, मेंढराला नसते.

पंतो०— दुसरी एक विशेष गोष्ट कोणाच्या मनांत येत नाहीं काय?

सदू— होय तास्क, माझ्या मनांत दुसरी एक गोष्ट आली. आपण कांहीं हातीं फार वेळ धरिलें, किंवा त्याजवर तोंडाची

बाक टाकिली, तर तें बकरें खात नाहीं. मेंढराला त्याचें कांहीं वाटत नाहीं, तें खातें

पंतो०— शाबास सदू, ठिक सांगितलें. पण बकरें इतकें चोखाळ आहे तरी मेंढरूं ज्याला शिवणार नाहीं, असें कांहीं खाणें बकरें खातें. हें कधीं तुझ्या लक्षांत आलें आहे काय?

सदू— होय तात्या, झाडाचा पाला व पंदें वगैरे जाड गवत मेंढरूं खात नाहीं, बकरें खुशाल खातें.

पंतो०— बरें मुलांनो, आणखी कांहीं ठाऊक असेल तर बोला.

विठू— मेंढराची सागोती माणसें खातात, बकऱ्याची खात नाहींत.

पंतो०— बकऱ्याची खात नाहींत खरें, पण बकऱ्याच्या पोराची खातात. बकऱ्याच्या पोराला काय म्हणतात?

सगळीं मुलें— करडूं म्हणतात.

पंतो०— आणि मेंढराच्या पोराला काय म्हणतात?

सगळीं मुलें— कोंकरूं म्हणतात.

पंतो०— अधिक शहाणपण कोणाला, मेंढराला कीं बकऱ्याला? सांगा बरें.

हरी— अधिक शहाणपण बकऱ्याला असतें, तात्या.

गजी— तरी मला बकऱ्यापेक्षां मेंढरूं अधिक आवडतें. त्याचीं कोंकरें किती गरीब असतात, सांगूं!

पंतो०— अगे गजे, कोंकरें गोजिरवाणीं असतात म्हणून तुला तीं बरीं वाटतात, ह्यांत कांहीं नवल नाहीं; तरी बकऱ्यास शहाणपण अधिक असतें. शहाणपणाचे कांहीं थोडे खेळाव-

यास शिकविलेले बकरे आम्हीं पाहिले आहेत. तसे बैल किती श्रम करून शिकविले तरी ते मेंढरास यावयाचे नाहींत.

धडा १०.

मेंढरूं आणि बकरें.

भाग तिसरा.

रामा— मेंढरूं किती जड व सुस्त असतें! मेंढराला डोंगराच्या कड्यावर चढतांना व उड्या मारितांना आम्हीं कधीं पाहिलें नाहीं.

पंतो०— डोंगराचे खडपे व कडे असल्या अवघड जागीं राहण्याची योग्यता देवानें बकऱ्यास दिली आहे, आणि त्याच्या आंगाची ठेवणही तसल्या जागीं जाण्या जोगीच केली आहे. पहा, ज्याच्या त्याच्या पुढील वागणुकीच्या बेता प्रमाणेंच देव सगळे प्राणी उत्पन्न करितो. तरी रामा, बकऱ्या इतकें जरी मेंढरास डोंगरावर, चढतां येत नाहीं, तरी कांहीं चढतां येतें. किती एक डोंगरी देशांत लहान लहान जातींचीं मेंढरें आहेत, तीं आंगानें फार चपळ असतात, आणि चढतांना त्याचे पाय निसरत नाहींत. असो, आतां आपणास मेंढरा पासून मोठा उपयोग कोणता हें सांगा बरें.

रामा— त्या पासून सागोती मिळते हा मोठा उपयोग आहे.

गजो— नाहीं, नाहीं, त्या पासून लोंकर मिळते हा मोठा उपयोग.

पंतो०— गजोबाचें बोलणें मला बरें वाटतें. रामा, तुझें अंगलें कशाचें आहे बरें?

रामा— सकलादीचें आहे.

पंतो०— सकलाद कशाची करितात?

रामा— तें मला ठाऊक नाहीं, तात्या.

पंतो०— कोणाला ठाऊक आहे तर?

गजी— लोंकरीची करितात, नाहीं बरें तात्या?

पंतो०— ठीक. लोंकरीचे करितात असे दुसरे कोणते जिन्नस आहेत?

विठू— घोंगडी, धाबळी, बुरणूस, पट्टू, फलानीन, कांबळीट हीं सगळीं लोंकरीचींच करितात.

पंतो०— होय, होय, ह्या जिनसा लोंकरीच्याच आहेत. ह्या खेरीज आणखी पुष्कळ आहेत, ह्यावरून सागोतीविषयीं मेंढरूं जितके उपयोगाचें आहे त्याहून लोंकरीविषयीं फार उपयोगाचें आहे, हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. आतां लोक बकरीं कशासाठीं बाळगितात हें सांगा.

हरी— त्याच्या दुधासाठीं.

पंतो०— ठीक. बकऱ्याचा दुसरा काय उपयोग आहे, हें कोणाला सांगतां येईल?

सगळीं मुलें— आम्हाला ठाऊक नाहीं.

पंतो०— बकऱ्याच्या कातड्याचे जोडे करितात, व हातमोजे करितात. कितीएक देशांत बकरीच्या दुधाची पनीर करितात. आणि एका जातीच्या बकऱ्याचे केंस मऊ रेशमासारखे असतात, त्यांचें उंची कापड बनतें. आज तुम्हीं सर्वांनीं उत्तरें चांगलीं दिलीं, म्हणून तुम्हास दोन बकऱ्यांची एक चमत्कारिक गोष्ट सांगतों.

सगळीं मुलें— आपली मेहरबानी होईल.

धडा ११.

मेंढरूं आणि बकरें.

भाग चौथा.

पंतोजी.— ही गोष्ट मी सांगणार ती खरी आहे, गप्प नव्हे.

दूर एक डोंगराळ देश आहे, जेथें बकरीं फार आहेत, तेथें एके दिवशीं एक बकरें डोंगराच्या कड्यांत जागोजाग उगवलेलें गवत व झाडपाला खावयासाठीं ह्या खडप्यावरून त्या खडप्यावर उड्या मारीत चरत होतें. जातां जातां एक नीट सुळा सारखा तुटलेला कडा होता त्यापाशीं गेलें. तेथें बकऱ्याच्यानेंही चढवणार नाहीं असा एके बाजूस उंच भिंतीसारखा कडा, आणि एके बाजूस डोळे फिरावयाजोगी खोली, त्याच्या मध्यें एक फारच अरुंद वाट, एका बकऱ्याचा पाय मात्र ठेवण्यापुरती, होती; त्या वाटेनें तें बकरें जाऊं लागलें.

कांहींसें पुढें गेल्यावर त्याच वाटेनें दुसरें एक बकरें समोरून येताना त्यानें पाहिलें. तीं दोन्ही बकरीं समोरासमोर आल्यावर तशींच कांहीं वेळ उभीं राहिलीं. आतां ह्यांनीं काय करावें बरें? वाटेंत दोन बकऱ्यांनीं पाय ठेवावया पुरती जागा नव्हती. एक दुसऱ्याच्या शेजारून गेलें तर खचीत खालीं पडून मरावयाचें. माघारें फिरावें तर उलटून वळावयास देखील जागा नव्हती. तेव्हां तीं दोन्ही बकरीं एकमेकांकडे बघत उगीच उभीं राहिलीं.—

हें दुरून एका मनुष्यानें पाहिलें. तेव्हां त्यानें जवळच्या गांवांत धावत जाऊन पुढें तीं बकरीं काय करितात ती मौज पहावयासाठीं लोकांस बोलाविलें. तेव्हां तो चमत्कार पहावयाकरितां लोकांचा बराच थाट तेथें जमला.

इकडे तीं बकरीं पुष्कळ वेळ उभीं राहिल्यावर अगदीं जवळ जवळ आलीं. आणि त्यांतील एक बकरें हळूच पहिल्यानें पुढला एक पाय मोडून, मग दुसरा पाय मोडून, फार सावधगिरीनें कड्याला आंगाचा नेटावा देऊन खालीं बसलें. तेव्हां दुसरें बकरें त्याच्या आंगावर पाय ठेवून हळूच पलीकडे गेलें. तें गेल्यावर पहिलें बकरें फार संभाळून राहत राहत उभें राहिलें. मग दोन्हीं आपापल्या वाटांनीं गेलीं.

मौज पाहण्याकरितां जे लोक जमले होते त्यांनीं दोन्ही बकरीं चमत्कारिक युक्तीनें पार पडलीं असें पाहून मोठी वाहवा करून टाळी पिटली. तुम्ही जर तेथें असतां तर तुम्हीं देखील वाहवा केली असती. मुलांनो, सांगा बरें, त्या दोन बकऱ्यांपैकीं एक बकरें आपल्या आंगावरून दुसऱ्याला जाण्यास वाट देण्याकरितां जर बसलें नसतें, तर त्यांची पुढें काय गत झाली असती ?

हरी— दोन्ही उपाशीं मेलीं असतीं, किंवा थकून खालीं पडून प्राणास मुकलीं असतीं.

पंतो०— ह्या दोहोंतून कोणतें बकरें तुम्हांला बरें वाटतें ?

गजी— बसून ज्यानें दुसऱ्यास वाट दिली तें मला बरें वाटतें.

पंतो०— ठीक बोललीस. मुलांनो, तुम्ही ह्या गोष्टीची

आठवण ठेवा. आणि जर कधीं तुम्ही खेळतांना एकमेकांशीं भांडावयास लागलां, तर हार मानण्यास लवकर राजी होत जा. जें मूल पहिल्यानें हार मानून उगेंच राहील, तेंच मूल चांगलें व शहाणें, असें समजावें; असें तें बकरें.

धडा १२.

लवंग आणि वेलदोडा.

लवंग.

ह्या झाडाची उत्पत्ति मुळीं मलाका देशांत होती. तेथून हें झाड फ्रान्स, बोर्निओ, व दक्षिण अमेरिका येथें नेलें. अलीकडे ह्या देशांत हीं झाडें लावूं लागले आहेत, परंतु त्यांपासून लवंगा उत्पन्न होत नाहींत. हें झाड उंच वाढतें, व आठ नऊ वर्षांनीं लागवडीस येतें. उत्कृष्ट लवंगा आंबोयना बेटांत होतात. दर झाडास प्रतिवर्षी पुष्कळ लवंगा येतात. पूर्वी मलाका बेट जेव्हां डच लोकांच्या स्वाधीन होतें, तेव्हां त्यांनीं लवंगांचा व्यापार आपणाकडेसच ठेविला होता, आणि ते त्या पाहिजे त्या दरानें विकीत असत.

लवंगा फार उपयोगाच्या आहेत. त्यांचें तेल काढितात. सरदी झाली तर लवंगांचा काढा करून घेतात; कोणी तशाच खातात. पूर्वी लवंगा इतक्या महाग होत्या कीं तोळ्यास चार आणे पडत असत, परंतु आतां त्या आण्याच्या पांच सहा तोळे मिळतात.

वेलदोडा.

ह्याची उत्पत्ति बहुतकरून भरतखंडांत व त्याच्या भोंवता-लच्या उष्ण प्रदेशांत होते. ह्याचीं झाडें थंड देशांत होत नाहींत. वेलदोडे मलबार, कोची, मंगलोर, व बहुतकरून सर्व करनाटक देश, ह्या ठिकाणीं होतात. हीं झाडें हळदीच्या सारखीं किंवा देवकेळीच्या सारखीं असतात. वेलदोड्यांचीं झाडें मलबार देशांतील रानांत आपोआप होतात, व कित्येक ठिकाणीं लोक तीं लावितात. वेलदोडे भुइमुगाच्या शेंगासारखे जमिनींत मुळास लागतात. हीं झाडें लावण्याचा समय पर्ज-न्यकाळीं असतो. त्यावेळीं जमीन पोकळ करून तींत बीं पेरि-तात. नंतर हंगामाच्या वेळीं, म्हणजे आश्विन व कार्तिक ह्या महिन्यांत, त्या जमिनींतून वेलदोडे काढितात. त्यांचा हंगाम दोन तीन महिने असतो. वेलदोडे खणून काढल्यानंतर जर ते दमट असले, तर वाळवून तयार करितात. मग त्यांचे गठ्ठे बांधून बाहेर गांवीं पाठवितात. मलबाराहून प्रतिवर्षीं शेंकडों खंडी वेलदोडे इंग्लंदांत व दुसऱ्या देशांत विकावयास नेतात.

वेलदोडे स्वादिष्ट असतात. ते बहूत करून खाण्याच्या पदार्थांत घालितात. त्यांची साल औषधास उपयोगीं पडते. मलबार प्रांतांतील कितीएक ठिकाणीं असें करितात कीं ज्या जमिनींत वेलदोडे पिकतात तिच्या जवळच्या जमिनींतील सर्व झाडें तोडून ती जमीन नांगरतात, मग तेथें आपोआप वेलदोडे पिकूं लागतात.

धडा १३.

उंदीर आणि अंडीं.

उंदरास अंडीं फार आवडतात, आणि कोंबड्यां बसावयाचे ठिकाणीं ते अंड्यांचा फार नाश करितात. अंडीं आतात तेव्हां चोरून नेणारे उंदीर असतील, असें विरळा मनांत येतें, कारण एवढी मोठी वस्तू उचलून नेण्याजोगीं प्रत्यक्ष साधनें त्या जिवांच्या ठायीं नाहींत. ह्या कारणास्तव त्यांचा कोणास वहमा येत नाहीं, तथापि ते अंडीं नेतात ह्याविषयीं संशय नाहीं. एके दिवशीं एका कुणब्यानें कित्येक उंदीर कोंबड्या बसायाच्या ठिकाणाजवळ पाहिले. त्याजवरून ते काय करितात तें पहावयास तो कांहींसा दूर उगाच उभा राहिला. इतक्यांत एका उंदरानें एका अंड्यापाशीं पडून आपलें लांबच्यालांब आंग त्या अंड्याभोंवतीं वेंटाळलें, आणि आपलें शेपूट दांतांत धरून त्या अंड्यास आपल्या आंगाचा वेढा घालून तें गच्च धरिलें. इतक्यांत दुसऱ्या उंदरांनीं त्याच्या जवळ येऊन त्याची मान धरून त्याला त्या अंड्या सुद्धां कोंबडीच्या घरांतून ओढीत आपल्या बिळांत नेलें, हें त्यानें पाहिलें.

धडा १४.

बहिरी आणि मुकी आई.

सुमारें शंभर वर्षांमागें विलायतेंत एका सरदाराची कन्या होती ती जन्मापासून मुकी व बहिरी असे. ती वयांत आल्यावर तिच्या बापानें विवें लग्न करून दिलें. लग्नाच्या वेळेस

ज्या गोष्टी नवरीनें स्वतां म्हटल्या पाहिजेत त्या तिनें खुणांनीं करून दाखविल्या; व ज्या गोष्टी नवरीला ऐकावयाच्या होत्या त्या नवऱ्यानें व उपाध्यानें तिला खुणांनीं कळविल्या.

पुढें कांहीं वर्षांनंतर तिला एक मूल झालें, त्याला ती अगदीं जीव कीं प्राण करीत असे. एके दिवशीं तें मूल पाळण्यांत निजलें होतें, आणि घरची मोलकरीण होती ती पाळण्यापासून दूर कांहीं काम करीत होती, इतक्यांत त्या मुलाची आई मनांत कांहीं उद्देश योजून पाऊल न वाजवितां पाळण्याकडे हळूच गेली, तें त्या मोलकरणीनें पाहिलें; तेव्हां पुढें ही काय करते तें पहावें म्हणून मोलकरीण तिजकडे वळून बघूं लागली.

इतक्यांत तिनें पाळण्याजवळ जाऊन पहिल्यानें डोकावून आंत पाहिलें, तों मुलाला गाढ झोंप लागली होती. मग तिनें पदराखालीं झांकून धोंडा आणिला होता तो बाहेर काढिला. तें पाहतांच मोलकरणीच्या मनांत आलें कीं, ही धनीण आपल्या लेंकराच्या डोकींत धोंडा घालून त्याला ठार मारिते कीं काय!

कांहीं अज्ञाण जातीच्या लोकांची समजूत अशी आहे कीं मुकें माणूस मोठें कपटी व कुढ्या मनाचें असतें. आणि ह्या मोलकरणीची समजूत तशीच होती, व ह्या वेळेस तसा संभवही दिसावयाजोगा होता. ती मोलकरीण पाळण्यापासून दूर होती तरी धांवत धांवत जवळ गेली, आणि आतां पुढें तिचा हात धरणार तोंच त्या आईनें उंच हात करून खूप जोरानें धोंडा आपटला; पण तो कोठें आपटला! तर पाळण्याच्या खालीं जवळ आपटला.

त्या अवाजासरसें मूल दचकून जागें झालें, तें पाहतांच

त्या आईला जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. आईच कीं! तो आनंद पोटांत मावेनासा होऊन ती गुडघे टेंकून बसली, आणि वर डोळे लावून तिनें मनांत परमेश्वराची, फार स्तुति केली.

तिच्या मनांतील आशय हा कीं, दुर्दैवेंकरून मला जें इंद्रिय उणें आहे तें ईश्वरानें माझ्या बाळकाला दिलें आहे कीं नाहीं हें पहावें. तें दिलें आहे असें जेव्हां तिला समजलें, तेव्हां हा मजवर त्याचा केवढा प्रसाद होय! असें तिनें मानिलें. या बाईच्या बुद्धीविषयीं अशा प्रकारच्या बहुत गोष्टी घडल्या, परंतु त्यांतून ही गोष्ट फारच मनोरंजक असल्यावरून येथें लिहिली आहे.

धडा १५.

भाकर.

भाकर म्हणून जो पिठाचा पदार्थ करितात तो खावयास चांगला आहे, व गरिबागुरिबांचा जीव राखावयास इतर भक्ष्य पदार्थांपेक्षा खचीत उपयोगी आहे. तरी कांहीं लोकांस भाकर अगदीं ठाऊक नाहीं. तथापि तिच्या ऐवजीं देवानें कोठें कोठें चमत्कारिक वस्तू उत्पन्न केल्या आहेत.

कोठें झाडाच्या सालींचें पीठ करून त्याच्या भाकरी करितात. कोठें कंदाच्या करितात. कोठें शेवाळीच्या करितात. कोठें बुंद कुटून त्याच्या पिठाच्या करितात. कोठें गोंदाच्या करितात. कोठें चुन्याच्या करितात. आणि कोठें वर एके प्रकारच्या मातीच्या भाकरी करितात.

टोलका नांवाच्या बेटामध्यें जे लोक राहतात त्यास धान्य पेरावयाचें व पेरावयाचें प्रयोजन नाहीं. कांकीं तेथें त्यास देवानें सागूचीं झाडें दिलीं आहेत. त्यापासून ते भाकरीसाठीं पुष्कळ पीठ काढितात. दक्षिण समुद्रांतील बेटांत जे लोक राहतात त्यासाठीं देवानें तेथें चमत्कारिक झाडें उत्पन्न केलीं आहेत, त्यास कोणी भाकरीचीं झाडें म्हणतात. त्या झाडांचीं फळें महाळुंगा एवढीं असतात. तीं खोदलेल्या दोन दगडांच्या मध्यें घालून भाजतात. मग वरचें कवच फोडून आंतून पांढरा मगज काढितात, तो गव्हांच्या रोडग्यासारखा गोड लागतो.

नारवे देशांतील लोक जी भाकर करितात ती तीस चाळीस वर्षे पर्यंत टिकते. जी भाकर फार जुनी व बुरसलेली असते ती त्या लोकांस नव्या भाकरीपेक्षां फार आवडते. अशा भाकरीची त्या लोकांत इतकी प्रतिष्ठा आहे कीं सर्वांहून जुनी भाकर असेल ती मोठमोठ्यांच्या मेजवानींत वाढितात. जेव्हां मुलाचा जन्म होतो तेव्हां त्या मुलाच्या आज्या पणज्याच्या जन्माच्या वेळची भाकर असेल ती इष्टमित्रांस वाढावयासाठीं काढितात. ही भाकर जव किंवा दुसरीं तेथें धान्यें आहेत त्यांची केलेली, व खोदलेल्या दोन दगडांच्या मध्यें घालून भाजलेली असते.

धडा १६.

जायफळ.

आशिया खंडाच्या पूर्वेस बेटें आहेत, तेथें जायफळें होतात. त्यांत बांडा म्हणून जें एक बेट आहे त्यांत तर उत्तम प्रतीचीं जायफळें होतात. त्यासारखीं जायफळें दुसऱ्या कोणत्याही ठि-

ठाणीं होत नसतील. हिंदुस्थानांत सरकारच्या व श्रीमंत लोकांच्या बागांत जायफळांचीं झाडें लावितात, परंतु त्यांस जायफळें फार येत नाहींत.

• हें झाड फार सुंदर दिसतें. त्याचीं फळें पिकून तयार झालीं म्हणजे पेरूयेवढीं असतात. जायफळांचा हंगाम श्रावण व भाद्रपद ह्या महिन्यांत असतो. त्यांचा रंग पिंवळट असतो. आंत जायफळाच्या सभोंवतीं जायपत्री असते. तिचा रंग तांबडा असतो. फळाच्या वरची साल नारळाच्या चोडासारखी जाड असते. जशी नारळाला करवंटी असते, तसें जायफळास पातळ कवच असतें; तें फोडलें म्हणजे जायफळ बाहेर पडतें. जायफळांचीं बेटें डच लोकांचीं आहेत. त्यांत ते लोक ह्या झाडांच्या लागवडीचें काम गुलाम लोकांकडून करवितात.

जायफळाच्या झाडाचीं फळें पिकलीं म्हणजे माळी झाडावर चढून लांब आकडीनें डाहळ्या आपणाजवळ आणून तीं फळें काढून घेतो. मग तीं घरीं नेऊन त्यांवरची साल काढितो, आणि आंत जी जायपत्री असते ती चाकूनें काढून घेऊन जायफळें उन्हांत टाकितो. त्यांस एक दिवस ऊन लागलें म्हणजे तीं घरांत आणून ठेवितो. नंतर बांबूच्या साटीवर तीं घालून खालीं थोडीशी आंच देतो. तेव्हां वरचीं कवचें तापून आपोआप फुटून जायफळें बाहेर पडतात. शेवटीं समुद्राच्या पाण्यांत चुना कालवून त्या पाण्यानें तीं धुऊन काढितो, आणि तीं पुन्हा वाळवून थैल्यांत भरून ठेवितो, व बाहेरगांवीं विकावयास पाठवितो.

जायफळ व जायपत्री हीं विड्यांत खातात, व बासुंदींत,

पाक वगैरे औषधांत, व पक्वान्नांत घालितात. जायफळाचें तेल काढतात. तें महाग असतें, तें पुष्कळ कामांस उपयोगी पडतें. प्रतिवर्षी इंग्लंद देशांत सुमारें पांच सहा लक्ष रुपयांचीं जायफळें नेतात. पहा! ईश्वरानें असे तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष आणि फळें मनुष्याच्या सुखाकरितां उत्पन्न केलीं आहेत.

धडा १७.

मुलांस उपदेश.

अभंग.

शिवी कोणा देऊंनये ॥ कोणासंगें[२३] भांडूनये ॥ १ ॥
अनवाणीं[२४] चालूं नये ॥ चालतांना धांवूं नये ॥ २ ॥
खोटी[२५] साक्ष देऊं नये ॥ जामिन[२६] कोणा होऊं नये ॥३॥
दुसऱ्याचें[२७] चोरूं नये ॥ खोटें कधीं बोलूं नये ॥ ४ ॥
गोड फार खाऊं नये ॥ पाहिलें[२८] तें मागूं नये ॥ ५ ॥
चित्तीं धरी जो हे बोल[२९] ॥ त्याचें कल्याण होईल ॥ ६ ॥

अभंग.

सकाळीं उठोनी, देवासी भजावें ॥
गुरूसी वंदावें,[३०] जिवें भावें[३१] ॥ १ ॥
वडिलांची[३२] आज्ञा, घेतल्या वांचून ॥
कोठें घरांतून, जाऊं नये ॥ २ ॥
शाळेसी जातांना, मुलांनीं वाटेंत ॥
तमाशा पाहात, राहूं[३३] नये ॥ ३ ॥
नेमियेल्या[३४] वेळीं, शाळे मध्यें जावें ॥
चित्त तें ठेवावें, विद्ये वरी ॥ ४ ॥

बाळपणीं विद्या[१५], वृक्षासी लावावें ॥
तरुणपणीं घ्यावें, फळ त्याचें[१६] ॥ ५ ॥

अभंग तुकाराम.

आतां तरी पुढें, हाची उपदेश
नका करूं नाश, आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पायां, माझें दंडवत[१७] ॥
आपुलालें चित्त, शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें, देवाचें चिंतन ॥
करूनियां मन, शुद्ध भावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित, होय तो[१८] व्यापार ॥
करा काय फार, शिकवावें ॥ ४ ॥

धडा १८.

उत्तर अमेरिकेंतील इंदियन् व चोरीस गेलेलें मास.

उत्तर अमेरिकेंतील एक इंदियन्, म्हणजे त्या देशांतील तांबड्यावर्णाचे मूळचे लोक आहेत त्यांपैकीं एक मनुष्य, बाहेरून आपल्या झोंपडींत आला, आणि पाहतो तों हरणाचें मास वाळावयाकरितां आपण टांगून ठेविलें होतें तें चोरीस गेलें. मग त्या ठिकाणीं फार लक्ष्य लावून चोहोंकडे पाहिलें, आणि रानांतून त्या चोराचा माग काढीत त्याचा पाठलाग करीत गेला.

तेव्हां वाटेंत कोणी भेटले त्यांस तो पुसूं लागला, अहो, एक ठेंगणा, म्हातारा, गोरा मनुष्य, बरोबर लहान बंदूक व कांडा लहा-

नसा कुत्रा घेऊन जातां तुम्हीं पाहिला काय? त्यांनीं उत्तर दिलें, होय पाहिला. त्याजवरून तो इंदियन् त्यांस सांगूं लागला, अहो, म्यां ज्याचें असें वर्णन केलें त्यानें माझें हरणाचें मास चोरून नेलें. तेव्हां ते म्हणाले कीं, तुम्हीं त्यास कधीं पाहिलें नाहीं असें दिसतें; असें असतां त्याचें वर्णन तुम्हांस इतकें बारकाईनें कसें करितां आलें, हें आम्हांस सांगावें.

त्या इंदियनानें प्रत्युत्तर दिलें कीं, म्यां भूमीवर उभें राहून तें हरणाचें मास जितके उंचीवर टांगलें होतें, तितक्या उंचीच्या जागीं आपला हात पोहोंचून तें काढायासाठीं उभें राहण्यास त्या चोरानें दगडांची रास केली, त्यावरून मी जाणतों कीं तो ठेंगणा आहे. रानांतील सुकलेल्या पानांवर त्याचीं पाउलें लागलीं आहेत तीं पाहतां जवळ जवळ पडलीं आहेत, त्याजवरून मला वाटतें कीं तो म्हातारा आहे. तो चालतांना दोन्ही पायांचे अंगठे बाहेर काढितो, त्याप्रमाणें इंदियन् कधीं चालत नाहींत. ह्याजवरून मी समजतों कीं तो गोरा मनुष्य आहे. त्याची बंदूक झाडाशीं टेंकून उभी केली होती, त्या बंदुकीचें तोंड लागून त्या झाडाची साल घासली, त्या खुणेवरून वाटतें कीं त्याची बंदूक आखूड आहे. त्याच्या कुत्र्याचे पाय लागले आहेत, त्याजवरून समजतें कीं तो कुत्रा लहान आहे. आणि त्याचा धनी माझें तें मास काढून घेण्यांत गुंतला असतां तो कुत्रा मातींत बसला होता, तेथें जी त्याची खूण म्यां पाहिली तिजवरून वाटतें कीं तो लांडा असावा.

धडा १९.

बदाम.

बदामाचा वृक्ष मोठा होतो, आणि त्यास फळेंही पुष्कळ लागतात. यूरोपखंडामध्यें फ्रान्स, स्पेन, इताली ह्या देशांत, व

आशियाखंडांत मस्कत, अराकान, इराण, मक्का, मदीना, सिराझ ह्या ठिकाणीं बदाम पुष्कळ होतात. हिंदुस्थानांत ह्या सर्व ठिकाणांहून बदाम येतात. बदामाचे दोन प्रकार आहेत. एक कडवा आणि दुसरा गोडा. हा वृक्ष ज्येष्ठ व आषाढ ह्या महिन्यांच्या सुमारास फुलूं लागतो, आणि आश्विन व कार्त्तिक ह्या महिन्यांत त्याचीं फळें पिकून तयार होतात. तीं तयार झालीं म्हणजे त्यांची आकृति लहानशा पेरूच्या येवढी असते. त्यांच्या वरची साल तांबडी होते, ती खाली असतां कांहींशी तुरट लागते. ह्या देशांत बदामाचे वृक्ष लावितात खरे; परंतु त्यांस अस्सल बदामांसारिखे बदाम येत नाहींत. हा वृक्ष लवकर वाढतो. त्याची छाया चांगली असते.

बदाम खावयास चांगले असून पौष्टिक आहेत. त्यांचें तेल काढितात, तें औषधास उपयोगीं पडतें. बदाम पौष्टिक आहेत म्हणून अशक्त लोक ते खातात; तेणेंकरून त्यांस शक्ति येते.

कडव्या बदामाचेंही तेल औषधास उपयोगीं पडतें. जशा नाण्यामध्यें कवड्या उपयोगीं पडतात, तसे कडवे बदाम कवड्यांबदल सुरतेंत चालतात. कित्येक लोक बदामांचीं सालें जाळून त्यांची राख दांत घांसावयास घेतात; तेणेंकरून त्यांस स्वच्छता येऊन ते बळकट होतात.

धडा २०.

अक्रोड.

चीन देशाच्या उत्तर भागांत, आणि हिमालयाचे आसमंतात्, व इराण देशांत अक्रोडाचीं झाडें पुष्कळ होतात. ह्या देशांत अक्रोडाच्या झाडांचीं मोठमोठालीं अरण्यें आहेत. अक्रोडाचीं

पानें फार हिरवीं व सुंदर असतात; व फळें पिकलीं म्हणजे पेरू एवढीं होतात; त्यांवरील साल नरम होते; ती चोळली म्हणजे बोटें काळीं होतात. हीं फळें हिरवीं असतात तेव्हा आंतील कवच कठीण होण्यापूर्वी तेथील लोक त्यांचें लोणचें करितात; हीं फळें पिकल्यानंतर वरची साल काढून तीं बाजारांत विकावयास नेतात. ज्या देशांत हीं फळें होत नाहींत तेथें तीं पाठवितात. अक्रोडाचें तेल जाळावयास व खावयास उपयोगीं पडतें. अक्रोडाचें लांकूड कठीण असून तें अनेक कामास उपयोगीं पडतें. जंतांचा उपद्रव झाला असतां तद्देशीय लोक कडव्या अक्रोडाचा रस काढून पोटांत घेतात.

अक्रोडाच्या झाडाला फळें लवकर लागत नाहींत, तें लाविल्यानंतर तीस चाळीस वर्षांनीं त्यास फळें येऊं लागतात. तीं पिकण्याचा हंगाम आश्विन व कार्त्तिक ह्या महिन्यांत असतो. हें झाड उपयोगास येण्यास फार काळ लागतो, ह्याविषयीं एक गोष्ट वाचण्यांत आली आहे. ती अशी कीं, कोणी एक पुरुष सुमारें साठ वर्षांच्या वयाचा असतां अक्रोडाचें झाड लावीत होता, तें पाहून एकजण त्याजपाशीं आऊन थट्टेनें म्हणाला, वडील बावा, हें झाड कशाचें समजून लावितां! हें लावून तुम्हांस काय उपयोग! त्यावेळीं त्यानें उत्तर केलें कीं, अरे गृहस्था! हें झाड कशाचें आहे हें मला पक्कें ठाऊक असूनच मी लावितों. बरें मीं आजपर्यंत जीं अक्रोडें खाल्लीं त्यांचीं झाडें मींच लाविलीं होतीं काय! तेव्हां ज्या अर्थी दुसऱ्यानें लाविलेल्या झाडांचीं फळें मीं भक्षिलीं, त्या अर्थी पुढील लोकांसाठीं झाडें लावून ठेवणें

हें मला उचित आहे. मनुष्यानें आपल्याच हिताकरितां श्रम करावे असें नाहीं, तर दुसऱ्याच्याही हिताकरितां श्रम करावे हें योग्य आहे.

ईश्वर हरेएक देशांत तेथील हवा व जमीन ह्यांप्रमाणें निरानिराळीं झाडें उत्पन्न करून लोकांचें संरक्षण करितो.

धडा २१.

केशर, चंदन.

केशर.

केशर नेपाळ व इंग्लंद ह्या देशांत पिकतें. केशराचें झाड लहान असतें. त्याचे कांदे दोन दोन हातांच्या अंतरानें हारीनें लावितात. ते लाविल्यानंतर दोन तीन महिन्यांनीं झाडें होऊन त्यास फुलें येतात. त्यास तीन पाकळ्या असतात, आणि आंत तंतु असतात, तेच केशर होत. हीं झाडें फुलावयास लागलीं म्हणजे फुलें खुडून घेतात, आणि पाकळ्या टाकून आंतील तंतु काढून त्यास आंच देतात. मग कागदावर पसरून वरतीं बुरणुसाच्या एक दोन घड्या घालून दाबून ठेवितात. केशराचा रंग तांबूस असून तंतु लांब असले म्हणजे तें उंच प्रतीचें असें समजावें. केशर एक वर्षावर राहिलें असतां बिघडतें.

केशराचे मळे एकवेळ लाविले म्हणजे ते तीन वर्षेपर्यंत राहतात. मग त्यांतील केशराचे कोंब काढून दुसऱ्या जागेंत लावावे लागतात. केशर औषधाच्या व रंगाच्या उपयोगीं पडतें. त्यास चांगला वास येतो. त्याचें पीक थोडें

होतें. तें पुष्कळ ठिकाणीं होत नाहीं, म्हणून केशर महाग विकतें. कितीएक पदार्थांस रंग व सुवास येण्याकरितां त्यांत केशर घालतात.

चंदन.

चंदनाचीं झाडें चीन देशांत व मलबार प्रांतांत पुष्कळ होतात; आणि दुसऱ्या कितीएक ठिकाणीं हीं झाडें होतात; परंतु उंची चंदन वरील दोन ठिकाणीं उत्पन्न होतो. चंदनाचीं झाडें बहुतकरून रानांत असतात, परंतु कोठें कोठें श्रीमंत लोक शोभा व सुवास ह्यासाठीं आपल्या बागांत लावितात. हें झाड जून झालें म्हणजे तें कापून त्याचीं खोडें करून तीं जमिनींत पुरून ठेवितात, नंतर तीं कांहीं दिवसांनीं बाहेर काढून तासून नीटनेटकीं करितात, आणि जसजसा त्याचा रंग आणि वजन असेल तसतसे त्याचे वेगळे वेगळे गठ्ठे बांधितात. जें खोड तांबूस रंगाचें असून वजनांत भारी असतें, व ज्यास सुवास फार येतो, त्याची किंमत जास्ती येते.

चंदन फार उपयोगी आहे. त्याच्या पेट्या, करंडे, पंखे, वगैरे करितात. चंदनाचें खोड उगाळून त्याचें गंध सुवास येण्यासाठीं आंगास लावितात. चिनी लोकांत श्रीमंत लोकांचीं प्रेतें चंदनाच्या पेटींत घालून पुरितात. चिनीलोक ह्याच्या लांकडाच्या नाना तऱ्हेच्या वस्तू करून विकितात. चंदनाचें जें तेल काढितात त्यास चंदनीअत्तर असें म्हणतात. खरूज झाली, किंवा आंगावर पुळ्या आल्या, तर हें तेल

लाविलें असतां गुण येतो. चंदन औषधासही उपयोगीं पडतो. ह्या झाडाच्या आंगीं ईश्वरानें सुगंध ठेविल्यामुळें मलबार प्रांतात राहणाऱ्या लोकांचा ह्यावर मोठा व्यापार चालून त्यांची उपजीविका होते.

धडा १२.

मानवी कुटुंब.

बाप, आई, आणि मुलें हीं मिळून एक कुटुंब होतें. तीं सगळीं एका घरांत राहतात; तीं एकच अन्न खातात; त्यांचा एकमेकांचा फार जवळचा संबंध असतो. आणि परक्यापेक्षा तीं एकमेकांस आवडतीं असतात. एकाला जर दुःख झालें तर सर्व दुःखी होतात, आणि एकाला जर सुख झालें तर सर्व सुखी होतात.

पुष्कळ घरें ज्या एके ठिकाणीं एका शेजारीं एक अशीं बांधिलेलीं असतात; ज्यांत पुष्कळ कुटुंबें राहतात; चौकांत, रस्त्यांत एकमेकांची गांठ पडते; घेण्यादेण्याबद्दल तीं बाजारांत एकत्र होतात; व चावडीमध्यें व देवळांत एकत्र जमतात; आणि हरएक प्रसंगीं एकमेकांच्या घरीं जातात; इतक्या गोष्टी जेथें घडतात त्या स्थळाला गांव असें म्हणतात.

गांव मोठा असला तर त्याला शहर म्हणावें. पुष्कळ शहरें आणि पुष्कळ प्रांत मिळून देश होतो. देशाच्या भोंवतीं डोंगर असतात; त्यांतून नद्या वाहतात. त्या देशांतील राहणारे ते एकमेकांचे देशभाऊ होत. ते एकच बोली बोलतात, आणि ते एकोप्यानें दुसऱ्या देशाशीं युद्ध किंवा सला करितात. तेथील राज्य चालविणारा तो राजा होय.

मनुष्यांनीं भरलेले पुष्कळ देश, व बेटें, व महाद्वीपें, आणि समुद्र हीं सर्व मिळून जग होय. ह्या जगाला पृथ्वी म्हणतात. वाळवावर जशा मुंग्या फिरतात, तशीं ह्या पृथ्वीचे पाठीवर माणसें गजबजतात. कोणी उन्हाच्या तापानें काळीं असतीत; कोणी लोंकरीचीं वस्त्रें पांघरून थंडीच्या कडाक्याचें निवारण करितात; कोणी द्राक्षारस पितात; कोणी नारळाचें मधुर पाणी पितात, आणि कोणी नदीच्या पाण्यानें आपली तहान भागवितात.

हीं सर्व मनुष्यें मिळून देवाचें कुटुंब आहे. जसा मेंढक्या आपल्या कळपांतील मेंढरें ओळखितो, तसा देव ह्या प्रत्येक मनुष्यास जाणतो. तीं निरनिराळ्या भाषांनीं देवाची प्रार्थना करितात, तरी तो सर्वांचें बोलणें समजतो. ज्यांचें संरक्षण देव न करी इतकीं हलकीं कोणी नाहींत.

अगे हबशिणी, जी तूं दासीपणांत झुरत बसलीस, त्या तुला जरी कोणी माणूस पाहत नाहीं, तरी देव तुला पाहतो; जरी कोणी मनुष्याला तुझी दया येत नाहीं, तरी देवाला तुझी दया येईल. तूं आपल्या बंदांतून त्याचा धांवा कर, कां तर तो तुजकडे कान देईल.

हे सार्वभौमराजा, जो तूं शेंकडों राज्यांवर राज्य करितोस, तो तूं मजवर कोणी वरचढ नाहीं अशी शेखी मिरवूं नको; तुझ्या डोईवर देव आहे, आणि जर त्वां कांहीं वाईट काम केलें तर तो तुला शिक्षा करील.

पृथ्वीवरील लोकांनो, देवाचें भय बाळगा; मनुष्य जातीच्या कुटुंबांनो, तुम्ही देवाची प्रार्थना करा.

धडा २१.

न्याय करण्याचें चातुर्य.

दोघां सोबत्यांनीं कांहीं द्रव्य एका बाईच्या स्वाधीन करून ठेविलें, आणि तिला सांगितलें कीं, आम्ही दोघे बरोबर मागावयास येऊं तेव्हां हें द्रव्य त्वां आम्हास द्यावें. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर त्या दोघांतून एकजण त्या बाईकडे गेला, आणि तिला सांगूं लागला कीं, माझा सोबती मेला, ह्याजकरितां माझा पैसा मला दे. त्याविषयीं त्या बाईनें पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु तो कांहीं ऐकेना. तेव्हां निरुपाय होऊन तिनें त्यास सगळा ऐवज दिला.

पुढें थोड्या दिवसांनंतर तो दुसरा मनुष्य त्या बाईकडे आला, आणि आपली ठेव मागूं लागला. त्यावर बाई त्यास म्हणाली कीं, तुझा सोबती थोड्या दिवसांपूर्वी येथें आला, आणि तूं मेलास म्हणून सांगून आपलें द्रव्य मागूं लागला, तेव्हां तूं आल्याशिवाय तुमचें द्रव्य त्यास देऊं नये म्हणून मीं पुष्कळ हरकती घेतल्या, परंतु तें कांहीं न ऐकतां तुझा सोबती तो सर्व पैसा घेऊन गेला.

तेव्हां त्यानें न्यायाधीशाकडे फिर्याद केली. न्यायाधीशानें त्या बाईस बोलावून आणून तिला सर्व मजकूर विचारिला. त्यावरून त्याच्या लक्षांत आलें कीं, ही बाई तर निरपराधी आहे. मग न्यायाधीशानें त्यास सांगितलें, तुम्हीं पहिल्यानें करार केला होता कीं, आम्ही दोघे बरोबर मागावयास येऊं तेव्हांच त्वां हें द्रव्य आम्हास द्यावें, परंतु आतां तर तूं एकटाच

आलास, तेव्हां तें तुला एकालाच कसें मिळेल? तुला आपला पैसा पाहिजे असेल, तर आपल्या सोबत्यास घेऊन ये. तेव्हां तो मनुष्य कुंठित होऊन माघारा गेला.

धडा २४.

प्रामाणिकपणा आणि सत्य यांचीं उदाहरणें.

प्रामाणिकपणा आणि सत्य ह्यांचा एकमेकांशीं एवढा संबंध जोडलेला आहे कीं त्यांतील एकाचें वर्णन करूं लागलें, म्हणजे ओघानें दुसऱ्याचें करावें लागतें. सत्य आणि प्रामाणिकपणा ह्यांच्यामध्यें जो बारीक भेद आहे त्याचीं उदाहरणें दाखविल्या-शिवाय तो स्पष्ट होत नाहीं.

ह्या भरतखंडांत हरिश्चंद्र नामक एक मोठा प्रामाणिक राजा होऊन गेला. त्याची गोष्ट बहुधा सर्वांस माहीतच असेल. ती अशी कीं, तो मोठा धार्मिक व प्रामाणिक पुरुष होता, त्यानें आपलें वचन पाळण्यासाठीं राज्याचा देखील त्याग करून शेवटीं आपणास विकूनही घेतलें, पण प्रामाणिकपणा सोडिला नाहीं.

दुसरी एक गोष्ट ऐकण्यांत आली तिचा सारांश असा आहे कीं, गुजराथेंत कोणीएक नामांकित सावकाराच्या पेढीवर एक विश्वासूक मुनीम होता; म्हणून त्या सावकाराचा त्याजवर पूर्ण विश्वास बसला; वास्तव तो त्याला केवळ आपल्या भावाप्रमाणें मानीत असे.

कांहीं काळानें तो सावकार आजारी पडून मरावयास टेंकला, त्यावेळीं त्याचा मुलगा सुमारें पांच सहा वर्षांचा होता. तेव्हां

त्यानें आपल्या मुलाचें पाळण करणारा ह्या भल्या मुनिमाशिवाय दुसरा कोणी सांपडणार नाहीं, असें पक्कें ध्यानांत आणून त्याच्या स्वाधीन तो मुलगा व दौलत केली, आणि इतकेंच सांगितलें कीं, तुम्हीं कांहीं अधिक बोलत नाहीं; परंतु आजपर्यंत जसा त्वां लौकिक मिळविला तसाच पुढेंही मिळीव, म्हणजे झालें. असें बोलून त्या सावकारानें प्राण सोडिला.

पुढें तो मुनीम-तसेंच प्रामाणिकपणानें काम चालवीत असतां त्याचे कोणी आप्त येऊन असा बुद्धिभेद करूं लागले कीं, भाऊ पहा! हा एवढा कारभार तुम्हाकडे आहे व लक्षावधि रुपये हातांत घोळतात, तर आतां आपला तळीराम गार करून एकदम कां सुखी होत नाहीं! हें ऐकून घेऊन त्यानें त्यांस असें उत्तर केलें कीं, छी छी, मजकडे असली दुराचाराची गोष्ट कधीं बोलूं नका. तुम्ही काय विश्वासघात करून नरकाचें साधन करावयास सांगतां! म्यां आजपर्यंत ज्याचें अन्न खाल्लें त्याच्या मुलास कसें ठकवूं? हें निंद्य कर्म मी सहसा करणार नाहीं. असा त्यानें त्यांचा निषेध केला. व पुढें त्या मुनिमानें तो मुलगा वीस पंचवीस वर्षांचा होई तोंपर्यंत मोठ्या प्रामाणिकपणानें धन्याच्या द्रव्याचें संरक्षण करून तें मुलाच्या स्वाधीन केलें.

धडा २५.

ईश्वराचें महत्त्व.

श्लोक.

स्तुती करावी[१९] परमेश्वराची ॥
करूं नये व्यर्थ कधीं पराची[२०] ॥

स्तुतीस कीं ईश्वर पात्र[41] होतो ॥
वसा तिला मानव[42] काय हो तो ॥१॥

डोळ्यांनीं बघतों ध्वनी[43] परिसतों[44] कानीं पदीं[45] चालतों ॥
जिव्हेनें[46] रस[47] चाखतों मधुरही वाचें[48] अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाळ[49] काम करितों विश्रांतिही[50] घ्यावया ॥
घेतों झोंप सुखें[51] फिरोनि उठतों ही ईश्वराची दया ॥ २ ॥

सत्तेनें[52] प्रभुच्याच सूर्य उगवे[53] त्याच्याचि सत्ताबळें ॥
वारा वाहतसे[53] नभीं[54] तरुलता[55] देतात पुष्पें फळें ॥
पाण्याचा करितात मेघ समयीं[56] वर्षाव भूमीवरी ॥
देते धान्य समृद्धि[57] भूमि अवघी त्याचीच[58] सत्ता खरी॥३॥

ईश्वरास प्रार्थना.

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ॥
आम्ही अज्ञ[59] मुलें तुझीं सकलहीं तूं बाप होशी[60] खरा॥
केला कां इतका अम्हांवरि तुवां देवा असा कोप हा[61] ॥
हें आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥४॥

पद.

त्राता[62] तूंच हरी[63] ॥ अम्हांला, त्राता तूंच हरी ॥ ध्रुवपद ॥
अंत नको बघुं अमुचा आतां ॥ धांव घेईं लवकरी ॥१॥ अम्हा०
जगत्सर्ग[64] संहारकारका ॥ अतां नको धरुं दुरी ॥२॥ अम्हा०
सर्व संकटापासुनि देवा ॥ मुक्त करीं झडकरी ॥३॥ अम्हा०
कामक्रोधादिक हे शत्रू ॥ पिडिति बहु अंतरीं ॥४॥

धडा २६.

पापाची वासना मोडणें.

यदू आणि रामा हे भाऊ भाऊ होते. हे दोघे एके दिवशीं

सहल करीत असतां एके बागांतल्या आंबराईवरून चालले. तेथील आंब्याचीं झाडें मोठाल्या सुंदर फळांनीं लादलेलीं होतीं. आंब्यांस पका पाड लागला होता, म्हणून फळांवर तांबडा, पिंवळा, शेंदरा असा रंग आला होता.

तीं फळें पाहून रामा म्हणाला, कायरे सदू, हे पहा आंबे कसे नामी पिकलेले दिसतात. बागांत कोणी नाहीं, आपण कांहीं आंबे तोडून घेऊन पळून जाऊं. सदू म्हणाला, छी छी, असें बोलूं नको. हे आंबे आपले नव्हत, म्हणून हे तोडून घेणें ठीक नाहीं. मग रामा उत्तर करितो, आपले नसले म्हणून काय झालें? आंबे पुष्कळ आहेत, ह्यांतून आपण थोडे तोडून घेतले तरी ते कमी झाले असें बागाच्या धन्यास समजणार नाहीं. आंबे इतके पुष्कळ आहेत कीं ते कोणाच्यानें मोजवणार देखील नाहींत.

सदू म्हणाला, पुष्कळ आहेत खरे, तरी त्यांतून आपण घ्यावे हें काम वाईट आहे; का कीं, दुसऱ्याची वस्त कितीही हलकी असली तरी धन्याला न कळत घेणें ही चोरी आहे. तुला आठवण नाहीं काय, थोडक्या दिवसांमागें आपल्या दरवाज्यावरून कोतवालाचे शिपाई एक चोर धरून नेत होते त्यावेळेस आपल्या बाबानें काय सांगितलें तें?

रामा म्हणाला, बाबा काय बोलला तें मला आठवत नाहीं, तूं सांग. मग सदू म्हणाला, बाबा बोलला कीं, माणसें पहिल्यानें गोष्ट हलकी आहे असें समजून लहानसें पाप करितात, तें पचलें म्हणजे त्याहून कांहीं अधिक पाप करितात. असें करितां करितां तीं पुढें मोठमोठीं पापें करण्यास

भीत नाहींत. आणखी मी तुला सांगतों, ह्या बागे-च्या धनी जरी आम्हांस पाहत नाहीं तरी देवाची नजर आपणांवर नेहमीं आहे, हें तुला ठाऊक आहेना?

हें भावाचें बोलणें ऐकून रामाला आपल्या बोलण्याचा पस्तावा झाला. रामाला पहिल्यानें आंबे घेण्याची मोठी उतावळी झाली होती, पण देव आपणांकडेस पाहतो हें आठव-ल्यांच तो त्या पापापासून मागें सरला. बागाचा धनी कुंपणाच्या आंत उभा होता, त्यानें ह्या दोघां मुलांचें बोलणें आडून ऐकिलें, तेव्हां त्याला मोठें कौतुक वाटलें. मग तो पुढें आला, आणि कांहीं चांगले अलगलेले आंबे तोडून सदूस मोठ्या संतोषानें दिले. ते सदूनें घेऊन आपला भाऊ रामा ह्यास आपल्या बोलण्याचा पस्तावा झाला हें समजून आपल्या आंब्यांतून अर्धे आंबे त्यास दिले.

धडा २७.

मनुष्य जातीचे प्राणी—इंद्रियें.

मी मनुष्य जातीचा प्राणी आहें. मी उभा चालतों; मनुष्य जातीचे सर्व प्राणी तसेच चालतात. इतर प्राणी आपलीं तोंडें भुईकडे करून चालतात. मी पायांनीं चालतों; इतर प्राणीही पायांनीं चालतात.

मला पाहतां येतें, ऐकतां येतें, स्पर्श जाणतां येतो, चव घेतां येते, आणि हुंगतां येतें. इतर प्राण्यांसही ह्या गोष्टी करितां येतात. पाहणें, ऐकणें, स्पर्श जाणणें, चव घेणें, आणि हुंगणें हीं पांच इंद्रियांचीं कर्में म्हटलीं आहेत

डोळ्यांनीं मी पाहतों, कानांनीं मी ऐकतों, जिभेनें मी चव घेतों, नाकानें मी हुंगतों, आणि शरीराच्या कोणत्याही भागानें मला स्पर्श जाणतां येतो. इतर प्राणीही डोळ्यांनीं पाहतात, कानांनीं ऐकतात, नाकानें हुंगतात, जिभेनें चव घेतात, आणि त्यांच्या शरीरास कोठेंही स्पर्श झाला असता तो ते जाणतात.

आनंद, दुःख, आणि भय हींही मला होतात; इतर प्राण्यांसही हे मनाचे धर्म होतात. कुत्रा आपला धनी सुखी पाहतो तेव्हां त्याला आनंद होतो; आणि आपला धनी दुःखी पाहतो तेव्हां त्याला दुःख होतें; आणि आपला धनी चाबूक उगारतां पाहतो तेव्हां त्याला भय वाटतें.

मला बोलतां येतें; जें मला वाटतें तें शब्दांनीं मला बोलून दाखवितां येतें. इतर प्राणी शब्द करितात, परंतु त्यास बोलतां येत नाहीं. कुत्रा भुंकून आनंद दाखवितो, आणि ओरडून दुःख दाखवितो, आणि पायांत शेपटी घालून भ्यालों असें दाखवितो; परंतु त्याला बोलतां येत नाहीं.

मला विचार करितां येतो. विचार करण्याची शक्ति ही बुद्धि होय. परमेश्वरानें मोठ्या कृपेनें ज्या देणग्या मनुष्य जातीस दिल्या आहेत, त्यांतील बुद्धि ही एक देणगी आहे; इतर प्राण्यांस परमेश्वरानें बुद्धि दिली नाहीं.

घराला खिडक्या, दारें, आणि धुराडीं कां असतात, ह्याचें कारण जाणण्याची मला शक्ति आहे; शेगडी मातीची करितात, लांकडाची करीत नाहींत, ह्याचें कारण काय, व भांड्याला धरायाला कांठ कां असतो; सुरीच्या पात्याला

तिखट धार कां असते; आपले जोडे कातड्याचे कां करितात, कथलाचे, किंवा लाकडाचे, किंवा कापडाचे, कां करीत नाहींत, ह्या सर्व गोष्टी मला जाणतां येतात. ज्या गोष्टी मला जाणतां येतात त्या पशूंस जाणतां येत नाहींत. ह्या गोष्टींचीं कारणें खांबास जशीं समजत नाहींत तशीं पशूंसही समजत नाहींत.

माझ्या मनास वाटेल तसें करण्यास मला सदा परवानगी कां नसते, हेंही मला समजतें. माझीं आईबापें आणि माझे शिक्षक जें मला सांगतात तें कां केलें पाहिजे; आणि हुकूम बंदा, उद्योगी, आणि सावध, असें म्यां कां व्हावें, हेंही मला समजतें.

गुलाब आणि गुलनार ह्यांचा सारखेपणा आहे, असें मी पाहतों, कां तर दोन्ही फुलें आहेत; दोहोंस चांगला वास आणि रंग आहे; दोहोंस मूळ, पानें, आणि देंठ हीं असतात; दोहोंच्याही प्रथम कळ्या असतात; दोन्ही थोडे दिवसपर्यंत फुललेलीं राहतात, मग कोमेजतात.

आणखीही मी त्यांचा कांहीं निराळेपणा आहे असें पाहतों. गुलनाराहून गुलाब निराळा आहे, कां तर त्याला दुसऱ्या प्रकारचा वास असतो; गुलाबाला कांटे असतात, परंतु गुलनाराला नसतात. मला बुद्धीच्या योगानें गुलाबाला गुलनाराशीं मिळवून पाहून त्यांचा भेद जाणतां येतो.

धडा २९.

खरें बोलणारा मुलगा जार्ज वाशिंगतन.

फार प्रसिद्ध जो अमेरिका खंडांतला जनरल वाशिंगतन ह्या

सहा वर्षांच्या वयाचा होता तेव्हां त्याला कोणी एकानें लहानशी कुऱ्हाड बक्षीस दिली. त्या मुलाला कुऱ्हाडीचा मोठा हर्ष वाटून तो आपली नवी कुऱ्हाड कशी चालते हें पाहण्यासाठीं जें दृष्टीस पडे त्यावर हाणीत असे.

घराजवळच्या बागेंत त्याच्या बापाच्या आवडीचें एक फळ-झाड होतें. दुर्दैवेंकरून तो मुलगा त्या झाडाजवळ गेला, आणि आपल्या कुऱ्हाडीनें त्याची साल त्यानें तासली. ह्या त्याच्या खेळानें तें झाड अगदीं आयबंदी झालें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याचा बाप बागेंत गेला, तों आपल्या आवडत्या झाडाची साल तासलेली त्याच्या दृष्टीस पडली. ती झाडाची दशा पाहून त्यास मोठा खेद वाटला. तो म्हणा-ला, मला कोणीं पन्नास रुपये दिले असते तरी मीं हें झाड त्यास दिलें नसतें. झाडाची अशी दुर्दशा कोणीं केली ह्या-विषयीं त्यानें पुष्कळ चौकशी केली, परंतु चाकर माणसांतून कोणास हें ठाऊक नव्हतें, म्हणून ठिकाण लागेना.

इतक्यांत त्याचा मुलगा हातीं कुऱ्हाड घेऊन बागेंत आला. त्याला बापानें विचारिलें कीं, ह्या झाडाची साल कोणीं तासली हें तुला ठाऊक आहे? तेव्हां मुलगा क्षणभर गोंधळला, मग बोलला, बाबा, माझ्यानें खोटें बोलवत नाहीं. मींच आपल्या कुऱ्हाडीनें हें झाड तासलें. हें मुलाचें बोलणें ऐकून बाप गहिंवरला, आणि मोठ्या आवेशानें बाहू पुढें पसरून म्हणाला, ये माझ्या बेटा, मला मिठी मारूं दे. त्वां माझें झाड नासून टाकिलें ह्याचा मला कांहींच खेद नाहीं. तूं खरें बोललास इतक्यानें मला ह्या झाडाची हजारपटीहून अधिक किंमत

मिळाली, असें मी समजतों. रुप्याच्या कळ्यांचीं व सोन्याच्या फुलांचीं हजार झाडें आल्यापेक्षां ह्या प्रसंगीं तुझें बोलणें मला अधिक वाटतें.

हा लहान मुलगा ह्याच गुणानें पुढें अमेरिका खंडांतील एका मोठ्या देशाचा अधिकारी झाला. मुलांनो, हा लहान मुलगा, जार्ज वाशिंग्तन, असें म्हणाला कीं, माझ्यानें खोटें बोलवत नाहीं, असेंच जर तुम्हा सर्वांच्यानें म्हणवेल तर फार चांगलें होईल. जो उदार मुलगा सर्वदा खरेंच बोलतो, व दुसऱ्यास कधीं ठकवूं पाहत नाहीं, तो सर्वांस आवडतो.

धडा २९.

फुटलेला आरसा.

एका गृहस्थाचा मुलगा, वामन, आणि मुलगी, वेणू, हीं उभयतां मुलें एके दिवशीं दिवाणखान्यांत खेळत होतीं. तेथें एक आरसा ठेविला होता, तो त्या मुलांच्या लक्षांत नव्हता. खेळतां खेळतां वामनानें वेणूस सहज ढकलिलें, तों वेणूचा पाय आरशावर पडला. तेव्हां वेणू म्हणाली, दादा, कवट्यानें मला धक्का दिला, बरें, त्वां हा! तुझ्या धक्क्यानें माझा पाय आरशावर पडून आरसा फुटला. आतां कसें करावें ? बाबा आपणास मारतील, मी तुझें नांव सांगेन. मी म्हणेन कीं, दादानें आरसा फोडिला; मजकडे कांहीं नाहीं.

वामन म्हणतो, वेणे, खोटें बोलतेस काय ! मला बोलायाला तोंड नाहीं वाटतें! मी बाबाला शपथ वाहून सांगेन कीं, मी आरशाला शिवलों नाहीं; वेणूनें पाय देऊन

आरसा फोडिला, आणि मजवर आळ घालिते. वेणू म्हणते, अरे, माझ्या पायानें आरसा फुटला खरा, पण मीं बळें फोडिला, कीं त्वां मला ढकलिलें. म्हणून माझा पाय पडून फुटला, सांग बरें!

वामन म्हणतो, मीं नाहीं ढकलिलें, असें मी म्हणत नाहीं, खेळतांना एकमेकांस आपण ढकलितों, म्हणून आरशावर पाय द्यावा कीं काय! वेणू म्हणते, दादा, हें तुझें कुभांडीपणाचें बोलणें दिसतें. अरे, मी म्हणतें, माझा पाय आरशावर पडला, आणि तूं म्हणतोस, आरशावर पाय दिला. म्हणजे, मीं बळें आरशावर पाय दिला, असा तुझ्या बोलण्याचा भाव ना!

वामन म्हणतो, असो, तूं फोडिला काय आणि मीं फोडिला काय, एकच; पण आतां पुढें कसें करावें? बाबा मारतील ह्याची वाट काय! वेणू म्हणते, दुसरी वाट नाहीं. झालेला खरा मजकूर आपण बाबांस अगोदर कळवावा, म्हणजे झालें. मग रागें भरले तरी तितके भरणार नाहींत.

वामन म्हणतो, छी, तें कांहीं नव्हे. आपण अगदीं बोलूं नये. जाणो आपण त्या गांवचींच नव्हों. आपण येथून निघून बागेंत खेळावयास जाऊं, म्हणजे झालें. आरसा कोणीं फोडिला कोण जाणे. वेणू म्हणते, दादा, तुझी मसलत बरी दिसत नाहीं. आपण येथें खेळत होतों हें सगळ्यांस ठाऊक आहे. आरसा मुलांनीं फोडिला, हेंच खरें होईल. पहिल्यानें नाकबूल होऊन मग कबूल व्हावें त्यापेक्षा अगोदरच कबूल व्हावें हें चांगलें.

वामन म्हणतो, बरें तर, तसेंच कां होईना. पण बाबा

जवळ जाऊन सांगावयास मला भय वाटतें. आपण आईला जाऊन सांगूं. तिजपाशीं तरी मी बोलणार नाहीं. तूंच कसें तें बोल. वेणू म्हणते, चिंता नाहीं; तेंही बरेंच. आईपाशीं सांगितलें म्हणजे ती बाबांचा राग कमी करील. मग तीं उभयतां मुलें आपल्या आईकडे गेलीं.

त्यांची आई घरांत डाळ तांदूळ निवडीत बसली होती, तिच्याजवळ जाऊन तीं मुकाट्यानें बसलीं. प्रथम त्यांच्यानें कांहीं बोलवेना. अमळसा वेळ गेल्यावर आई त्यांस म्हणाली, मुलांनो, तुम्ही कांहीं बोलत नाहीं हें काय! आज मुक्याचें व्रत घेतलें आहे वाटतें. असें आई बोलतांच वेणूला रडण्याचा हुंदका आला, वामनही तिकडे डोळे चोळूं लागला. तें पाहून आई म्हणाली, वेणे कांगे रडतेस! वामना, कायरे झालें! तुम्हीं कोणाची खोडी केली म्हणून तुम्हांला कोणी रागें भरलें, किंवा कोणीं तुम्हांला मारिलें! काय तें मला सांगा, रडूं नका.

तेव्हां वेणू रडें आटोपून आईस म्हणाली, आई, आंज आम्हांपासून एक वाईट गोष्ट झाली— तूं रागें भरणार नाहींस तर सांगतें. आई म्हणाली, सांग, बेटा; भिऊं नको. वेणू म्हणाली, मघां दादा आणि मी दिवाणखान्यांत खेळत होतों, तेव्हां येथें आरसा आहे हें आमच्या लक्षांत आलें नाहीं. आणि माझ्या पायाचा धक्का लागून तो आरसा फुटला. आतां हें बाबांला समजलें म्हणजे ते आम्हांला मारतील, म्हणून आम्हांला भय वाटतें.

आई म्हणाली, असें झालें काय? असो, माझ्याजवळ

सांगितलें इतक्यानें बरें झालें. मुलांनो, आतां स्वस्थ असा, भिऊं नका. मी तुम्हांला मार बसूं देत नाहीं. तुम्ही कबूल नाकबूल जातां, तर बरीक मार बसला असता.

धडा १०.

चतरशिंगीची यात्रा.

नारायण आणि पांडू.

पांडू नारायणास म्हणतो, नारायणा, हे नवरात्राचे दिवस आहेत, ह्या दिवसांत चतरशिंगीची यात्रा भरत असते. उद्यां अष्टमी, शुक्रवार आहे, उद्यां तिसरे प्रहरीं चतरशिंगीस जाण्याचा आमच्या मंडळीनें बेत केला आहे. तूं येत असलास तर चल आम्हांबरोबर.

नारायण.—हो. मीं अजून चतरशिंगी पाहिली नाहीं. माझ्या मनांत जावयाचें फार आहे. ही यात्रा मोठ्या मौजेची व गमतीची आहे, असें ऐकतों.

पांडू.—अरे, मौज पर किती मौज म्हणून सांगूं! एक तर ह्या दिवसांत जिकडे तिकडे रान हिरवें गार दिसतें, व जागजागीं पाणी आढळतें. वाटेनें मंडळीच्या थाट दृष्टीस पडतो. कितीएक गाड्यांत बसून जातात; कितीएक घोड्यांवर बसून जातात; कितीएक पायांनीं जातात. तेथें गेल्यावर, देवळाजवळ बाजार बसला असतो तेथून लोक मेवा मिठाई घेऊन खातात. डोंगरावर इकडे तिकडे फिरून हवा घेतात. संध्याकाळपर्यंत तेथें मौजा मारून मग रमत रमत आपापल्या घराकडे परत जातात

नारायण.—असें आहे तर मी खचीत येईन मला

घेतल्याशिवाय तूं जाऊं नको. उद्यां मी घरीं तुझी वाट पाहत बसतों.

पांडू.—बरें तर, आम्ही निघालों म्हणजे तुला बोलावयास पाठवूं; पण तुला एक विचारितों तें सांग. उद्यां भाड्याच्या गाडींत बसून जावें असा बेत केला आहे. ह्याकरितां गाडीच्या खर्चाची व तेथें मेवा मिठाई वगैरे घेऊं त्याच्या खर्चाची वर्गणी येईल ती तूं देशीलना? दर असामीस सुमारें दोन आणे वर्गणी येईल असें वाटतें.

ना.— एवढें कठीण दिसतें. कां कीं, मजपाशीं एक पैसा देखील नाहीं, मग दोन आणे कोठचे असणार?

पांडू.— काय म्हणतोस? तुजपाशीं पैसा नाहीं! तुझी आई तुला पैसे देत नाहीं काय?

ना०— दर पंधरवड्यास उजळणीचे दिवशीं पंतोजीला देण्याकरितां एक पैसा देते. खाऊ किंवा दुसरें कांहीं मला लागेल तें ती बाजारांतून आणून देते. रोख पैसा माझ्या हातीं देत नाहीं, व मलाही त्याची गरज लागत नाहीं.

पांडू.— आई पैसे कोठें ठेविते ती जागा तुला ठाऊक आहे कीं नाहीं? ठाऊक असल्यास, तेथून दोन आण्यांचे पैसे घतले तर तिला समजणार नाहींत. तेथें तुला सांपडले नाहींत, तर कोणापासून उसने घे म्हणजे झालें.

ना०— अरे पांडू, तूं मला असें कसें सांगतोस? आईला नकळत तिचे पैसे मी घेऊं काय? मग मीं चोरी केली असें होईल-ना? चोरी करूं नये, लबाड बोलूं नये, असें आपला पंतोजी आपणास नेहमीं सांगतो, आपण ऐकतों. असें असून मग

आपण असें खोटें काम केलें, तर मग पंतोजीनें सांगितल्याचें व आपण ऐकल्याचें काय फळ? एक वेळ चोरी पचली म्हणजे पुढें तशीच चोरी करण्याची संवय लागते. मी पैसे चोरतों, असें आईस कळलें तर ती मला मारील, व मजवर माया करणार नाहीं. ह्यासाठीं, पांडु, तूं अशी मसलत मला देऊं नको. खर्चाची वर्गणी द्यावयास जर मजपाशीं पैसे नसले, तर मी गाडींत बसणार नाहीं, व मेवा मिठाई खाणार नाहीं, म्हणजे झालें. हें न केलें म्हणून मौज दृष्टीस पडण्यास कांहीं अंतर पडेल कीं काय?

पांडू— बरें, राहूं दे. तूं म्हणतोस तसेंच कां होईना; पण आम्ही गाडींत बसून जाऊं तेव्हां तुला गाडीबरोबर कसें चालवेल? आम्ही पुढें जाऊं, तूं मागें राहशील, तुझी आमची चुकामूक पडेल. मग माणसांच्या दाटीमध्यें तूं कोणीकडे जाशील, तुला मौज कोण दाखवील?

ना०— तर मग तुम्हां बरोबर न यावें हेंच बरें. माझ्या सारखा पायीं जाणारा सोबती मिळेल त्याजबरोबर मी जाईन.

धडा ३१.

झाडें, फुलें, आणि बीं.

बाप मुलास म्हणतो. पृथ्वीच्या पाठीवर माणसें, जनावरें, पांखरें, किडे, मासे, हीं राहतात. त्यांच्या साठीं देवानें भक्ष्य नेमिलें आहे, म्हणजे धान्यें, कंद, मुळें, गवत, आणि मांस. पण झाडांला त्यानें कोणतें भक्ष्य नेमिलें आहे?

मुलगा.— काय, झाडें खातात पितात? त्यांना खातां पितां कसें येईल? त्यांना तोंडें आहेत काय?

बाप.— होय, त्यांना तोंडें आहेत तर. त्यांच्या मुळांच्या शेवटाला बारीक बारीक भोंकें असतात तींच त्यांचीं तोंडें. त्यांचें भक्ष्य म्हटलें म्हणजे मातीचा रस आणि पाणी हें आहे. हें भक्ष्य तीं आपल्या तोंडांनीं शोषून घेतात. त्यांच्या योगानें खोड, खांद्या, ढाळ्या, पानें, आणि कळ्या ह्यांचें पोषण होतें.

मु०— जर पाऊस पडला नाहीं तर झाडांस पाणी मिळा- वयाचें नाहीं. तेव्हां त्यांनीं काय करावें?

बाप— खरी गोष्ट. उन्हाळ्यांत जमीन कोरडी पडते तेव्हां आपण लहान झाडांवर दया केली पाहिजे. ती हीच कीं नदींतून, तळ्यांतून, किंवा विहिरींतून पाणी आणून त्यांस घालावें, म्हणजे तीं आपल्या तोंडांनीं तें पाणी पिऊन जातात. मग कोमेजलेलीं पानें व फुलें टवटवीत होतात. पाणी लहान मुलांस जसें आवडतें तसें झाडांस आवडतें. तसाच झाडांस स्वच्छपणा फार आवडतो. पहा, पावसानें झाडांवरचा मळ धुऊन गेला म्हणजे त्यांस अधिक टवटवी येते. ह्याकरितां झाडांस पाणी घालतांना मुळांशीं घालून वरही शिंपडलें पाहिजे.

मु०— झाडांचीं तोंडें आपल्या दृष्टीस पडतात काय?

बा०— तें पिंवळ्या फुलांचें झाड दिसतें तें उपटून मजकडे आण. आतां सांग ह्यांत काय काय आहे तें?

मु०— ह्याला संभाळून धरणारीं मुळें दिसतात, पण त्यांचीं भोंकें दिसत नाहींत.

बा०— तीं भोंकें इतकीं बारीक आहेत कीं यंत्रावांचून नुसत्या डोळ्यांनीं दिसावयाचीं नाहींत. पण आणखी काय दिसतें?

मु०— मुळांच्यावर हिरवीं पानें दिसतात. त्यांतून निघा-लेला एक बारीक देंठ दिसतो, आणि त्यावर एक नामी फूल दिसतें; पण बीं कोठें दिसत नाहीं.

बा०— फूल वाळून गळेपर्यंत बीं दिसावयाचें नाहीं. फूल गळल्यावर बीं पिकून वाळून कठीण होतें.

मु०— बियाचा उपयोग काय बरें ?

बा०— बियांत लहान लहान नवीं झाडें असतात. बीं भुईत घातलें म्हणजे मऊ होऊन फुगतें. मग कांहीं वेळानें त्यांतून दोन पानें निघतात. त्याच्या मधून एक देंठ वर येतो, आणि एक लहानसें मूळ खालीं जातें. ह्या प्रमाणें त्या बियाचें नामी रोप होतें. मग त्याला पानें, फुलें येतात.

मु०— तीं फुलें कोणत्या रंगाचीं होतात ?

बा०— बीं कोणत्या रंगाच्या फुलाचें, हें समजल्यावांचून सांगतां येणार नाहीं. ज्या ज्या रंगाच्या फुलाचें बीं असेल त्या त्या रंगाचीं फुलें पुढें यावयाचीं.

मु०— मोठीं झाडें देखील लहान बियापासून होतात काय ?

बा०— हो, होतात तर. तें वडाचें मोठें झाड पहा. त्याच्या खांद्या किती लांब लांब पसरल्या आहेत. तें येवढें झाड किती एक वर्षांमागें एका लहानशा बियांत मावलें होतें.

मु०— बियाचा दुसरा उपयोग कोणता आहे ?

बा०— कांहीं बियें खाण्याच्या उपयोगाचीं आहेत, असें, बाजरी, गहूं, तांदूळ, हरभरे, वगैरे. ह्यांस आपण धान्य म्हण-तों. आणि भाकरी, पोळ्या, भात, इत्यादि पदार्थ करून आपण

खातों. कितीएक बियें पांखरांच्या उपयोगीं पडतात.

मु०— आपण माणसांनीं व पांखरांनीं सगळीं बियें खाऊन टाकिलीं, तर नवीं रोपें कोठून होतील!

बा०— ईश्वरकृपेनें सर्वांस पुरून उरावयाजोगीं बियें उत्पन्न होतात.

मु०— बियाचें रोप कसें होतें, देंठ वर कसा येतो, मूळ खालीं कसें जातें, फूल कसें येतें, तें गळल्यावर बीं कसें पिकतें, हें सगळें माझ्या दृष्टीस पडेल तर मोठी मौज होईल.

बा०— हें पहावयाची तुला इच्छा असली, तर बीं भुईंत घालून दमानें वाट पाहत बसशील, आणि बारीक दृष्ट लावून पाहशील, तर ह्या सर्व गोष्टी तुझ्या दृष्टीस पडतील.

धडा ३२.

कलमी आंबे.

एका खेडेगांवचा रामराव देशमुख एके दिवशीं धान्य विकावयास कसब्यांत गेला होता. त्यानें परत येतांना पिकलेले पांच कलमी आंबे विकत आणिले. त्याला चार मुलगे होते, सदू, हरी, विठू, आणि गणू. त्या चौघांस हाक मारून देशमुख म्हणाला, मुलांनो, मीं कसब्यांतून पिकलेले पांच कलमी आंबे आणिले आहेत. तुम्हां चौघांसाठीं चार, आणि तुमच्या आईसाठीं एक, हे घ्या.

हें ऐकून मुलांस मोठा हर्ष झाला. त्यांनीं पूर्वी कधीं कलमी आंबे पाहिले नव्हते. तीं म्हणालीं, असें सुंदर फळ कधीं आमच्या दृष्टीस पडलें नाहीं. संध्याकाळीं निजावयाची वेळ

झाली तेव्हां बापानें मुलांस विचारिलें, कां मुलांनो, मला दिलेले आंबे तुम्हांस कसे लागले!

वडील मुलगा, यदु, म्हणाला, बाबा, तो मला फार चांगला लागला. त्यांतील रस किती गोड होता म्हणून सांगूं! तें फळ मोठें नामी खरें. त्याची कोय मीं जपून ठेविली आहे. लावण्याची वेळ आली म्हणजे ती मी भुईत लावीन. मग त्याचें झाड होईल, त्यापासून मला पुष्कळ आंबे सांपडतील.

बाप म्हणाला, शाबास मुला, तूं विचारवंत व पुढची तरतूद करणारा आहेस, खरा. शहाणा कुणबी अशीच पुढची तजवीज करीत असतो. मग सर्वांत धाकटा मुलगा, गणु, म्हणाला, मीं आपला आंबा तेव्हांच खाल्ला, आणि कोय फेंकून दिली. शिवाय, आईनें आपल्या आंब्यांतून अर्धा आंबा मला दिला, तोही मीं खाल्ला. त्याची काय गोडी सांगूं! आणि तो तोंडांत घालतांच लोण्यासारखा विरघळला.

बाप म्हणाला, हें त्वां शहाणपणाचें काम केलें नाहीं; पण तूं लैहानच आहेस, म्हणून हें शोभलें; तुझ्यासारख्या लहान मुलांकडून अशीच गोष्ट व्हावयाची. तूं मोटा होशील तेव्हां तुला बरें वाईट कळूं लागेल.

दुसरा मुलगा, हरी, हा बोलला, बाबा, मीं जें केलें तें विचारानें केलें. पहा, गणूनें जी कोय फेंकून दिली ती मीं उचलून घेतली आणि ती फोडून तिच्यांतला मगज खाल्ला; तो मला फार गोड लागला. आणि माझ्या वांट्यास जो आंबा आला होता तो मीं विकला. त्याचे पैसे इतके मिळविले कीं कसब्यांत त्या पैशांनीं चार आंबे मिळतील. हें ऐकून बापानें

हिरमुसलें तोंड केलें. तो म्हणाला, तूं आपल्या मतें हें विचारानें केलें खरें, तरी हें तुझें करणें मला आवडलें नाहीं. मुलांनीं विचारानें वागावें, परंतु हावरेपणा व अधाशीपणा करूं नये. तुझा लहान भाऊ, गणू, ह्यानें केलें तसें जरी तूं करतास तरी मला पुरवतें; पण हें मला बरें वाटलें नाहीं.

तिसरा मुलगा, विठू, जवळ होता तो कांहीं बोलला नव्हता. त्याकडे वळून बाप त्यास म्हणाला, विठू, तूं आपल्या आंब्याचें काय केलें? विठू म्हणाला, काय बाबा, मी? आपला शेजारी महादू दुखणेकरी आहे, त्याच्या आंगाची तापानें आग होत असते, व त्याला वारंवार तहान लागते, म्हणून मला वाटलें कीं, हा आंबा त्याला नेऊन द्यावा. हा त्यानें खाल्ला तर त्याला अमळ बरें वाटेल. म्हणून मी त्याजकडे आंबा घेऊन गेलों. पण तो घेईना; तेव्हां आंबा बळेंच त्याच्या बिछान्यावर ठेवून तसाच मी निसटून आलों. विठूचें हें बोलणें ऐकून बापाचे डोळे आनंदाच्या आसवांनीं भरून आले. मग बाप म्हणाला, मुलांनो, आतां मला सांगा बरें कीं तुम्ही चौघांतून आपला आंबा चांगल्या कामीं कोणीं लाविला तें? तेव्हां सदू, हरी, व गणू हे तिघे एकदम ओरडून बोलले, विठयानें, विठयानें. विठू उगाच होता, कांहीं बोलला नाहीं. पण त्याच्या आईनें त्याचा मुका घेतला, त्या वेळेस तिच्या अंतःकरणास जो आनंद वाटला तेणेंकरून तिचे डोळे पाण्यानें भरून आले. तें पाहून विठूला जो आनंद झाला तो तसले वीस आंबे दिल्यानें झाला नसता.

धडा ३३.

विद्येची प्रशंसा.

आर्या.

सर्वधनाहुनि विद्या,[६५] धन याची योग्यता[६६] असे मोटी ॥
दिधल्या[६७] वाचुन कोणी, मिळवीन म्हणेल गोष्टि हे खोटी ॥१॥
विद्याचि भूषण[६८] नरा, व्यर्थ अलंकार रत्न हेमाचे[६९] ॥
भूषविले खर[७०] मर्कट,[७१] भूषण[७२] भारेंहि काय कामाचे ॥२॥
विद्या नाहीं ज्याला, तो नर जीवंत असुनही मेला ॥
केला[७३] किमर्थ विधिनें,[७४] म्हणती जन्मूनही फुकट गेला ॥३॥
निर्विद्य[७५] नराहुन बहु, खर[७०] कामा येतसे मनुष्याला ॥
खाया काळ भुईला, भार असें निंदितात जन त्याला ॥४॥
विद्या फळ देते तें, कोणाच्यानेंहि देववेना[७६] कीं ॥
विद्यायोगें गौरव,[७७] येथें[७८] तैसाच होतसे नाकीं[७९] ॥५॥
विद्या न करुनि लोकीं, होऊं नये मानवें पशुसमान[८०] ॥
मान नसे कोहि तया,[८१] आहे लोकांत जो पशुस मान ॥५॥
विद्याहीन नराला, इहपरलोकींहि गति नसे बरवी ॥
बरवी[८२] दुःख अविद्या,[८३] त्याची सर्वत्र दुर्दशा करवी ॥६॥
यास्तव तुज हें कथितों, विद्या संपादुनीच बरवा[८४] हो ॥
मग कल्याणनदीचा, संतत बा[८५] लोट[८६] तूजवर वाहो[८७] ॥७॥

धडा ३४.

चांगली बुद्धि.

एका गृहस्थास रामचंद्रनामें एक मुलगा होता, त्याचें वय अगदीं थोडें असून त्याची बुद्धि फार चांगली होती. रामचंद्र

हा बापाचा एकुलता एक मुलगा होता. त्यास लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें, कारण कीं तो कधीं शाळेंत गेला नव्हता; परंतु तो समजत होता कीं विद्याहीन असणें हें चांगलें नव्हे; ह्यास्तव आपणास विद्या यावी अशी त्यास मोठी इच्छा झाली.

पहिल्यानें गुरूनें सांगितलेलें रामचंद्रास चांगलें समजत नसे, परंतु कांहीं काळ विद्याभ्यास केल्यावर त्याला चांगलें समजूं लागलें. त्याच्या बरोबरचे शिकणारे जितके होते त्या सर्वांपेक्षां तो लहान असतां विद्येनें त्यांमध्यें पहिली जागा पावला.

त्याच्या तोंडांतून वाईट शब्द कधींही निघत नसे, आणि वाईट काम त्याजकडून कधींही घडत नसे, आणि तो सर्वदां अवघ्या मुलांशीं प्रीतीनें बोलत असे. ह्यास्तव त्यास शिक्षा करण्याचा प्रसंग गुरूस कधींच आला नाहीं. तो तीन वर्षें शाळेंत राहून फार चांगलें शिकला. तो जें शिकला त्यांत त्याची तयारी पाहून त्याचे आईबाप व भाऊबंद त्याजवर फार प्रीति करूं लागले.

एके दिवशीं तो शाळेंतून आल्यावर त्याच्या बापानें त्यास खाऊकरितां चार पैसे दिले. ते घेऊन मोठ्या आनंदानें तो बाजाराकडे चालला, आणि वाटेनें जात असतां विचार* करूं लागला कीं, बाजारांत जाऊन काय जिन्नस घ्यावा? खेळायाचा जिन्नस तर मला नको; मिठाई घेतली तर ती खातां खातां सरून जाईल; तिचा पुढें कांहीं उपयोग नाहीं. तर ह्या पैशांचे कागद विकत घ्यावे, म्हणजे मी घरीं असेन त्यावेळेस जें शिकलों असेन तें त्या कागदावर लिहून ठेवीन, तेणेंकरून माझें शिकणें दृढ होईल.

असा विचार करून बाजारांत गेल्यावर खिशांत पैसे पाहतो तों पैसे नाहींत. खिशास भोंक होतें त्यांतून ते गळून पडले होते. तें पाहून तो फार रडूं लागला, आणि आल्या वाटेनें पैशांचा शोध करीत माघारा चालला. वाटेनें रडत चालला आहे, इतक्यांत कोणी साहेब तेथें आला, आणि मुलगा कां रडतो हें समजून घेऊन त्यास दटावल्यासारखें करून म्हणाला, मुला, चल मजबरोबर. रामचंद्रानें ते शब्द ऐकतांच डोळे उघडिले, आणि साहेबाची रागीट मुद्रा पाहून भयानें रडणें सोडिलें.

साहेबाचें घर जवळच होतें, तिकडे साहेबाबरोबर रामचंद्र गेला. त्यास साहेबानें विचारिलें कीं, तूं कां रडत होतास? रामचंद्र बोलला, आज मी शाळेंतून घरीं आल्यावर बापानें मला चार पैसे दिले, ते घेऊन बाजारांत कागद घ्यावयाकरितां निघालों तों वाटेनें पैसे मजकडून हरवले, म्हणून मी रडत होतों.

साहेबानें त्याचें बोलणें ऐकून घेऊन त्या मुलास दोन आण्याचे पैसे दिले, आणि सांगितलें कीं, ह्या पैशांचे कागद किंवा दुसरें कांहीं जें तुला पाहिजे तें विकत घे. रामचंद्रानें पैसे पाहतांच संतुष्ट होऊन, डोळे पुसून, साहेबास सलाम केला. मग तो बाजारांत जाऊन कागद विकत घेऊन घरीं गेला. आणि झालेलें वर्तमान आईबापांस सांगता झाला. ह्यापासून त्यास किती आनंद झाला असेल बरें!

सारांश, मुलांनीं ह्याप्रमाणें चांगली बुद्धि धरून आईबापांच्या अंतःकरणास वारंवार आनंद द्यावा, हा त्यांचा धर्म होय.

धडा १५.

दक्षिण महासागरांतील बेटांत राहणारा मनुष्य आणि बोलणारा ढलपा.

दक्षिण महासागरांत पुष्कळ बेटें आहेत त्यांतील लोक थोड्या वर्षांमागें अगदीं रानटी होते. त्यास धर्माचा उपदेश करण्याकरितां, आणि त्यास विद्या व कारागिरीचीं कामें शिकविण्याकरितां इंग्लंदांतून कितीएक मिशनरी लोक तिकडे गेले. त्यांनीं जे उद्योग केले त्याच्या योगानें बहुत लोक खिस्ती झाले व सुशिक्षित झाले. त्या मिशनरी लोकांपैकीं विल्यम्स ह्या नांवाचा कोणी होता त्यानें तेथील एका मनुष्याविषयीं एक चमत्कारिक गोष्ट लिहून ठेविली आहे, ती अशी.

मी एके दिवशीं इमारत बांधण्याच्या कामावर गेलों तेव्हां आपला गुण्या बरोबर घ्यावयास विसरलों. त्याची मला फार गरज लागली म्हणून भुईवर ढलपे पडले होते त्यांतून एक ढलपा घेऊन त्यावर कोळशानें मीं आपल्या बायकोस लिहिलें कीं, गुण्या पाठवून द्यावा, आणि तेथील कोणी बडा लोक आमच्या हाताखालच्या कामगारांची देखरेख करीत होता त्याला हाक मारून मी म्हणालों कीं, गड्या, हा ढलपा माझ्या बायकोपाशीं नेऊन दे.

तेव्हां त्यानें तो ढलपा हातीं घेऊन मला विचारिलें कीं, मीं तुमच्या बायकोपाशीं काय बोलावें! मग म्यां उत्तर केलें कीं, तुला कांहीं बोलावयाचें कारण नाहीं, माझ्या मनांतला अभिप्राय तिला ढलपा सांगेल. तेव्हां धिक्काराची व आश्चर्याची मुद्रा


दाबवून तो म्हणाला, हा ढलपा कसा सांगेल? ह्याला काय तोंड आहे? ह्याला काय बोलतां येतें? मग मी त्यास बोललों कीं, उगीच हुजत करून वेळ घालवूं नको, ढलपा घेऊन लवकर आ. तेव्हां तो ढलपा घेऊन माझ्या घरीं गेला, आणि बायकोच्या हातीं तो दिला. तिनें तो ढलपा हातीं घेऊन त्याजवर जें लिहिलें होतें तें वाचून पाहून ढलपा टाकून दिला, आणि माझ्या हत्याराची पेटी होती तिकडे जाऊन तींतून गुण्या काढिला. माझी बायको काय करिते हें पाहण्यासाठीं तो बडालोक तिच्या मागोमाग गेला.

माझ्या बायकोनें गुण्या त्याच्या हातीं दिला तेव्हां तो म्हणाला, थांबा बाई, विल्यम्स साहेबास हेंच पाहिजे म्हणून तुम्हाला कशावरून समजलें? तिनें उत्तर केलें कीं, तूं आतांच ढलपा आणून माझ्या हातीं दिला नाहीं काय? मग तो बडा मनुष्य मोठें आश्चर्य पावून बोलला, होय, मीं ढलपा आणून दिला खरा, परंतु तो बोलतांना म्यां कांहीं ऐकिलें नाहीं. माझी बायको म्हणाली, त्वां नाहीं ऐकिलें पण मीं ऐकिलें; कांतर, माझ्या नवऱ्याला जें काय पाहिजे होतें तें त्यानें मला कळविलें. आतां तूं इतकेंच कर कीं हा गुण्या घेऊन लवकर परत आ.

हें ऐकून तो बडा मनुष्य आवेशानें उडी मारून घरांतून बाहेर पडला, आणि एका हातानें गुण्या आणि एका हातानें तो पडलेला ढलपा उचलून घेऊन हात उंच करून गांवच्या रस्त्यांतून धांवत चालला; आणि धांवतां धांवतां बोलला कीं, पहा हें या इंग्रज लोकांचें शहाणपण! यांस ढलपे देखील बोलके करितां येतात.

धडा ३६.

तारूं.



पाण्यावर. तरण्यासाठीं द्रोणाच्या आकाराचें लाकडाचें जें मोठें पात्र करितात त्यास तारूं म्हणतात. तारवें बहुत करून सागवानी लाकडाचीं करितात. त्याचा आपणा मनुष्यांस फार उपयोग आहे. जर तारवें नसतीं तर पाण्यातून एका देशाहून दुसऱ्या देशास जाण्या येण्यास लोकांस मोठीच अडचण पडली असती; देशोदेशींचे नानाप्रकारचे पदार्थ पृथ्वीच्या सर्व भागांवर पसरले नसते; आणि लोकांच्या ज्ञानाची वृद्धि झाली नसती.

खाडींतून जवळच्या गांवास जावयासाठीं जीं लहान तारवें करितात त्यास होडी, तर, मचवा, पडाव, डोणी, पनेक, भर्षी

णवें असतात. लहानशा समुद्रांतून जाण्या येण्यासाठीं मध्यम प्र-तीचीं जीं तारवें करितात त्यांस महागिरी, शिबाड, बतेला, जहाज, अशीं नांवें असतात. आणि जीं तारवें मोठ्या समुद्रांत फिरतात व द्वीपांतरास जातात तीं फार मोठीं असतात, त्यांस तिरकती तारूं अगर तिरकती जहाज म्हणतात.

इंग्लंद देशांत उंच प्रतीचीं मोठमोठालीं तारवें करितात. तीं तारवें हजारों खंडींचें वजन रहावयाजोगीं असतात. तेथें ओक नांवाच्या झाडाच्या लांकडाचीं जीं तारवें बांधितात, तीं उत्तम प्रतीचीं असतात. वाफेच्या बळानें जीं तारवें चालतात त्यांस आगबोटी म्हणतात. इंग्लिश लोक येवढ्या योग्यतेस चढले ह्याचें एक कारण त्यांचीं तारवें असें म्हणतात.

मोठमोठ्या तारवास दोन दोन डोलकाठ्या असतात. फारच मोठीं असलीं तर त्यांस तीन डोलकाठ्या असतात. साधारण मध्यम प्रतीच्या तारवास एक डोलकाठी असते. वारा धरण्याकरितां डोलकाठीस शीड लावितात. तें शीड खादीचें किंवा पडमाचें शिवून करितात. मोठीं तारवें शिडाच्या योगानें चालतात. शीड नसलें तर तीं चालावयाचीं नाहींत. घोडें चालवावयास जसा त्याचा लगाम, तसें तारूं चालवावयास त्याचें सुकाणूं आहे. सुकाणूं जसें फिरवावें तसें तारूं इकडे तिकडे वळतें. तारवाच्या मागल्या अंगास सुकाणूं बांधलेलें असतें, आणि पुढल्या भागास नांगर बांधिला असतो, त्या भागास नाळ म्हणतात. नाळी कडील भाग तो तारवाचा अग्रभाग. नांगर लोखंडाचा फार वजनदार असतो. त्याला लांब सोल किंवा जाड साखळदंड बांधलेला असतो. तारूं

बंदरांत आलें म्हणजे, किंवा जेथें ओरवा करावयाचा तेथें आलें म्हणजे, नांगर खालीं सोडितात. तो नांगर पाण्याच्या तळीं चिखलांत जाऊन रुतून राहतो. तेणें करून तें तारूं खांबास बांधल्यासारखें तेथेंच खुंटून राहतें. मग जेव्हां तारूं हाकारावयाचें तेव्हां तो नांगर उचलून वर ओढून घेतात. आणि शीड चढवितात म्हणजे तें चालूं लागतें.

लहान नांगरास कोळी लोक लोली किंवा लोयली असें म्हणतात.

लहान होड्यांस डोलकाठ्या आणि शिडें नसतात. त्यांस चालविण्याकरितां वल्हीं असतात. एकेक वल्हें तीन चार हात लांब असून शेवटास कलथ्या सारखें पसरट असतें. अशी होडी लहान मोठी असेल त्याप्रमाणें दोन, चार, सहा, आठ, दहा असे वल्हें मारणारे असतात.

धडा ३७.

घर बांधणें.

घर बांधावयास अगोदर जमीन पाहिजे. मग माती, चुना, दगड, विटा, तुळया खांब वासे वगैरे लांकडें, खिळे कीलें वगैरे सामान पाहिजे. घराच्या आरंभीं पहिलें काम पाया खणीयाचें हें आहे. घर जितकें उंच बांधावयाचें असेल तितक्या बेतानें खोल पाया खणला पाहिजे. मग तो पाया दगड चुन्यांत बसवून किंवा चिखलांत बसवून भरून काढिला पाहिजे. पाया भुईबरावर भरून आला म्हणजे त्यावर कच्चा विटांच्या किंवा पक्क्या विटांच्या अगर दगडांच्या भिंती उभारितात. भिंतीला मातीचा किंवा चुन्याचा गिलावा करितात.

घरास जसे मजले करावयाचे असतील तशा भिंती उंच बांधितात. एकमजली किंवा दुमजली घरें फार असतात तिमजली त्यांहून थोडीं, चार मजली त्यांहून थोडीं असतात. पांचमजलीं घरें क्वचित् कोणी बांधितो. पांच मजल्यांहून अधिक मजले घरास कोणी करीत नाहींत. पहिला मजला जमिनीवरच असतो. जोत्यावर खांब उभे करून त्यांवर तुळया ठेविल्या म्हणजे पहिला मजला झाला. ह्या प्रमाणेंच पाहिजेत तितके मजले एकावर एक चढवितां येतात. वरच्या प्रत्येक मजल्यास माडी म्हणतात. माडीवर जावयास जिने किंवा शिडया करितात. पहिल्या मजल्याची भुई जमीन खणून तिजवर मुरूम पसरून चोपण्यानें चोपून सारखी करितात. वरच्या मजल्याची भुई करावयाची ती तुळयांवर कडया पसरून ही तक्तपोशी करितात त्या तक्तपोशीवर मातीचा पेंड घालून भुईसारखी करितात. बाहेरच्या अंगास जाण्यायेण्यासाठीं दारें करितात; आणि वारा व उजेड येण्याकरितां खिडक्या करितात.

घराच्या अगदीं वरच्या भागास घर झांकण्या करितां खपरेल करावें लागतें. खपरेल करावयास खांबण्या, आढें, पांखाड्या वासे, ओंबण, आणि कवलें इतकें सामान लागतें. खपरेलानें घराचें रक्षण होऊन ऊन, वारा, पाऊस ह्यांपासून माणसांचें रक्षण होतें. कितीएक एकमजली घरावर गवताचें छपर घालितात. कवलारू घरावर ओंबण घालितात. त्याचे दोन प्रकार आहेत. एक रिपांचें ओंबण आणि दुसरें कारव्या किंवा बांबू ह्यांचें ओंबण. रिपा करण्याची कृति अशी आहे कीं तक्ते उभे चिरून त्यांच्या चार चार बोटें रुंदीच्या फाका करितात.

त्या रिपा वांशावर चुकांनीं बसवितात. कारव्यांचें किंवा बांबूचें ओंवण वांशावर ताटी सारखें दोरीनें बांधितात. त्यावर कवलें किंवा नळे घालितात. कवलें आणि नळे कुंभार करितात. लांकडें तासावयाचें काम सुतार करितात, भिंती बांधावयाचें काम गंवडी करितात. दगड घडावयाचें काम पाथरवट करितात. खिळे, कड्या, कोंयडे, वगैरे लोखंडी जिन्नस घडावयाचें काम लोहार करितात. शिवाय खटपटीचें काम मजूर लोक करितात. इतके लोक खपतात तेव्हां घर तयार होऊन आपणास राहावयास मिळतें.

धडा ३८.

पागोटें.

डोक्यास कांहीं तरी आच्छादन अगर भूषण घालावें अशी सर्व मनुष्यजाती मध्यें चाल आहे. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, वगैरे टोप्या घालतात, मुसलमान लोक फेटा बांधितात, हिंदुस्थानी लोक पटका बांधितात, मोंगल लोक लोंकरीचे टोप घालितात. मद्रासी लोक रुमाल बांधितात, आणि दक्षिणी लोक व गुजराथी लोक पागोटीं घालितात. पागोटीं पुरुष घालितात, बायका घालीत नाहींत.

पागोटें हें वस्त्रां पैकींच एक वस्त्र आहे. हें सुताचें विणून करितात. पागोट्याची रुंदी सुमारें एक हातभर असते; आणि लांबी पंचवीस हातापासून शंभर हातांपर्यंत असते. पागोट्याचे रंग तऱ्हे तऱ्हेचे असतात. तांबडा, कुसुंबी, आबाशी, अस्मानी, नारंगी, विस्ताई, हिरवा, निळा, सांवळा, पिवळा, केशरी, निंबोळी,

किरमेजी, काबळी, काळा, प्याजी, गुलाबी, तपकिरी, कंदी, अनारदाणी, पांढरा, वगैरे.

पागोट्याच्या दोन्ही शेवटांस पदर असतात; पदरास थोडा किंवा फार कलाबतू असतो. कितीएक उंची पागोट्यास बाहेरचा पदर शोभेकरिता कलाबतूचा वीत किंवा दीड वीत असतो. कितीएक पागोट्यास नारळी पदर असतो. कितीएकास कलाबतूचा साधा गोल असतो; तो एक बोटापासून आठ बोटें रुंदीचा असतो. किती एकास दोन्ही शेवटास तीन चार बोटें कलाबतूची साधी पट्टी असते.

पागोटीं पुष्कळ ठिकाणीं होतात. चंदेर, पैठण, बीड, नागपूर, बऱ्हाणपूर, सगर, शहागड, येवलें, महेश्वर, धनवड, वगैरे ठिकाणचीं पागोटीं नामांकित असतात. त्यांत चंदेरी पागोटीं आणि पैठणी पागोटीं मुख्य आहेत. चंदेरी पागोट्याचें सूत फार बारीक असतें. त्याला रंग नसतो, तें पांढरेंच असतें. त्याचा पदर जरीचा साधा असून तीन चार बोटें रुंदीच्या पट्टीचा असतो. पैठणी पागोटें बहुतकरून रंगदार असतें, आणि त्याचा जरी पदरही चांगला मोठा असतो.

पागोटीं बांधण्याचे देशोदेशच्या खालीप्रमाणें पंधरा वीस प्रकार आहेत. ब्राह्मणी, परभी, पठाणी, कंगणीदार, हलबेली, सरदारी, शिलेदारी, शिंदेशाई, देसाई, शिपाइगिरी, मराठी, भंडारशाई, वाणीशाई, भाटेशाई, मुलतानी, भंगसाळी, वगैरे. ज्याचें पागोटें त्यानें स्वतां बांधावें हा उत्तमपक्ष, परंतु सर्वांस पागोटें बांधितां येत नाहीं. ज्याला बांधितां येत नाहीं त्याला आपलें पागोटें दुसऱ्याकडून आर्जवानें किंवा पैसे देऊन बांधून

घेणें भाग पडतें. पैसे घेऊन पागोटें बांधून यावें असा धंदा करणाऱ्या मनुष्यास पगडबंद म्हणतात. पागोटें डोकीवर किंवा गुडघ्यावर बांधितात. गुजराथी लोक लाकडाच्या ठोकळ्यावर पागोटीं बांधितात.

हिंदुलोकांत वस्त्रांमध्यें पागोटें हें पुरुषास मुख्य मानिलें आहे. एखाद्यास पागोटें कोणीं दिलें असतां त्याचा त्यानें मोठा सन्मान केला असें समजतात.

धडा ३९.

साखर.

साखर ही ऊंसापासून करितात. साखरेची रुचि गोड आहे. साखर दोन प्रकारची असते. एक खडी साखर आणि एक पिठी साखर. खडी साखरेचे खडे कांचेच्या तुकड्या सारखे कठीण व चकचकीत दिसतात; परंतु ते तोंडांत घातले असतां विरघळून त्याचें पाणी होतें. पिठी साखर पिठासारखी असते. तिचे अनेक प्रकार आहेत. दुबोटा, फुलगोटा, चिनी, भुरी, मगदुमी, गुळी, इत्यादि. साखर कशी करितात तें सांगतों.

प्रथम फडांतून ऊंस कापून आणितात. त्याचा पाचोळा सोलून त्याचीं वाढें तोडून टाकितात. मग ते ऊंस चरकांत घालून त्याचा रस काढितात. नंतर तो रस लोखंडाच्या मोठ्या काहिलींत घालून ती काहील चुलाणावर ठेवून, तिच्या खालीं जाळ लावून, तो दाट होई पर्यंत उकळवितात. रसाचा पाक कच्चा ठेविला असतां त्याला काकवी म्हणतात. त्याहून कांहीं ज्यास्त उकळविला असतां राब म्हणतात. पांक पक्का

घटला म्हणजे पक्क होतो. साखर करावयाची असते तेव्हां त्या पाकांत बेहड्याची राख किंवा नाचण्याचें पीठ घालितात. तेणेंकरून पाकांतील मळ वर येतो तो शिंप्यानें काढून टाकितात. असें केल्यानें पाक स्वच्छ आणि रवाळ होतो. मग तो पक्का झालेला पाक घोटून घोटून कोरडा करितात म्हणजे ती साखर झाली. पाकांतील मळ जसा जसा अधिक काढावा तसतशी साखर अधिक पांढरी होते.

वसई, राजापूर, पट्टण, इत्यादि ठिकाणीं साखर करितात, पण ती फार चांगली नसते. उत्तम प्रतीची साखर म्हटली म्हणजे बंगाला, चीन, अमेरिका, येथें करितात. तेथें साखर करण्याचीं यंत्रें आहेत. त्या यंत्रांच्या योगानें हजारों खंड्या पिठी साखर, खडीसाखर, उत्तम प्रतीची करितात. साखर व्यापारा करितां दूर देशास न्यावयाची तेव्हां कोथळींत किंवा पेटींत भरून त्या कोथळ्या किंवा पेट्या जहाजांत घालून नेतात. लोक साखरेचा उपयोग औषधाकडे करितात. त्याहून पक्वान्ना कडे फार करितात. खावयाच्या उत्तम पदार्थांत साखर हा पदार्थ मुख्य मानिला आहे. साखर कोणास आवडत नाहीं असें नाहीं. गोड पदार्थांत साखरे सारखा पदार्थ नाहीं. गोड पदार्थांत साखर मुख्य आहे.

धडा ४०.

कबूतर.

कबूतर म्हणून पांखरांत एक जात आहे. कबूतर दिसण्यांत सुंदर असून स्वभावानें अगदीं गरीब असतें. कबूतरें बहुत-करून मनुष्याच्या आश्रयावांचून रानांत स्वतंत्रपणानें राहत

नाहींत; कितीएक हौशी लोक कबूतरें आपल्या घरांत बाळगि-तात. कबुतरासाठीं जें घर करितात त्यास खुराडें म्हणतात. एका खुराड्यांत पुष्कळ कबूतरें राहतात. कबूतरांत नर मादी असे जोडे असतात. प्रत्येक जोड्यास खुराड्यांतील जी जागा नेमून दिली असते त्या जागेंत तो जोडा नेमानें बिनचूक जाऊन बसतो. तो दुसऱ्याच्या जागेंत जात नाहीं, व दुसऱ्याला आपल्या जागेंत येऊं देत नाहीं. ज्या घरामध्यें कबूतरें राहतात तें घर सोडून तीं कधीं जावयाचीं नाहींत. त्याचा धनी रोज दोन वेळ त्यांस बाहेर सोडितो, व त्यांस उडवितो. तीं सर्व मिळून एकदा कळप करून इकडे तिकडे घटका दोन घटका उडून परत आपल्या खुराड्या पाशीं येतात. मग धनी त्यांस दाणा पाणी देऊन पुन्हा खुराड्यांत कोंडितो. अनेक ठिकाणचे कळप उडतांना एकमेकांत जरी मिसळले तरी ते खालीं उतर-तांना वेगळे वेगळे होऊन आपापल्या घरास येतात. कबूत-राची वीण लौकर लौकर होते. तीन तीन महिन्यांनीं दोन तीन अंडीं मादी घालिते. एका जोड्याचीं एका वर्षांत दहा बारा कबूतरें तयार होतात.

कबूतरांचे रंग अनेक प्रकारचे असतात. पांढरीं सफेत कबू-तरें असतात त्यांस कागदी म्हणतात. कांहीं खैरी असतात, कांहीं बांडीं असतात, कांहीं लाल असतात, कांहीं अगदीं काळीं असतात, कांहीं पोटाकडे पांढरीं आणि पाठीकडे काळीं अशीं असतात, त्यास शिराजी म्हणतात. कितीएकास शेंडी असते, त्यांस चुडेल म्हणतात. किती एकांच्या पायांवर बारीक पिसें असतात, त्यास पायमोजी म्हणतात. त्यांस कबु

म्हणून एक जात आहे त्याची दूम नेहमीं उभारलेली असून पसरलेली असते, आणि मानेचा झोंक नेहमीं पाठीकडे असतो. लका कबूतरास फार उंच उडवत नाहीं. गिरेबाज म्हणून कबूतर असतें तें आकाशांत उडतां उडतां आपल्या अंगा भोंवतीं गिरक्या खातें.

जंगली कबूतरास पारवा म्हणतात. त्यांचा सर्वांचा रंग एकसारखो अस्मानी असतो. पारव्याची जात फार भेकड असते. माणसाचा सहवास त्याला आवडत नाहीं. पारवे उंच देवळावर किंवा खोल विहिरीच्या खबदडांत घरें करून राहतात. त्यांचीं पोरें आणून कबूतरांत जरी ठेविलीं तरीं तीं फार दिवस राहत नाहींत; तीं कबूतरांची संगत सोडून पारव्यांची संगत धरितात. कबूतराचा नर आणि पारव्याची मादी, किंवा पारव्याचा नर आणि कबूतराची मादी, असा जोडा केला तर त्यांस जीं पोरें होतात तीं कधीं कबूतरासारखीं होतात, कधीं पारव्यासारखीं होतात. पारवे स्वच्छंदानें बाहेर फिरून आपलें दाणें मिळवितात.

धडा ४१.

स्लेट,

अलीकडे मुलांस पाटीवर लिहिण्याची सोय चांगली झाली आहे. कांहीं वर्षांमागें लांकडाच्या पाट्या करून त्यांवर धूळ घालून बांबूच्या लेखणीनें लिहावयास शिकविण्याचा परिपाठ होता. आतां ईश्वराचे कृपेनें आपणांस पाट्यांचे जागीं स्लेटी मिळतात. स्लेटी दगडाच्या असून फळी सारख्या साफ असतात, आणि त्यांवर लिहिण्यासाठीं त्याच जातीच्या दगडाच्या

लेखण्या केलेल्या असतात. त्या लेखणीला पेनसिल म्हणतात. त्या पेनसलीनें स्लेटीवर पाहिजे तें लिहावें.

स्लेटीवर हात फिरविला म्हणजे वर लिहिलेलें पुसून जाऊन स्लेट पुन्हा कोरीची कोरी. स्लेटीचा रंग काळा असतो. तिजवर पेनसलीची रेघ पांढरी उठते, ह्यामुळें स्लेटीवर लिहिलेलें अक्षर वगैरे वाचावयास चांगलें सांपडतें.

स्लेटीचे दगड खाणींतून काढितात. हे दगड मऊ असून बळकट असतात. त्या दगडाच्या पोटांत पदर असतात ह्यामुळें तो दगड फोडिला किंवा कापिला म्हणजे त्याचे फळ्यासारखे भाग होतात. मग त्या फळ्या रंध्यानें साफ करून चौकोनी स्लेटी करितात. स्लेटीच्या बळकटीसाठीं ती लांकडाच्या चौकटींत बसवावी लागते. ह्या स्लेटी यूरोप खंडांतून आणि चीन देशाहून व्यापारी लोक आणितात. अलीकडे हिंदुस्थानांतही स्लेटीच्या दगडांच्या खाणी सांपडल्या आहेत. त्या दगडांचा व्यापार प्रतिवर्षी हजारों रुपयांचा होतो.

दक्षिण कोंकणांत रत्नागिरी, सावंतवाडी, मालवण, गोमंतक ह्या प्रांतांत खडी म्हणून एका जातीचा दगड खाणींत सांपडतो. तो स्लेटीच्या दगडासारखा मऊ असतो, पण ठिसूळ असतो. मऊ इतका असतो कीं त्याच्या सुरीनें तासून लेखण्या करितां येतात. ह्या दगडाच्या स्लेटी चांगल्या होत नाहींत, पण पात्रें चांगलीं होतात. ह्या दगडाच्या वाट्या, बगुणीं, पातेलीं, तवे, काहिली, पराता, ताटें, वगैरे पात्रें करितात.

ह्या दगडाच्या पात्रास साधारण दगडी असें नांव देतात. ह्या पात्रांत अन्न रांधितात. ह्यांत अन्न घेऊन जेवतात. हीं पात्रें०

[illegible] घडून फार सुरेख व सफाईदार करितात. ही दगडी भांडीं युक्तीनें वापरलीं असतां पुष्कळ वर्षे टिकतात. सावंतवाडीच्या दगड्या सर्वांत चांगल्या असतात. ह्या दगडी भांड्यांचा एक मोठा उपयोग आहे, कीं त्यांत ठेवलेला पदार्थ कळकत नाहीं, व बिघडत नाहीं.

धडा ४२.

नीतिपर कविता.

आर्या.

दैवें द्रव्य[88] मिळालें, जरि तरि चित्तीं धरूं नये गर्व[89]॥
त्याचा[90] काय भरंवसा, जाइल बापा क्षणांत तें सर्व ॥१॥
गेल्याचा शोक वृथा[91], नकरावा वित्त[92] सर्व जायाचें॥
वित्ताची काय कथा, शाश्वत[93] टिकणें नसेच कायाचें[94] ॥२॥
देह क्षणिक[95] गणावा, ईश्वरभजनांत काल हा जावा॥
बाळपणापासुनि जप, साधाया आत्महित[96] न लाजावा ॥३॥
हित[97] भजन ईश्वराचें, धनसुतदारादि दिसति मात्र हित[98] ॥
परि परिणामीं[99] दुःखमद मग त्यां का म्हणूनये अहित[100] ॥४॥
स्वहितार्थ[101] सदुपदेशा,[102] सांगे जो त्याकडे मन वळावें[103] ॥
निजचित्त[104] अन्यदुःखा,[105] पाहुन तत्काळ वा कळवळावें॥५॥
उघड्यास वस्त्र द्यावें, क्षुधिताला[106] अन्न अभय भीताला[107]॥
बुडत्यास हात द्यावा, घाबरल्या धीर[108] ताल भीताला ॥६॥
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावें क्षमा न सोडावी ॥
जोडावी कीर्त्ति जनीं, कुलमर्यादा कदा न मोडावी ॥७॥

धडा ४१.

राग घालविण्याचा उपाय.

कोणी एका गांवांत एक बायको होती, ती सर्व गांवांतील बायकां पेक्षां दुःखी होती; कां तर तिचा नवरा असा रागीट व निर्दय होता कीं ती आजारी पडे पर्यंत तो तिला मारीत असे. तिच्या शेजारीं एक फार शहाणी म्हातारी बाई राहत होती. ती बाई अशी होती कीं जें काम हातांत घेई तें ती शेवटास नेई. तिची मोठी खोल बुद्धि होती; लोकांचा स्वभाव ती जाणत असे; आणि सर्व कामांविषयीं मागेंपुढें पाहून ती वागत असे.

एके दिवशीं नवऱ्यानें फार मारल्यावर ती गरीब बायको त्या शेजारिणी बाईच्या घरीं गेली, आणि तिला म्हणाली, बाई, माझा नवरा नित्य मला मारितो; पहा, कधीं मला घरांत सुख नाहीं. सर्वकाळ मार खाण्यानें मी दुखणेकरीण झालें आहें, ह्याला मी काय करूं! अहो बाई, तुम्ही तरी कांहीं उपाय सांगा.

अशी तिची विनंती ऐकून, शेजारीण म्हणाली, होय, मी विचार करून पाहतें; मला जर विचार सुचला तर मी सांगेन. शेजारणीस ह्या बायकोचा व तिच्या नवऱ्याचा स्वभाव ठाउक होता. नंतर तिनें चाकराला सांगितलें कीं, पाणी भरून एक भांडें आण. मग चाकरानें तें आणल्यावर शहाण्या शेजारणीनें, त्या बायकोला न समजूं देतां, त्या पाण्यांत एक ओंजळभर मीठ घातलें, आणि तें कुपींत घालून तिला आणून दिलें; आणि ती तिला म्हणाली, हें औषध आहे. तुझा नवरा रागें भरेल तेव्हां तूं ह्या औषधाचा गुळणा धरून बैस, म्हणजे तो तुला मारणार नाहीं, आणि त्याचा रागही जाईल. मग ती शेजार-

गोचा मोठा उपकार मानून म्हणाली, तुमच्या सांगण्या प्रमाणें मी करीन, कधीं चुकणार नाहीं.

नंतर आठ दिवस पर्यंत नवऱ्यानें तिला मारिलें नाहीं. त्याला नित्य राग येत असे, पण तो स्त्रीच्या दृष्टीस पडला म्हणजे तिनें औषध आणून त्या पाण्याचा गुळणा घेऊन बसावें. असे आठ दिवस गेले. मग औषध संपलें असें पाहून ती पुन्हा शेजारणीकडे जाऊन म्हणाली, बाई, मी काय करूं ! औषध संपलें. जों पर्यंत घरांत औषध होतें तों पर्यंत मला मार बसला नाहीं; आणखी तुम्ही औषध द्याल तर बरें होईल.

शेजारीण बोलली, आतां तुला औषध नको. राग जाण्या करितां म्यां तुला औषध म्हणून जें दिलें तें केवळ नदीचें पाणी होतें, त्याच्या गुणानें नवऱ्याचा राग गेला नाहीं.

स्त्री बोलली, अगे पण जों पर्यंत पाणी माझ्या घरांत होतें तों पर्यंत नवऱ्यानें मला मारिलें नाहीं.

शेजारीण—तें कां तुला कळलें ? जों पर्यंत तुझ्या तोंडांत पाण्याचा गुळणा असे तों पर्यंत तुझ्यानें बोलवत नसे. आणि तुझें तोंड मोकळें असलें म्हणजे नवरा बोलला असतां त्यांही गेठ्यानें बोलावें, तेणेंकरून अधिक राग येऊन नवरा तुला मारित होता. आजंपासून तूं असें करीत जा, नवऱ्याला राग आला म्हणजे मुकी होऊन बैस, उलटून बोलूं नको. मग त्याचा राग शांत होईल, आणि तुला मार बसणार नाहीं. गरिबीनें वाग, म्हणजे नवरा तुजवर प्रीति ठेवील.

धडा ४४.

मुंग्या आणि माशा यांची गोष्ट.

कोणे एका कुणब्याचे बागांत मुंग्यांचें एक वारूळ होतें, त्यांत पुष्कळ मुंग्या राहात होत्या, त्यांनीं पावसाळा गेल्यावर आठ

महिने पर्यंत सूर्य उगवल्या पासून धान्याच्या संग्रहा करितां बाहेर निघावें, तें सूर्य मावळे तों पर्यंत हेंच करीत असावें.

त्याच वारुळा जवळ एक फुलझाडांची पट्टी लाविली होती, तेथें उन्हाळ्यांत सुख होईल म्हणून पुष्कळ माशा येत असत, त्या आल्या म्हणजे कांहीं वेळ एका फुलावर बसत, कांहीं वेळ दुसऱ्यावर जात, परंतु त्या आपल्या हिताचें काम कांहीं करीत नसत.

त्या कुणब्याचा एक लहान मुलगा होता त्यानें बापा बरोबर बागांत जाऊन त्या मुंग्यांची आणि माशांची रीत कशी आहे हें नित्य तेथें पाहत बसावें. एक दिवस तो मुलगा बापास म्हणाला, बाबा, पहा ह्या मुंग्या कशा मूर्ख आहेत त्या. ह्यांनीं माशां सारिखा खेळ करावा, आणि सुख पावावें. तें सोडून उलटें दिवसभर श्रमांत कष्टत असतात. मला वाटतें कीं मुंग्यां पेक्षां माशा फार शहाण्या आहेत. ज्या दिवशीं जें अन्न मिळवितात तें त्या दिवशीं खातात. दुसऱ्या दिवसा विषयीं त्यांस कांहीं काळजी नाहीं.

असें होतां होतां उन्हाळा गेला आणि पावसाळा आला. तेव्हां एके दिवशीं असें झालें कीं, पाऊस आला, सूर्य दिसेनासा झाला, मोठा वारा सुटला, आणि थंडी फार पडली. त्या दिवशीं तो मुलगा बापा बरोबर बागांत गेला होता तो तेथें पाहतो तों एकही मुंगी दृष्टीस पडली नाहीं. पण भुईवर मेलेल्या माशा पुष्कळ पडल्या होत्या त्या त्याचे दृष्टीस पडल्या. त्यांकडे पाहून मुलगा बापास म्हणतो, बाबा, सर्व मुंग्या कोठें गेल्या! येथें एकही दिसत नाहीं. त्या आपल्या घरांत असतील.

काय! बाप म्हणाला, होय मुला, त्या आपल्या घरांत असतील. मुलगा म्हणाला, त्या जिवंत असून आपल्या घरांत सुखरूप जर असल्या तर माशां पेक्षां मुंग्या शहाण्या असें आतां मला खचीत वाटेल. बाप म्हणाला, होय मुला, त्या आपल्या घरांत खचीत सुखरूप आहेत, आणि पावसाळा संपे पर्यंत पुरें इतकें अन्नही त्यांजवळ आहे. मुला, पूर्वी तुला असें वाटत नव्हतें, आणि आतां माशा पेक्षां मुंग्या शहाण्या असें कशा वरून वाटलें बरें? मुलगा म्हणाला, पावसाळ्यांत अन्न मिळणार नाहीं असें समजून योग्य काळीं श्रम करून त्यांनीं अन्नाचा संग्रह केला, म्हणून त्या आतां सुखानें आपल्या घरांत बसल्या आहेत. आणि माशा आळशी म्हणून उन्हाळ्यांत त्यांनीं घरदार केलें नाहीं आणि अन्नाचाही संग्रह केला नाहीं, ह्यामुळें त्या आतां मरण पावल्या. ह्यावरून मला तसें वाटलें. बाप म्हणाला, मुला, ह्यावरून पहा कीं आळशाला कसें दुःख आणि कष्टाळूला कसें सुख आहे तें. मुलगा म्हणाला, बाबा, मी आज पासून आळस करणार नाहीं. मन लावून आपलें काम करीत जाईन. बाप बोलला, बरें मुला, आज जी बुद्धि तुला झाली आहे ही तुझ्या कामास पडेल सर्व लहाना मोठ्यांनीं मुंग्या सारखें काम करीत असावें. माशासारखें खेळूंनये. पुढें येणारी अडचण दूर करण्याविषयीं आधीं जे जपतात ते मुंग्या प्रमाणें शहाणे होत. आणि जे जपत नाहींत ते माशा प्रमाणें मूर्ख होत.

धडा ४५.

खोटें बोलणें.

खोटें बोलणें हें आपल्या समजावर आहे. अमुक गोष्ट अशा प्रकारची आहे असें आपणास समजलें असून जर आपण तशी नाहीं म्हणतों, किंवा अमुक गोष्ट अशा प्रकारची नाहीं असें आपणास समजलें असून जर आपण ती तशी आहे म्हणतों, तर आपण खोटें बोलतों असें होतें.

आपण आपल्या समजाच्या उलटें बोललों असतां कदाचित् बोलण्याप्रमाणें जरी दुसऱ्याच्या अनुभवास आलें, तरी आपण खोटें बोलण्याच्या दोषांत पडलों, ह्यांत संशय नाहीं. आणि जर आपण समजाप्रमाणें बोललों, आणि तो समज चुकला तरी खोटें बोलण्याचा दोष आपणाकडे येत नाहीं. ह्याविषयीं उदाहरणाकरितां एक गोष्ट सांगतों.

एका शेतकरी पाटलाचे दोन मुलगे होते; एकाचें नांव महादू व एकाचें नांव सदू. एके दिवशीं त्यांचा बाप त्यांस म्हणाला, मुलांनो, तुमची खुशी असली तर वाडग्यांत गवताची गंज आहे तिजवर खेळावयास तुम्ही जा; पण संभाळाहो, तेथें गेल्यावर वाडग्याचें फाटक लावून घ्या, नाहीं तर आंतशिंगरूं मोकळें आहे तें बाहेर जाईल. हें बापाचें बोलणें ऐकून मुलांस फार आनंद झाला. मग बापाची परवानगी होतांच ते मुलगे मोठ्या हौसेनें धांवतच वाडग्यांत गेले. गंजीवर जाऊन खेळण्याची त्यांस इतकी घाई झाली होती कीं आंत गेल्यावर फाटक बंदकरण्याचें त्यांस भान राहिलें नाहीं. गंजीवर पुष्कळ वेळ खेळल्यानंतर ते खालीं आले, आणि पाहतात तों फाटक

मोकळें आहे. शिंगरूं कोठें आहे म्हणून पाहूं लागले तों तेंही कोठें दिसलें नाहीं. ह्यामुळें मुलांस मोठी धास्ती पडली. आणि आतां कसें करावें, अशा विचारांत ते पडले. तेव्हां महादू म्हणाला, आतां आपण फाटक बंद करून जाऊं. आपण बाबापाशीं कांहींच बोललों नाहीं तर, दुसऱ्या कोणीं फाटक उघडें टाकिल्यामुळें शिंगरूं बाहेर गेलें, असें त्यास वाटेल. हें ऐकून सदू म्हणाला, छीछी, असें आपण खोटें बोलूं नये; खरें असेल तेंच बोलावें, मग कांहीं वेळानें महादू घरांत गेला. तेव्हां बापानें त्यास विचारिलें, कायरे महाद्या, शिंगरूं बाहेर गेलें नाहींना? महादू बोलला, नाहींनाहीं, शिंगरूं कांहीं बाहेर गेलें नाहीं. त्याच्या मागून लवकरच सदू आला, त्यास बाप म्हणाला, कायरे सद्या, गंजीवर बरीच मौज मारिली असेल; पण शिंगरूं तर बाहेर गेलें नाहींना? हें बापाचें बोलणें ऐकून सदू खालीं पाहूं लागला. तो म्हणाला, बाबा, आम्हांकडून वाईट गोष्ट झाली. आंत गेल्यावर फाटक बंद करण्याची आठवण आम्हाला राहिली नाहीं; म्हणून शिंगरूं बाहेर गेलें. हें ऐकून पाटील उठून वाडग्यांत गेला, आणि पाहूं लागला तों शिंगरूं एका कोंपऱ्यास पाय पोटाशीं जुळून बसलें आहे. आतां ह्या दोघां मुलांत खरा कोण व खोटा कोण, ह्याचा निवाडा करूं लागल्यास उघड दिसेल कीं, शिंगरूं बाहेर गेलें असा समज असून बाहेर गेलें नाहीं, असें महादू बोलला. शिंगरूं जरी बाहेर गेलें नव्हतें तरी आपल्या समजाच्या उलटें बोलल्यामुळें महादूकडे खोटें बोलण्याचा दोष आला. आणि शिंगरूं बाहेर गेलें असें वाटल्यावरून तें बाहेर गेलें असें सदू

बोलला. जरी शिंगरूं बाहेर गेलें नव्हतें, तरी तो आपल्या समजाप्रमाणें बोलला, म्हणून खोटें बोलण्याचा दोष त्याकडे आला नाहीं. म्हादू खोटें बोलला असें मानून बापानें त्याचें पारपत्य केलें; आणि सदू खरें बोलला असें मानून त्यास शाबासकी दिली.

धडा ४६.

धोतरजोडा.

ह्या हिंदुस्थान देशांत ब्राह्मण वगैरे बहुत लोक धोतरें नेसतात. दोन धोतरें एकाच तऱ्हेचीं सारख्या लांबी रुंदीचीं एकास एक लागून विणिलीं असतां त्यांस धोतरजोडा म्हणतात. बहुतकरून लोक धोतरांचा जोडाच विकत घेतात.

कितीएक धोतरजोडे साधे असतात, कितीएक कांठाचे असतात. ज्याला कांठा पर्यंत एकसारखें सूतच असतें ते धोतरजोडे साधे होत; आणि ज्याला कांठा जवळ रेशीम किंवा कलाबतू घालितात ते धोतरजोडे कांठाचे होत. ज्याला पांढऱ्या रेशमाचा कांठ असतो त्याला शुभ्रकांठी धोतरजोडा म्हणतात. ज्याचे कांठ रंगीत रेशमाचे असतात त्याला रेशीमकांठी धोतरजोडे म्हणतात. कांठाला रेशीम तांबडें, पिवळें, किंवा हिरवें घालितात. ज्याच्या कांठाला कलाबतू असते त्याला जरीकांठी धोतरजोडा म्हणतात. जरीकांठी धोतरें फारचीं महाग असतात. मध्यम प्रतीचे लोक आणि श्रीमंत लोक बहुतकरून रेशीमकांठी धोतरें नेसतात. गरीब लोक साधीं धोतरें नेसतात.

रेशमी कांठांतही पुष्कळ प्रकार आहेत. दामणा इतक्या रुंदी पासून दाहा बोटें रुंदी पर्यंत रेशमी कांठ असतात. दाभुणकांठी, बोटूधारी, सोंकटेकांठी, करवतीकांठी, रुइफूलकांठी, बकुळीकांठी, मोतीचूरकांठी, गंगाजमनी, जिभलीकांठी, अशीं कांठावरून धोतरांस नांवें असतात. जसजसा रेशमी कांठ मोठा असतो तसतशी धोतरजोड्याला किंमत अधिक पडते. असे धोतरजोडे लोक आपापल्या योग्यते प्रमाणें व शक्ती प्रमाणें विकत घेऊन नेसतात.

धोतरजोड्याची किंमत सुतावर व कांठावर असते. जसें जसें सूत बारीक व कांठ मोठे तशीतशी किंमत अधिक असते. साध्या धोतरजोड्याची किंमत दोन रुपयांपासून आठ दहा रुपयां पर्यंत असते. रेशीमकांठी धोतरजोड्याची किंमत सुमारें चार रुपयांपासून पन्नास रुपयां पर्यंत असते. आणि जरीकांठी धोतरजोड्याची किंमत तर शंभर रुपये देखील पडते.

धोतराच्या लांबी रुंदीचें साधारण प्रमाण म्हटलें म्हणजे दहा हात लांबी आणि अडीच हात रुंदी हें आहे; परंतु विणणारे कारागीर आपल्या नफ्यासाठीं किंवा गिराइकाच्या सोईसाठीं लांबींत व रुंदींत कांहीं कमी करितात. धोतरजोडे पुष्कळ ठिकाणीं काढितात, त्यांत नागपुरी व महेश्वरी धोतरजोडे नामांकित आहेत. जरीकांठी धोतरजोडे पैठणास व अमदाबादेस कारागीर लोक करितात.

लांबी रुंदीनें लहान असून जाडसुती अशीं पुरुषांनीं नेसावयाचीं वस्त्रें असतात त्यांस पंचे म्हणतात. चार पंचे एका जगात एक विणलेले असके तर त्या सर्वांस मिळून पचाक

म्हणतात. ते पैचे मुलांस व गरीबलोकांस नेसावयास बोईचे असतात. मुलांसाठीं लहान धोतरजोडे करितात त्यास बचकणी धोतरजोडे म्हणतात. बचकणी जोडे रेशीमकांठी असतात.

धडा ४७.

गरीब मुलगा आणि धनवान् पुरुष.

कोणे एके दिवशीं एका गरीब कुणब्यानें दुसऱ्या एका गांवीं कांहीं कामाकरितां आपल्या मुलास पाठविलें होतें. तो गांव कांहींसा लांब होता, म्हणून चालतां चालतां तो मुलगा दमला, आणि त्याला भूक लागली. पण खावयाचा पदार्थ विकत घ्याव-यास त्याजवळ द्रव्य नव्हतें. एकच पैसा होता. मग वाटेवर त्यानें त्या पैशाचें कांहीं घेऊन खाल्लें, पण त्याचें पोट भरलें नाहीं. आतां काय करावें असें मनांत म्हणून तो पुढें चालता झाला. कांहींसा पुढें गेला तों सुंदर गाडींत बसून एक गृहस्थ चालला आहे; त्याच्या बरोबर चाकर लोकही पुष्कळ आहेत, असें त्यानें पाहिलें. गाडीकडे पाहत पाहत तो मनांत म्हणतो, अहाहा! मज जवळ अशी गाडी असती तर मला केवढें सुख झालें असतें. इतक्यांत तो गाडींतला गृहस्थ त्या मुलाचें दीनवाणें तोंड पाहून त्याच्या मनांतील गोष्ट समजला. आणि त्याला पुसूं लागला, मुला, माझ्या अवस्थेची आणि तुझ्या अवस्थेची बदली करशील काय? मुलगा बोलला, महाराज, तुम्ही जर खालीं उतराल, आणि तुमचें जें आहे तें सर्व मला द्याल तर मी होय म्हणेन, आणि मज जवळ जें कांहीं आहे तें

तुम्हास देईन. असें विचार केल्यावांचून त्यानें उत्तर केलें. मुलाचें उत्तर ऐकून गृहस्थ आपल्या चाकरास म्हणाला, मला गाडीखालीं उतरा. चाकरांनीं त्यास खालीं उतरलें त्यावेळेस गृहस्थ पांगळा आहे, चाकरांनीं हात दिल्यावांचून ह्याच्यानें उभें राहवत नाहीं, काखेंत कुबड्या घेतल्या वांचून ह्याच्यानें चालवत नाहीं, असें त्यानें पाहिलें. मग गृहस्थ म्हणाला, आतां तूं मजशीं आपल्या अवस्थेची बदली करितोसना! मुलगा घाबरून म्हणाला, नको नको मला तुमची अवस्था. ज्यांहीं करून मला चालतां येतें असे माझे हे दोन पाय सुखरूप असले तर हे हजारों गाड्या घोड्यां पेक्षां मला अधिक आहेत. दुसऱ्यानें हातीं धरून चालवावें अशी कठीण अवस्था असून नित्य मिठाई खावयास मिळाली तरी गोड नाहीं. आपलें शरीर नीट असून वेळेस मीठ भाकर जरी मिळाली तरी ती तिजपेक्षां गोड आहे. मग तो गृहस्थ म्हणाला, मुला, हायहाय, माझ्या सारखी कठीण अवस्था तुला कधीं प्राप्त न होऊ. तें ऐकून मुलगा पुढें चालता झाला.

धडा ४८.

पाणपोई.

एके दिवशीं गोविंदा आणि रामा शहरांत फिरत असतां एके ठिकाणीं पुष्कळ भारेवाले, मोळीवाले, भोई, व मजूर लोक हे एका कळकाच्या नळकड्याखालीं बसले आहेत, तेथें जवळच एक गार पाण्याचा रांजण होता, त्यांतून एक मनुष्य पाणी काढून त्या नळकंड्यांत ओतीत आहे, आणि ते गरीब लोक आपल्या

हातांच्या ओंजळी करून त्या नळकांड्यांतलें पाणी पीत आहेत असें ह्या दोघांच्या दृष्टीस पडलें.

गो०— गड्या, हे कोणरे भिकाऱ्यांसारखे रस्त्यावर लाकडाच्या तोटींतून पाणी पीत आहेत! ह्यांस घरदार कांहीं नाहीं काय!

रा०— बाबा, हे गरीब बिचारे सकाळपासून संध्याकाळ पर्यंत काबाडकष्ट करून पोट भरितात; ह्यांच्या डोक्यांवर मोठीं ओझीं असून, ऐन दोन प्रहरीं अनवाणीं तळतळत चालल्यानें ह्यांच्या आंगांतून घामाच्या धारा चालल्या असतात, व तहान लागून घसा अगदीं कोरडा पडतो. अशा विपत्तींत ह्यांस कष्ट करावे लागतात; तर अशा प्रसंगीं ह्यांस पाणी कोठचें मिळतें! असे गरीब बिचारे दमून धापा टाकीत आले, म्हणजे त्यांस पाणी प्यावयास मिळावें, व तेणेंकरून त्यांच्या जिवास हुशारी यावी, म्हणून कोणी दयाळू लोक अशा पाण्याच्या जागा बांधून ठेवितात; त्यांस पाणपोई असें म्हणतात. पहा, त्या पलीकडच्या पोईवर पुष्कळ ओझेवाले अधाशासारखे घटघटां पाणी पीत आहेत ते! तो पहा, मोळीवाला पाणी पिऊन हुश्श करीत बसला आहे. असें वाटेंत पाणी प्याल्यानें ह्यांस हुशारी येऊन हे काम करण्यास पुन्हा पहिल्याप्रमाणें ताजे होतात. पाणी पिऊन संतुष्ट होऊन हे ह्या पोयांच्या धन्याचें कल्याण चिंतितात. ह्या पोयांच्या उदाहरणावरून आपणांस एक मोठी गोष्ट कळते, ती अशी कीं, आपल्या हातून जितकें लोकांचें बरें होईल तितकें आपण करीत जावें; मग तें आपल्या दृष्टीनें क्षुल्लक वाटलें तरी तें करण्याविषयीं अनमान करूं नये; कारण, ह्या जगांत अशा

कोटिशः गोष्टी आहेत कीं, ज्या एकाच्या दृष्टीला अगदीं क्षुल्लक वाटतात त्याच गोष्टी दुसऱ्याच्या दृष्टीला अत्यंत महत्वाच्या दिसतात. ह्यास उत्तम उदाहरण हें पोईचेंच पुरे आहे. ह्या पोईवर पाणी पिणाऱ्या लोकांविषयीं तुला नुकतेंच काय वाटलें होतें तें तुला ठाऊक नाहीं काय? ह्या पोईवर पाणी पिणें तुला जरी वाईट वाटतें, तरी त्या गरीब लोकांस फार चांगलें वाटतें, व त्यांस वाईट वाटून परिणामही नाहीं. कारण, ते अशा ठिकाणीं पाणी न पितील तर त्यांस पाणी कोठचें प्यावयास मिळणार? अशा गोष्टींमध्यें स्वार्थ आहे आणि परमार्थही आहे; म्हणजे लोकांवर उपकार केल्यानें आपल्या चित्तास मोठें समाधान वाटतें, व लोकांस सुख होतें. तर अशा उत्तम गोष्टी करण्याकडे मन लागावें म्हणून आपण नेहमीं परमेश्वराची प्रार्थना करीत असावें.

धडा ४९.

प्राप्तीचा अर्धा वांटा.

इताली देशांतील पिसा नामक गांवाजवळ बागांत एक वाडा आहे, त्यांत कोणी सरदार राहत असे, त्यानें आपल्या लग्नाचें प्रयोजन आरंभिलें होतें. त्या प्रसंगीं सर्व पदार्थ त्यास अनुकूळ होते, परंतु मासे मात्र मिळाले नव्हते; कांतर, समुद्र इतका खवळला होता कीं माशांवाचून जरी खोळंबा होता, तरी मासे धरावयास जाण्याला कोणास धैर्य होईना. तथापि ज्या दिवशीं प्रयोजन व्हावयाचें त्याच दिवशीं उत्तम जातीचा एक मोठा मासा घेऊन एक गरीब धीवर तेथें आला. त्यास पाहून त्या वाड्यांत तिकडे तिकडे आनंद झाला.

मग चाकरानीं त्या धीवरास माशासुद्धां दिवाणखान्यात नेऊन त्यावर मेजवानीस आलेल्या मंडळीच्या समक्ष त्या सरदारानें त्यास सांगितलें कीं, ह्या माशाचें मोल तुला वाटेल तें सांग, म्हणजे तें तुला लागलेंच मिळेल. धीवरानें उत्तर केलें कीं, माझ्या उघड्या पाठीवर शंभर फटके हेंच माझ्या माशाचें मोल आहे. ह्यात चाबुकाचा एकही पदर मी कमी घेणार नाहीं.

तो सरदार आणि ते मेजवानीस आलेले लोक ह्यास तें मोठें नवल वाटलें; त्यांनीं त्याची फार समजूत केली, पण तो ऐकेना, व आपला हेका सोडीना. शेवटीं सरदारानें हासून म्हटलें, बरें का होईना! हा मनुष्य मोठा तऱ्हेवाईक दिसतो; आम्हांस तर माशाची गरज, त्यावांचून आमचा खोळंबा आहे; तर फटके हळू हळू मारून मोल आमच्या समक्ष ह्यास भरून द्या.

पन्नास फटके खाल्ल्यावर धीवर ओरडून म्हणाला, हां, हात आटोपा! हात आटोपा! ह्या कामांत माझा कोणी वांटेकरी आहे, आणि त्याचा वांटा त्याला मिळावा हें वाजवी आहे. सरदार आश्चर्य करून म्हणाला, काय! ह्या पृथ्वीवर असे दोन वेडे पीर आहेत काय? तुझ्या वांटेकऱ्याचें नांव काय तें सांग, म्हणजे आम्ही त्याला लागलेंच बोलावणें पाठवूं. धीवरानें उत्तर केलें, त्याच्या शोधास दूर जावयास नलगे, तो तुमच्या देवडीवरच तुम्हांला सांपडेल; तो तुमचा देवडीवालाच आहे. माझ्या माशाची जी किंमत मला मिळेल तिचें अर्ध मी तुला देईन, असें वचन मजपासून घेतलें तेव्हां त्यानें मला आंत येऊं दिलें.

सरदार बोलला, असें आहे काय! बरें त्याला लवकर वर घेऊन या; त्याच्या बोलीप्रमाणें अर्धें मोल तंतोतंत त्याला मिळालें

पाहिजे. मग हें कृत्य झाल्यावर सरदारानें देवडीवाल्यास बरतरफ केलें, आणि धीवरास मोठें बक्षीस दिलें.

धडा ५०.

सुखी होण्याचा उपाय.

कांहीं मुलें सुखी असतात, व त्यांजवर सर्वांची प्रीति असते; व कांहीं मुलें दुःखी असतात, व त्यांजवर कोणाची प्रीति नसते, हें सर्व मुलांच्या ध्यानांत असेलच.

दुसऱ्याची प्रीति नसली तर कोणालाही सुख वाटावयाचें नाहीं. देवानें मनुष्यास असा स्वभाव दिला आहे कीं आपण दुसऱ्यावर प्रीति करावी व दुसऱ्यानें आपणावर प्रीति करावी ह्यांतच आपणास सुख वाटावें. हें जर नाहीं तर आपणास सुख नाहीं.

पण हें समजलें पाहिजे कीं आपण दुसऱ्यांवर प्रीति केली तरच दुसरे आपणावर प्रीति करितील. दुसऱ्यांवर प्रीति करणें हें जर आपणास आवडत नाहीं, तर आपणावर प्रीति करण्यास दुसऱ्यांसही आवडणार नाहीं. प्रीतीपासून प्रीति उत्पन्न होते ह्यावरून असें सिद्ध होतें कीं आपण सर्वदां उल्हासवृत्ति असावें, व दुसऱ्यावर उपकार करण्याची बुद्धि बाळगावी, हें आवश्यक आहे. ह्यावांचून सुख व्हावयाचें नाहीं.

आपणावर आपले सोबती प्रीति करीत नाहींत, असें असलें, तर ह्याचा दोष आपणाकडेसच आहे ह्यांत संशय नाहीं. आपण त्यांजवर प्रीति केली असतां, व आपण त्यांशीं भलेपणानें वागलों असतां, आपणावर प्रीति केल्यावांचून त्यांच्यानें राहवणार नाहीं.

दुसऱ्याची आपणावर प्रीति नाहीं असें असलें, तर त्याची प्रीति आपणावर करावी अशी योग्यता आपल्या आंगीं नाहीं हेंच प्रमाण.

आपण इमानानें वागलों, तर आपल्या सोबत्यास वाईट वाटेल असें करणें कधीं कधीं भाग पडेल हें खरें; तरी आपल्या आंगीं ममता आहे, व आपण स्वार्थबुद्धीनें वागत नाहीं, आणि आपण हाल सोसूनही आपल्या सोबत्यास सुख देण्यास राजी आहों, असें असलें, तर आपणास मित्र नाहींत असें कधीं होणार नाहीं.

दुसऱ्यावर ममता करण्याची व उपकार करण्याची बुद्धि आपण जशी जशी धरावी, तसें तसें आपणास सुख मिळेल, हें लोकांस पुरतेपणीं समजत नाहीं. तशी संधी आली असता आपण उपकार करूं असा निश्चय आपण केला, तर आपणास मित्र पुष्कळ मिळतील.

एखादी मौज रस्त्यांत होत असली म्हणजे ती पहावयास लोकांची दाटी होते, त्यांत आपण उभें राहून कांहीं वेळ मौज पाहिली, इतक्यांत आपला कोणी सोबती आला, त्यालाही मौज पाहण्याची इच्छा आहे, पण जागा मिळत नाहीं. अशा वेळेस जर त्याला आपण हाक मारून म्हटलें कीं, मीं मौज कांहीं वेळ पाहिली, आतां तूं ये, आणि माझ्या जाग्यावर उभा राहून मौज पहा; तर, ह्यानें मजवर उपकार केला, असें त्याच्या मनांत येणार नाहीं काय? आणि जरी त्यानें त्यावेळेस उपकार फेडिला नाहीं, तरी त्याच्या आंगीं मैत्रीची योग्यता असली तर संधी आली असतां तो उपकार फेडल्यावांचून राहणार नाहीं.

सारांश, सुखी होण्याचा उपाय हाच आहे कीं, आपण दुसऱ्यास सुखी करण्याच्या उद्योगांत सर्वदा असावें.

धडा ५९.

नीतिपर कविता.

आर्या.

केल्यानें देशाटन,[१०९] पंडितमैत्री[११०] सभेंत संचार[१११] ॥
शास्त्रग्रंथविलोकन,[११२] मनुजा चातुर्य येतसे फार ॥१॥

दिंडी.

श्रेष्ठ लोकांतें[११३] नम्रपणें सेवीं ॥
दुर्बळावरि[११४] आदरें प्रेम ठेवीं ॥
जरी कोणी तूजला क्रोध दावी[११५] ॥
जपुन तेथें त्वां शांति[११६] आदरावी[११७] ॥२॥
दयाळू हो सर्वदा सेवकांसी[११८] ॥
नको होऊं संपत्तिगर्वराशी[११९] ॥
जरी चढलासी थोरल्या पदाशी[१२०] ॥
नको दुखवूं बोलून तूं जनांशीं ॥३॥

आर्या.

चित्तीं क्षमा[१२१] असावी, जेव्हां येते घरास संपत्ती ॥
धैर्य धरावें आली, दैवानें आपणा जरि विपत्ती[१२२] ॥४॥

श्लोक.

संपदा[१२३] बहू आलिया घरी ॥
सोयरे जमा होति त्या घरीं ॥
गेलियास ती[१२४] रुष्ट[१२५] होउनी ॥
बंधुसोयरे जाति सोडुनी ॥५॥

रक्षितो जना क्लेश भोगुनी ॥
सुख नसे कधीं राजया मनीं ॥
वृष्टि[१२६] उष्णही[१२७] वृक्ष[१२८] सोशिती ॥
राखिती स्वयें आश्रिता[१२९] प्रती ॥६॥
मानसीं[१३०] सदा प्रीतिचा झरा ॥
वाहता असो हें मनीं धरा ॥
प्रीति पासुनी प्रीति वाढती ॥
दुष्ट[१३१] बाळकें दुःख पावती ॥७॥

धडा ५२.

पैसा.

पैसा हा ह्या जगांत फार उपयोगी आहे. जर पैसा ह्या जगांत मुळींच नसता, तर आपणास पाहिजे तो जिन्नस मिळायास कठीण पडतें. पहा, एक शेतकरी आहे, त्यापाशीं धान्य पुष्कळ आहे, पण त्याला पांघरायाला पासोडी नाहीं, ती त्याला कशी मिळावी? ती मिळण्यासाठीं त्याला साळ्याकडे गेलें पाहिजे, आणि पासोडीच्या किंमती इतकें धान्य देऊन त्याकडून ती घेतली पाहिजे.

बरें, कदाचित् त्या साळ्याजवळ धान्य असल्यामुळें धान्याची त्याला गरज नाहीं, तर ज्या जिनसाची त्याला गरज असेल तो जिन्नस ज्यापाशीं असेल त्याजवळ गेलें पाहिजे, आणि त्याला धान्य देऊन तो जिन्नस साळ्याला आणून दिला पाहिजे, मग पासोडी मिळणार. कदाचित् दुसऱ्यालाही त्या वेळेस धान्याची गरज नसली, आणि दुसऱ्या एखाद्या जिनसाची गरज असली,

तर तो जिन्नस ज्यापाशीं असेल त्याकडे गेलें पाहिजे, आणि त्याला धान्य देऊन तो जिन्नस त्याकडून आणून त्याला दिला पाहिजे. ह्याप्रमाणें ह्या कामाला खटपट किती बरें पडेल? फारच पडेल ह्यांत संशय नाहीं.

एखादे वेळेस एक दोन घरें फिरला म्हणजे त्याचें काम होईल, आणि एखादे वेळेस शंभर घरें फिरला तरी काम होणार नाहीं. पण हें इतकें कशामुळें? सर्वांस ज्याची गरज आहे असें कांहीं साधन मध्यें नाहीं म्हणून. तें साधन असलें म्हणजे कांहीं कठीण नाहीं. आतां पैसा हें साधन आहे, म्हणून पैसा असला म्हणजे आपले वरतीं सांगितलेले सर्व श्रम वांचतात, आणि पाहिजे तो जिन्नस खटपट न पडतां मिळतो.

पहा, ज्यापाशीं विलायती कापड पुष्कळ आहे त्याला डोकी-ला घालायाला पागोटें पाहिजे, किंवा खायाला धान्य पाहिजे, तर तो आपले अवळचें कापड विकून त्याचा पैसा करून, तें विकत घेतो. त्याला ह्यांत कांहीं कठीण पडत नाहीं. ह्याव-रून पैसा जोंपर्यंत चालू नव्हता तोंपर्यंत मनुष्याला पाहिजे तो जिन्नस मिळवायाला किती खटपट पडत असेल, हें उघड आहे.

पण ईश्वरानें आपणास पैसा दिला तर आपण उन्मत्त होऊं नये आपल्या हातून होईल तितकें लोकांचें कल्याणच करावें. जर एखादा गरीब मनुष्य आहे, त्याला कांहीं एखादा जिन्नस पाहिजे, आणि तो तर देण्यासाठीं आपणापाशीं नाहीं, तर अस-ल्या प्रसंगीं पैसा किती उपयोगीं पडेल बरें! जर आपण त्या जिनसाबदल त्याला पैसा दिला, तर तो त्यानें तो जिन्नस घेईल, मग आपण त्याला तो जिन्नस दिलासें होईल. हो चांगलं

मनुष्य आहे तो असें केल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. आणि अशा व्ययालाच सद्व्यय म्हणतात. तात्पर्य कीं पैशाचे योगानें बहुतकरून कोणतीही अडचण असली तरी ती दूर होते.

धडा ५३.

अदलाबदल.

पैसा नसता तर आपणांस पाहिजे तें मिळण्यास खटपट पुष्कळ पडती, असें मागें सांगितलें आहे. पण आपणांस पाहिजे तें आपणच केलें म्हणजे तरी खटपट पडणार नाहीं, अशी कदाचित् कोणी कल्पना करील. पण असें केलें तरी खटपट कमी पडणार नाहीं. आणि तितकीही खटपट केली तरी एका मनुष्यास सर्व जिन्नस करितां येणार नाहींत.

एखाद्या शेतकऱ्यालाच विचारून पहा, बरें, कीं नांगराचें एवढेंसें रुमणें मोडलें तर तें नीट करायाला तूं सुताराकडे कशाला जातोस? तें तूंच कां जातीनें करीत नाहींस? तर तो म्हणेल कीं, जर मी सुताराचें काम करूं लागलों, तर माझे जवळ वाकस, किकरें, वगैरे सर्व हत्यारें असलीं पाहिजेत, तीं कोठें आहेत? बरें, हीं जर मीच जातीनें करूं लागलों, तर घिसाड्याचीं ऐरण, घण, वगैरे आउतें सर्व जवळ पाहिजेत, तीं कोठें आहेत? बरें, हींही जर मीच करूं लागलों, तर मनस्वीच खटपट पडेल; आणि इतकें केलें तरी सुतारा प्रमाणें चांगलें काम करितां येणार नाहीं, म्हणून धान्य उत्पन्न करून तें विकून त्याच्या पैशानें सुताराकडून काम करून घ्यावें हेंच बरें पडतें.

बरें, सुताराने जर शेतकीचें काम करण्यास आरंभिलें, तर त्यालाही असेंच कठीण पडणार; आणि इतकें करूनही काम चांगलें होणार नाहीं. ह्यावरून सर्वांनीं आपआपला धंदा करून त्या धंद्याचें फळ दुसऱ्यास देऊन त्याचे धंद्याचें फळ आपण घ्यावें, हाच चांगला आणि सोपा मार्ग आहे, असें स्पष्ट दिसतें. ह्यालाच विनिमय, किंवा अदलाबदल, असें म्हणतात.

रानटी लोकांचे कांहीं देश आहेत त्यांमध्यें हा विनिमय होत नाहीं, म्हणून तेथील लोक किती दरिद्री असावे हें आतां सांगावयास नको. जो तो आपल्यासाठीं सगळीं कामें करितो. कोणाला घर पाहिजे तर तो कसेंही करून रहायाला झोंपट करितो. त्याला आंगावर कांहीं पाहिजे, तर जनावराचें कातडें किंवा गवताच्या चटया पांघरतो. मासे धरायास जाण्याकरितां डोणी पाहिजे, तर तो एखाद्या झाडाचें खोड पोंखरून ती करितो. ह्याप्रमाणें जें जें त्याच्या हातानें जसें जसें होईल तें तें तसें तसें करून त्याजवर निर्वाह करितो. तर अशा लोकांची दशा वाईटच असावी. असली व्यवस्था ज्या देशीं असेल, तेथें अदलाबदल करणाऱ्या दहा हजार मनुष्यांचा निर्वाह चांगले रीतीनें होईल असें जरी असलें, तरी असल्या अडाणी हजार लोकांस धड खायाला मिळणें कठीण.

धडा ५४.

व्यापार.

मागें जी अदलाबदल सांगितली ती एकाच देशांतली. शिवाय अदलाबदल एका देशांतून दुसऱ्या देशाशीं होते, त्या

बदलाबदलीला व्यापार असें म्हणतात. सर्व देशांत सर्व जिन्नस उत्पन्न होतात असें नाहीं, परंतु व्यापाराचे योगानें सर्व देशांत सर्व देशचे जिन्नस मिळतात.

पहा, कापूस आपल्या हिंदुस्थानांत उत्पन्न होतो, पण आपणापाशीं चांगलीं यंत्रें नाहींत, व आपणांपाशीं तादृश कलाकौशल्यही नाहीं, म्हणून तो नीट करून त्याचीं उत्तम प्रकारचीं वस्त्रें विणण्याचें काम आपले येथें चांगलें होत नाहीं. म्हणून इंग्रज लोक तो कापूस विलायतेस नेऊन त्याबदल ते उत्तम प्रकारचें कापड ह्या देशांत आणितात.

ह्याप्रमाणें आपल्या देशांतून सोरा, नीळ, वगैरे पुष्कळ जिन्नस विलायतेस जातात, आणि त्याबदल इकडे तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ जिन्नस येतात. अशींच चहा, मातीचीं भांडीं, वगैरे इकडे चीन देशाहून येतात, आणि इकडून अफू वगैरे जिन्नस तिकडे जातात. ह्याप्रमाणें इतर देशांत जो जिन्नस नाहीं तो तेथल्या लोकांला आपल्या देशांतून मिळतो, आणि आपल्या देशांत जो जिन्नस नाहीं तो आपणांस इतर देशांतून मिळतो, असें दोघांचेंही काम होतें.

आतां, एका देशांतून दुसऱ्या देशांत माल नेण्यास मध्यें समुद्र असला म्हणजे हा अडथळा आहे, असें कदाचित् वाटेल; पण व्यापारास समुद्र फार उपयोगी पडतो. आणि दोन देश फार दूर असले तरी नौकेच्या साधनानें अगदीं जवळच आहेत असें होतें. पहा, जर हें आपलें हिंदुस्थान आणि इंग्रजांची विलायत ह्यांच्या मध्यें जमीनच असती, तर येथला कापूस तेथें नेण्यास त्याचे किंमतीपेक्षां देखील अधिक मजुरी पडती, आणि

इंग्रज लोकांनीं तो तिकडे नेला नसता. पण मध्यें समुद्र आहे म्हणून तो गलबतांत घालून नेण्याला त्यास फार सोपें पडलें.

आता, एका गलबतांत जितका माल जातो तितका माल नेण्यास घोडे किती लागतील बरें? ह्याचा विचार करा. पुष्कळ लागतील ह्यांत संशय नाहीं. आणि पुष्कळ जरी लाविले, तरी माल गलबतावरून जितका लवकर जातो तितका लवकर घोड्यांवरून जाणार नाहीं. घोड्याला मध्यें खायाला पाहिजे, आणि मध्यें विसांवा पाहिजे; ह्यांतच बहुधा निमे वेळ जातो. आणि गलबताला ह्यांची गरज अगदीं नाहीं. गलबताला वायु हाच घोडा असतो. ह्या घोड्याला खायाला नको, विसांवा नको, कांहीं नको. एकदां अवजार सोडिलें म्हणजे झालें; दुसरें कांहीं एक करावें लागत नाहीं.

ह्यावरून एका देशाचा दुसऱ्या देशाशीं व्यापार असल्यापासून दोहोंचेंही काम होतें हें उघडच आहे.

असें हें सुखाचें साधन आपणास असतां एका देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांशीं वाकडें चालावें, आणि आपल्या मोठेपणाचा अभिमान बाळगून दुसऱ्या देशाशीं व्यापार करण्याचा तिरस्कार करावा, हा केवढा वेडेपणा आहे. सर्व देशचे लोक अभिमान सोडून एकमेकांशीं व्यापार करतील तर सर्वांचें कल्याण होईल.

धडा ५५.

बाजार.

दोन कोंकणस्थ ब्राह्मण, रामभट व सखारामभट, हे कांहीं कामाकरितां एके मोठ्या शहरीं गेले होते. तेथें त्यास नाग-

पंचमीचा सण पडला. ते त्यावेळेस बाईच्या कामाकरितां सडे गेले होते, म्हणून सामानसुमान त्यांच्या बरोबर कांहीं नव्हतें, फक्त तीन रुपये मात्र होते. नागपंचमीचे आदले दिवशीं रामभट सखारामभटजीस म्हणतो, भटजी बावा, उद्यांची काय वाट ! उद्यां तर मोठा सण आहे, व गांवांत आपली कोणाची ओळख नाहीं, याकरितां तूप, गूळ, वगैरे साहित्य आणून दिवस साजरा केला पाहिजे.

सखारामभटजीनें उत्तर केलें, बरें; चला जाऊं बाजारांत, वाटेनें आपलें काम झाल्यास करूं, शहरच्या राजे रजवाड्यांची मजा पाहूं, येथील नवीन चिजा काय असतील त्या पाहूं. आणि तसेंच येतेवेळेस आपलें सामानही आणूं. असें बोलून ते आपल्या बिऱ्हाडांतून बाहेर पडले.

तो बाजार जवळच होता, तेथें गेल्यावर बाजाराची शोभा पाहून रामभटजी म्हणाला, काय हो दुतर्फा दुकानांच्या रांगा लागून गेल्या आहेत, व त्यांत किती प्रकारचे तरी जिनस भरले आहेत! हीं पहा येथें वाण्याचीं दुकानें, खोबरें नारळ, बदामें, खारका, पिस्ते, यांच्या ठिकयांशीं ठिकयाच कीं हो लागल्या आहेत! केशर, जायफळें, जायपत्री, इत्यादि पदार्थांचे मोठमोठाले डबे भरले आहेत, व किराण्या जिनसांच्या पिशव्या भेंडपीखालीं लोंबत आहेत. हीं पहा इकडे काछ्यांचीं दुकानें, येथेंही तसेच पेरू, काकड्या, सिताफळें, रामफळें यांचे ढिगांचे ढीग पडले आहेत. हीं शिंप्यांचीं दुकानें पहा, येथें तऱ्हे-तऱ्हेचे बुट्टीदार व मोठ्या किंमतीचे आंगरखे, टोप्या, कुंच्या, बटवे. यांच्या लोंबत आहेत. हीं पहा बोहऱ्यांचीं दुकानें, येथें

जिकडे तिकडे आरसे, सुंदर तसबिरी, व नानाप्रकारचीं बुट्टीदार कापडें मांडलीं आहेत. तसेंच चाकू, कातऱ्या, छप्या, असे शेंकडों पदार्थ नीट ओळीनें लाविले आहेत, तेणेंकरून दुकानांस शोभा किती आली आहे, पहा! हीं पहा हलवायांचीं दुकानें. तशींच गंध्यांचीं, तशींच माळ्यांचीं, जिकडे तिकडे सुगंध घमघमाट सुटला आहे. लोहार, तांबट, पटवेकरी, जोहारी यांचीं, आणि दुसऱ्या कितीएकांचीं दुकानें येथें बसलीं आहेत.

सखारामभट म्हणतो, येथें लाखों रुपयांची खरेदी होत असेल, नाहीं बरें! आपल्या त्या भिकार कोंकणांत काय माती आहे! तें ह्याच्या पासंगासही लागावयाचें नाहीं. मला वाटतें कीं शहरचे लोक फार सुखी असतील, कारण त्यांस वेळच्या वेळीं पाहिजेत तसे जिन्नस सहज मिळत असतील. हें ऐकून रामभट म्हणाला, मी तर अगदीं, बावा, भांबावल्या सारखा झालों आहें; काय घ्यावें आणि काय न घ्यावें हें मला अगदीं सुचत नाहीं; दरएक दुकानीं जो जो पदार्थ पहावा तो तो हवासा वाटतो, आणि पैसा तर नाहीं. आहा! त्यास ह्या सर्व पदार्थांचें सुख मिळत असेल तो किती धन्य असावा बरें! भटजीबावा, दैव खोटें म्हणून आपण भिकाऱ्याच्या घरीं येऊन पडलों. बरें असो, आतां त्याचें कशाला पाहिजे. उगीच जिवाला दुःख मात्र. उद्यांचा दिवस सणाचा आहे, ह्याकरितां अशा गोष्टी मनांत न आणितां आहे तेवढ्यातच चैन भोगावी.

ह्याप्रमाणें दोघांचें बोलणें झाल्यावर साखर, तूप, तांदूळ, डाळ, कणीक, वगैरे जिन्नस घेऊन, व बाकी जे राहिले होते त्याच्या कांहीं चमत्कारिक चिजा बायकामुलांसाठीं घेऊन ते

घरास निघाले; तेवेळेस सखारामभट रामभटजीस म्हणाले, रामभटजी! आपला आजचा किती हा आनंदाचा दिवस गेला! मग रामभट म्हणाला, आपण जे चमत्कार आज पाहिले त्यांची आठवण आपणास नेहमीं होईलच. बरें तर हीं सुखें मनुष्यास कोणापासून प्राप्त होतात हें सर्वांस माहित आहेच. दयाळू ईश्वरानें मनुष्यांच्या सुखाकरितां हे अनेक पदार्थ व उपाय करून ठेविले आहेत, तर त्याचे उपकार नेहमीं स्मरून, आपण एकमेकांशीं गोडीनें वागून सर्वांस सुख होण्याकरितां परमेश्वराची प्रार्थना करीत असावें.

धडा ५६.

स्वच्छपणाविषयीं.

इहलोकीं जीं मनुष्याचीं कर्तव्य कर्मे आहेत त्यामध्यें कितीएक कर्मे लोकांस लक्षून आहेत, व कितीएक आपणास लक्षून आहेत. त्यापैकीं स्वच्छपणा राखणें हें एक कर्तव्य कर्म आवश्यक आहे. आपला मळीणपणा लोकांस व आपणास किती बाधक होतो याचा जेव्हां आपण विचार करितों तेव्हां, मनुष्यास जशी धर्मनिष्ठा आवश्यक तसा स्वच्छपणा आवश्यक आहे, असें कबूल करणें प्राप्त पडतें.

सर्वांनीं शरीर, वस्त्र, पात्र, आणि स्थल, हीं अवश्य स्वच्छ ठेविलीं पाहिजेत. याविषयीं जर आपण उपेक्षा केली तर कांहीं तरी रोग उत्पन्न होऊन आपणास व शेजाऱ्यास इजा होईल.

महामारी म्हणून जो रोग कधीं कधीं उत्पन्न होतो, तो या मळीणपणापासूनच उत्पन्न होतो, यांत संशय नाहीं. तेव्हां

एखाद्या शेतीं मनस्वी पाणी असते तेव्हां तेथें हा रोग उत्पन्न होतो. आणि ज्या शहरांत मनुष्यांची वस्ती फार असते त्या शहरांत रोग उत्पन्न होतो. ह्यावरून जों जों मनुष्यांची दाटी फार होते तों तों मळीणपणा अधिक अधिक वाढत जातो. जेथें मनुष्यांची वस्ती कमी व त्यामुळें घाणही कमी अशा खेडे गांव वगैरे जाग्यांत तो रोग फारसा होत नाहीं; व झाला तरी फार वेळ टिकत नाहीं. इतक्यावरून हा रोग घाणीपासून उत्पन्न होतो, ह्यात संशय नाहीं. हा मळीणपणा बहुतकरून स्थळाचा आहे, म्हणून सर्वांनीं स्थळाच्या स्वच्छपणाकडे सर्वदा लक्ष्य दिलें पाहिजे. घराजवळ मोरीचें पाणी सांचूं देऊं नये, व उकिरडा वाढूं देऊं नये. वरचेवर मोऱ्या धुऊन व जागा झाडून सारवून स्वच्छ ठेवाव्या. हाच स्थळाचा स्वच्छपणा होय.

ह्याप्रमाणेंच वस्त्रें, पात्रें, आणि शरीर ह्यांचा स्वच्छपणा अवश्य ठेविला पाहिजे. रोज आंगावर घेण्याचीं वस्त्रें, तशींच बिछान्यांतील पांघुरणें, मळीण नसावीं. तीं वारंवार धुऊन स्वच्छ ठेविलीं पाहिजेत. तसेंच आपलें शरीर नित्य नित्य धुऊन स्वच्छ ठेविलें पाहिजे. शरीर मळीण असलें तर दुखणें उत्पन्न होतें; व आलेलें लवकर जात नाहीं. म्हणून दुखणेकऱ्याचीं चिरगुटें मळीण होऊं देऊं नयेत. ह्यासाठीं सर्वांनीं हयगय किंवा कंटाळा न करितां स्वच्छपणा ठेवण्याविषयीं फार झटत असलें पाहिजे. जर स्वच्छपणा शोभादायक असून आरोग्यकारक आहे तर त्याचा स्वीकार कां करूं नये !

आतां गरिबीमुळें स्वच्छपणा राहत नाहीं हें कांहीं अंशीं

खरें आहे. परंतु केवळ गरिबीमुळेंच मळीण राहणारे असे थोडे! आळसानें, हेंगाईनें, कंटाळ्यानें किंवा मनास खंत न वाटल्यानें, अथवा स्वभावानें मळीण राहणारे असे फार आढळतात. कितीएक गरीब लोक दरिद्री असून स्वच्छपणा राखितात. आणि कितीएक कोणत्याही गोष्टीची अडचण नसून स्वच्छपणा राखीत नाहींत, असे दृष्टीस पडतात. स्वच्छपणा राखण्यास खर्च फार लागतो असें नाहीं, कांहीं लागतो; तरी द्रव्यापेक्षा मनाचा निश्चय फार पाहिजे. स्वच्छपणा राखणें हें एक व्रतच आहे. तें कितीही अडचणी आल्या तरी मोडूं नये. सारांश, स्वच्छपणा राखण्याचें व्रत जे संभाळीत नाहींत त्यांस दुःखाचा मोठा वांटा, आणि जे संभाळितात त्यांस सुखाचा मोठा वांटा प्राप्त होतो. ह्यासाठीं आपण वस्त्र, पात्र, स्थल, आणि शरीर ह्यांच्या स्वच्छपणाकडे निरंतर लक्ष ठेविलें असतां आपणास व आपल्या शेजाऱ्यांस सुखच होईल, ह्यांत संशय नाहीं. मळीणपणा राखून आपणास व शेजाऱ्यांस दुःख द्यावें हें मनुष्यास योग्य नाहीं. कोणीं म्हटलें आहे कीं, स्वच्छपणा लक्ष्मीचें घर, आणि मळीणपणा अवलक्ष्मीचें घर आहे.

धडा ५७.

सत्याविषयीं मुलांस वृद्ध मनुष्याचा उपदेश.

कोणी वृद्ध मनुष्य म्हणतो. तुमचें बरें करावें असें मी इच्छितों, म्हणून मी जें सांगतों तें तुम्ही ऐका. जर तुम्हांला शांति, निश्चिंतपणा, आणि संतोष हीं पाहिजेत, तरीच जर

तुम्हांस स्वर्गप्राप्ति करून घेण्याची इच्छा असेल, तर सत्याची आवड धरा. सत्य हें दोन रस्ते दोहींकडे जेथें जातात तेथें कोणता रस्ता कोणीकडे जातो हें दाखविण्यासाठीं जो खांब पुरीत असतात त्यासारखें आहे; तसेंच अंधारांत वाट दाखविणारा असा कंदील असतो त्यासारखें आहे; आणि तसेंच गलबतावर दिशा दाखविणारें जें होकायंत्र असतें त्यासारखें आहे.

लोकांस फसवावें असें ज्याच्या मनांत असतें, त्याच्या बोलण्यांत धरसोड, अडखळणें, डोळे मिचकावणें, वगैरे प्रकार किती असतात बरें! पुष्कळच असतात ह्यांत संशय नाहीं. हे प्रकार सत्यांत नसतात, म्हणून तुम्ही सत्याची आवड धरून सत्यच नेहमी मनांत आणा, सत्यच बोला, आणि सत्यच आचरा.

जेव्हां दुसऱ्याचें नुकसान करून आपला नफा करून घेण्याचें आपण मनांत आणितों, तेव्हां आपण असत्य मनांत आणितों असें होतें. जेव्हां आपण गोष्ट अशी असेल तशी सांगत नाहीं, तेव्हां आपण असत्य बोलतों असें होतें. आणि जेव्हां आपण दुसऱ्यास फसविण्याकरितां कांहीं करितों, तेव्हां आपण असत्य आचरितों असें होतें. म्हणून मनांत आणितांना, बोलतांना, आणि करितांना सत्याकडे आपलें लक्ष्य असावें.

आहाहा! सत्य ही स्वर्गाची प्राप्ति करून देणारी वस्तू आहे. जो सत्याला सोडून चालत नाहीं त्याला संपत्तीची खाण, ज्ञानाचा झरा, आणि समाधानाचें घर, हीं सांपडलीं असें समजावें.

जर कोणी एखादा मूर्ख, ईश्वर नाहीं, असें मनांत म्हणेल, तर तें असत्य मनांत आणण्याचें उदाहरण समजावें. जर

कोणी गोष्ट जशी होती तशी सांगितली नाहीं, तर तें असत्य बोलण्याचें उदाहरण समजावें. आणि जर कोणी एखाद्याला कांहीं करूं सांगितलें, आणि तें करितों म्हणून त्यानें केलें नाहीं, तर तें असत्य आचरण्याचें उदाहरण समजावें. तुम्हांला पुन्हा सांगतों कीं, तुम्ही कांहीं करीत असलां तरी, कांहीं बोलत असलां तरी, किंवा कांहीं मनांत आणीत असलां तरी, सत्य कधीं विसरूं नका.

एके दिवशीं मीं एका आंधळ्या आणि मुक्या मुलाला सत्य म्हणजे काय? म्हणून विचारिलें; तेव्हां त्यानें बोटानें नीट सरळ रेषा काढून दाखविली. आणि असत्य म्हणजे काय? म्हणून विचारिलें; तेव्हां बोटानें नागमोडी सारखी वांकडी रेषा काढून दाखविली. ही गोष्ट नेहमीं ध्यानांत राखण्याविषयीं जपत जा. ज्याला पाहिजे तो नागमोडीच्या रस्त्यानें जावो, परंतु तुम्ही तीर जसा रोंखलेल्या ठिकाणीं नीट सरळ जातो तसे नीट सरळ रस्त्यानें जात जा; आणि सर्पाला पाहून जसे दचकून मागें सरतां तसे असत्यापासून दचकून मागें सरा.

धडा ५८.

सर जमशेटजी जिजीभाई बारोनेत, ह्यांचें संक्षिप्त वर्णन.

हे नामांकित पारसी ह्यांचा जन्म तारीख १५ जुलई सन १७८३ ह्यावर्षी गुजराथ प्रांतांत नवसरी महालांतील भलेश्वर नांवाच्या गांवांत झाला. सर जमशेटजी ह्यांच्या बापाचें नांव जिजीभाई धानजीभाई, व त्यांचे आईचें नांव जीवनजी, असें

होतें. जिजीभाई हा मलेश्वरामध्यें जरी गरीब तरी मोठा अब्रूदार गृहस्थ होता. जमशेटजी ह्यांचे सोळावे वर्षी त्यांचा बाप व आई हीं एक वर्षाच्या आंत मृत्यु पावलीं. आईबापांनीं जमशेटजीस लहानपणींच कांहीं सोईकरितां मुंबईस पाठविलें होतें. मुंबईमध्यें जमशेटजी आपला सासरा, मयत शेट फ्रामजी नसरवानजी बाटलीवाला, ह्याचे घरात येऊन राहिले. त्यावेळीं मुंबईमध्यें कोटांत नसरवानजी ह्यानें बाटल्या विकण्याचें एक लहानसें दुकान मांडिलें होतें, त्या दुकानाच्या कामांत जमशेटजी ह्यांनीं त्याची मदतगारी केली होती. जमशेटजीस गुजराथी आणि इंग्रेजी भाषा व लिपी ह्यांची माहिती सहज झाली. नंतर सन १७९९ ह्यावर्षी जमशेटजी जिजीभाई आपला मावसभाऊ, मेहरवानजी माणिकजीशेट, ह्यांच्या मुनिमाच्या हाताखालीं माहितगारी होण्याकरितां चाकरीस राहिले होते. वर सांगितलेल्या गृहस्थाचा व्यापार चीन देशाशीं असे, त्यामुळें त्याचें जाणें येणें त्या देशांत होत असे. मेहरवानजीशेट ह्याबरोबर जमशेटजींनीं सन १७९९ च्या वर्षी चीन देशांत आपली पहिली खेप केली होती. दुसऱ्या खेपेस ह्यांनीं व्यापारासंबंधीं बरीच माहितगारी करून घेतली, ती इतकी कीं थोडक्यातच आपला सासरा, फ्रामजी नसरवानजीशेट, ह्याबरोबर भागीदार होऊन जरी त्यासमयीं ह्याजवळ २००० रुपयांपेक्षां अधिक पुंजी नव्हती, तरी त्यांनीं आपला व्यापार वाढवून आपल्या साखीनें व आपल्या सासऱ्याच्या मदतीनें व्यापाराकरितां १५००० रुपयाचें भांडवल जमविलें.

जमशेटजी आपल्या सासऱ्यास मुंबईत ठेवून चिनांत आत येत असत. एकेसमयीं चिनाहून येत असतां ईस्त इंदिया कंप-

मीच्या एका लढाऊ गलबतावरील लोकांस आपल्या गलबतावर ह्यांनी घेतलें. त्यावेळीं इंग्लिश व फ्रेंच ह्यांमध्यें लढाई चालली होती. जमशेटजी ह्यांच्या गलबतावरील इंग्रेजलोकांची व फ्रेंच लोकांची बंगालच्या अखातांत लढाई झाली; त्या लढाईंत इंग्रेज लोकांचा जय झाला त्यामुळें जमशेटजी ह्यास आनंद होऊन पुढें ते आपल्या घरीं आले. नंतर सन १८०७ ह्यावर्षी मुंबईमध्यें मोठी आग लागली तींत ह्यांचा व्यापारासंबंधीं कांहीं माल जळून गेला, हें एक असंतोषास कारण झालें.

जमशेटजींनीं चीन देशास एकंदर पांच सफरी केल्या. शेवटची सफर सन १८०७ ह्यावर्षी केली; त्या नंतर त्यांनीं प्रवास केला नाहीं. आपलें मुख्य ठिकाण मुंबईत करून चीन, कलकत्ता, सिंगापूर, सयाम, इत्यादि देशांत त्यांनीं व्यापार चालू केला होता. त्यांच्या व्यापाराची बरोबरी थोडकेच इतर देशचे लोक करूं शकतील. सन १८०७ पासून सन १८४२ पर्यंत व्यापारांत त्यांनीं मोठ्या राजाप्रमाणें संपत्ती मिळविली इतकेंच नाहीं, तर देशोदेशीं आपली कीर्तिही पसरिली.

जमशेटजी ह्यांनीं कित्येक गरीब लोकांस त्यांचीं कर्जें फेडून मुंबईच्या बंदिशाळेंतून सन १८२२ ह्या वर्षी मुक्त केलें; आणि ह्या वर्षापासून त्यांच्या औदार्यास आरंभ झाला. ह्या पुढें त्यांचें औदार्य झऱ्याच्या पाण्यासारखें आजपर्यंत वाहत आहे, आणि नदीच्या उगमा जवळ लहान प्रवाह असून पुढें जसा तिचा प्रवाह उत्तरोत्तर मोठा होत जातो, तसें ह्या नामांकित पुरुषाचें औदार्य प्रतिवर्षी वृद्धिंगत होत गेलें. ह्यांनीं जी धर्म-

कृत्यें केलीं तीं सर्व जरी आम्हास ठाऊक नाहींत, तरी जीं मोठीं असून सर्वांस ठाऊक आहेत तीं खालीं लिहिलीं आहेत.

१ मुंबईच्या पारशी लोकांकरितां धर्मखातीं.	४४००००
२ सुरतेच्या पारशी लोकांकरितां	१२५०००
३ नवसरीच्या पारशी लोकांकरितां	६२५००
४ एलांकी बाग आणि दुसऱ्या इमारती मुंबईच्या पारशी लोकांस वापराया करितां धर्म खातीं दिल्या त्याचे	७००००
५ पुण्यामध्यें अग्यारी बांधिली तिजबदल.	४५०००
६ नवसरीमध्यें पारशी लोकांसाठीं धर्मशाळा आणि बाग त्यांबदल	२००००
७ नवसरींत पारशी लोकांच्या तर्फेनें गायकवाड सरकारांत भरले.	१७०००
८ मुंबईतील पारशांच्या पंचाइतीच्या धर्मखातीं परचुरण भरलेली रकम.	१५०००
९ सुरतेच्या आणि नवसरीच्या अवजूनच्या फंडामध्यें वेग वेगळाल्या वेळीं दिलेल्या रकमा, आणि सुरतेमध्यें मोठी आग लागली त्या वेळेस रवाना केलेलें बक्षीस, आणि गुजराथेंतील पारशी लोकांस त्यांच्या फायद्याकरितां ठेविलेल्या दुसऱ्या रकमा.	२५००००
१० दोखमा आणि अग्यारी इत्यादि दुसऱ्या धर्माच्या जाग्यावर खर्चलेली रकम. . .	४७०००
११ शेट मोतीचंद अमीचंदाकरितां केलेलें धर्मखातें.	३००००

१२ मुंबईच्या पांजर पोळामध्यें........	७२०००
१३ स्वदेशी कुटुंबांस दिलेला आश्रय.....	४४०००
१४ सरजमशेटजी जिजीभाई हासपितल (वैद्यशाळा) बांधण्याकरितां दिलेली रकम.	१६०५०८
१५ वरील वैद्यशाळेच्या लगत बांधलेलें सूतिकागृह त्याबदल खर्च.............	३००००
१६ माहीमचा पूल बांधिला त्याबद्दल.....	१५५०००
१७ माहीमच्या पुलापुढें रस्ता बांधिला त्याबदल.	२२०००
१८ वांदरे गावांत तळें व एरला पारलाचा पूल.	१००००
१९ पुण्याच्या नदीस धरण बांधिलें त्याबद्दल.	१८००००
२० भायखळ्याच्या रस्त्यावर तलाव बांधिला त्यास..................	२३०००
२१ खंडाळ्यामध्यें धर्मशाळा इत्यादिकांस.	२००००
२२ मुंबईमध्यें दिस्त्रिक्त बिनेवोलेंत सोसैंतीच्या धर्मशाळा खात्यासंबंधी.	१५००००
२३ मुंबईमध्यें चित्रें आणि दुसरीं चांगलीं कारागिरीचीं कसबें शिकवावयाकरितां स्कूल आफ दि जेन स्थापिलें त्यास. ..	२५०००
२४ विहिरी, तलाव, इत्यादि बांधिले त्यास.	२५०००
२५ भाटामध्यें पूल बांधिला त्यास.......	७०००
२६ ग्रांत मेडिकल कालेजामध्यें इनामाबद्दल फंड.	११०००
२७ एलफिनस्तन कालेजाच्या प्रोफेसरशिपच्या फंडांत....................	११०००
२८ परचुरण धर्मखात्याच्या टिपेंत......	७००००

२९ नवसरीमध्यें दवाखाना करण्याकरितां.. ७५०००

एकंदर रुपये — २२१२०००

० जमशेटजी जिजीभाई ह्याचें औदार्य आणि स्वदेशकल्याण करण्याची इच्छा इत्यादि गुणांचें वर्णन मुंबईचे माजी गवरनर सर जेम्स रिवट कारनाक साहेबांनीं इंग्लंदच्या दरबारीं केल्यावरून आपल्या नामदार राणीसाहेबांकडून त्यास नैत ह्या पदवीची सनद सन १८४२ ह्या वर्षी मिळाली. ह्यावरून त्यास "सर" हा किताब प्राप्त झाला. पुढें सन १८४३ त रत्नखचित एक चांद त्यास राणी साहेबांकडून बक्षीस मिळाला. नंतर सन १८५८ ह्या वर्षी "बारोनेत" ह्या पदवीची सनद त्यास मिळाली, ही पदवी त्यांच्या वंशजांस निरंतर चालावयाची आहे. ह्या नामांकित पुरुषाचा मृत्यु तारीख १५ एप्रिल सन १८५९ ह्या वर्षी झाला, त्या वेळेस त्याचें वय ७६ वर्षांचें होतें. अरबस्थानाच्या किनाऱ्यापासून चीनच्या समुद्रापर्यंत, २५००००००० लोकांच्या वस्ती मध्यें, ह्याची बरोबरी करूं शकेल असा गृहस्थ विरळा.

धडा ५९.


पद उपदेशपर.

बरें म्हणुनि घेई ॥ जनामधिं, बरें म्हणुनि घेई ॥ ध्रुवपद ॥
धनविद्येचा गर्वभार[१११] हा ॥ नको धरूं डोई[११२] ॥१॥ जना०॥
परधनदारा[११३] अभिलाषातें[११४] ॥ धरूंनको हृदयीं २॥ जना०॥
कुटुंब[११५] भरणासाठीं भलतें ॥ करूं नको कांहीं ॥३॥ जना०॥
मान अहंता[११६] सोडुनि मुंगी[११७] ॥ हो साखर खाई ॥४॥ जना०॥

विहित[५८] आचरुनि ईशपदावरि[५९] ॥ निजमस्तक वाहीं ॥५॥ त्र॰ त्रिजगन्नाथा[६०] नमुनि मागतों ॥ हेंचि मला देईं ॥६॥ क्षमा॰॥

धडा ६०.

घोडा.



घोडे पृथ्वीवर बहुतकरून सर्वत्र आहेत; जेथें बर्फ फार तेथें

मूलस्थान. मात्र नाहींत. ह्याचें मूळचें उत्पत्तिस्थान आशिया खंड आहे. रानघोडे पुष्कळ देशांमध्यें आहेत; दक्षिण अमेरिकेंतील मोठाल्या मैदानांत तर हे पुष्कळच आहेत. सैबीरिया प्रांताच्या दक्षिणभागीं, चिनई तार्तरींत, आफ्रिका खंडांत, आणि कित्येक दुसऱ्या देशांत कधीं कधीं रानघोड्यांचे मोठेमोठे कळप दृष्टीस पडतात. अरबस्थानांतही हे आहेत, पण फार नाहींत. अरबलोक हर प्रयत्न करून त्यांस धरितात अरबी घोडा सर्वांत देखणा, हुकमी, धीट, आणि निभावणीचा असतो.

घोडा सर्व चतुष्पाद जनावरांमध्यें देखणा आणि बांधेसूद

स्वरूप. असतो. घोड्याची उंची पांच वितीं पासून सात वितीं पर्यंत असते. घोडा पाहिला असता तो

सौंदर्य आणि उत्साह यांची केवळ मूर्तिच थोर असा दिसतो. त्याची मुद्रा प्रौढ; त्याचे डोळे मोठे आणि पाणीदार; त्याचे कान छानदार असून मस्तकास शोभवायाजोगे बेताचे असतात, फार रुंद व फार लांब नसतात, व ते सर्वदा उभे असतात; त्याची सुंदर अयाल त्याच्या मानेला व डोक्याला शोभविते; त्याची दाढी लांब असून तिजवर लांब लांब केश असतात, तेणेंकरून ती दाढी त्याच्या मागल्या भागास शोभा आणून त्याला चंवरीच्या ठिकाणीं होते; त्याच्या पायाचा आकार मुळचाच चांगला असून एकगोळी पसरट खुराच्या योगानें पाय फार सुंदर दिसतात. घोड्याचे रंग पुष्कळ प्रकारचे असतात; पांढरा, करडा, काळा, कुमाईत, तांबडा, जर्दा, बोर, सारंगा, निळा, इत्यादि. कित्येक घोड्यावर निरनिराळ्या अनेक रंगाचे पट्टे असतात.

गुण. घोडा बळकट, धीट, चलाख, हुकमी, आणि दमदार असतो. कितीही श्रम झाले तरी ते तो सोशितो. घोड्यास आठवण चांगली राहते; त्याला जसें शिकवावें तसें तो शिकतो. अरबलोकां जवळचे घोडे अगदीं घरांतल्या माणसाप्रमाणें असतात. ज्या तंबूंत अरब लोक राहतात त्याच तंबूंत त्यांचे घोडे असतात; पण कोणाला कांहीं उपद्रव करीत नाहींत.

चाली. घोड्याला तीन चाली स्वाभाविक असतात, एक साधी चाल, एक दुडकी चाल, आणि एक भरधांव चाल. भरधांव चाल, सर्वांमध्यें बलद असतें. शिवाय शिकविलेल्या चाली अनेक प्रकारच्या असतात. घोड्याच्या शब्दाला हिंसणें व खिंकाळणें म्हणतात.

सामान्यतः घोड्याचा स्वभाव साधा असून निरुपद्रवी असतो. रानघोडे कळप करून असतात. त्यांच्या

स्वभाव.

कळपांत शेंकडों हजारों घोडीं असतात. ते उघड्या उतरणीच्या मैदानांत राहतात, झाडींत किंवा डोंगरी रानांत राहत नाहींत. त्या कळपांत एक पुढारी असतो त्याच्या धोरणानें तीं सर्व घोडीं वागतात. एखादे वेळेस भय प्राप्त झालें असतां तो पुढारी घोडा मोठ्यानें खिंकाळून इतरांस सूचना करितो, म्हणजे तीं सर्व पळून दूर जातात. अमेरिकेंतील रानघोडे पाळींव घोड्याला गांठून त्याला वळवून आपल्या कळपांत नेतात. ह्यामुळें वाटसरांचा कधीं कधीं खोळंबा होतो. पण तार्तरी देशांतील रानघोडे दुसऱ्या घोड्यास आपल्या कळपांत येऊं देत नाहींत. कदाचित् आलें तर त्याला दुलाथ्या मारून पिटून लावितात. घोडे झोंप थोडी घेतात; आणि ती तरी बहुत करून उभ्यानेंच घेतात.

घोड्यांचें खाणें गवत आहे. तें न मिळे तर कधीं कधीं झाडांचा कोंवळा पाला खातात. जेथें आंखूड गवत

भक्ष्य.

उगवतें तेथें इतर पशु उपाशीं मरावयाचे, पण तशा ठिकाणीं घोड्यास पुष्कळ चरावयास सांपडतें; त्यांचे ओंठ व दात आंखूड गवत तोडावयाजोगेच देवानें केले आहेत. त्याला पाणी पुष्कळ प्यावयाला पाहिजे, तें मात्र असलें म्हणजे झालें. घोड्याला रवंथ करितां येत नाहीं; ते मुळींच आपलें भक्ष्य दाढांनीं बारीक करून गिळितात. कळमलेला थोडा दाणा खातो; परंतु तें त्याचें मूळचें भक्ष्य नव्हे.

घोडी सवर आल्यापासून प्रायः अकरा महिन्यांनीं प्रसवते. तिला दरखेपेस प्रायः एकच शिंगरूं होतें. नर असल्यास शिंगा आणि मादी असल्यास शिंगी म्हणतात. घोडीला दोन थानें असतात. घोड्याचें आयुष्य बहुत करून २५ किंवा ३० वर्षांहून अधिक असत नाहीं. घोड्याच्या वयाची परीक्षा त्याच्या दांतांवरून करितात. घोड्याची वाढ चार वर्षे पर्यंत असते.


पोरें.

घोडा मनुष्याच्या फार उपयोगीं पडतो. बसावयाच्या, गाडी ओढावयाच्या, व ओझें वहावयाच्या कामास उपयोगीं पडावयाजोगें जनावर ह्यासारखें दुसरें नाहीं.

उपयोग.

धडा ६१.

गाढव.



गाढव आणि घोडें ह्या पशूंचा वर्ग एकच आहे, व त्यांची बरीच सारखवट आहे. ज्या देशांत जनावरें बाळगण्याचा प्रकार

आहे, त्या देशांत बहुतकरून लोक गाढवें बाळगितात. या प-

मूलस्थान. शूचें मूलस्थान म्हटलें तर आशियाखंडाचा मध्यभाग होय. तार्तरी देशांतल्या पहाडी रानांत, व इराण अरबस्तान वगैरे देशांच्या जंगलांत, रानगाढवांचे मोठाले कळप असतात. पावसाळ्याचे अखेरीस हजारों रानगाढवें हिंदुस्थानाकडे येतात. त्या पैकीं कितीएक कार्तिकाचे सुमारास कच्छ व गुजरात ह्या देशांत येऊन चैत्राचे सुमारें तार्तरी देशांत परत जातात. दक्षिण अमेरिकेंतल्या रानांत रानगाढवें फारच आहेत, व त्यांचा उपद्रव लोकांस फार होतो.

गाढवाचे पाय व खूर घोड्याच्या सारखेच असतात. पण

स्वरूप. ह्याचे कान लांबते असून घोड्याच्या कानाहून लांब असतात. ह्याच्या मानेवरचे केंस आखूड असतात, आणि शेपटीवर लांब केंस नसून तिच्या शेवटीं केंसांचा लहानसा पुंजका असतो. बाळगलेलें गाढव बेढब दिसतें, पण रानगाढव ढबदार असतें. गांवठी गाढवापेक्षां रानगाढव उंच असतें, व त्याच्या आंगावरील केंस पांढुरके असून चकचकीत असतात. गांवठी गाढवाचा रंग राखेसारखा असतो. गाढवाच्या पाठीच्या कण्यावर उभी एक व खांद्यावर आडवी एक अशा पिंगट रंगाच्या केंसांच्या दोन ओळी असतात. ह्या देशांतील बाळगलेलीं गाढवें मोठ्या बोकडापेक्षां फारशीं उंच नसतात; परंतु स्पेन देशांतील गाढवें इराणी घोड्या प्रमाणें सात विती देखील उंच असतात. तीं गाढवें मोठीं, बळकट, व देखणीं असतात. तीं घोड्याप्रमाणें माणसाच्या कामीं पडतात.

तसल्या गाढवाची किंमत कधीं कधीं एक हजार रुपयांहून अधिक असते.

गाढव स्वभावानें गरीब व सोशीक आहे. तें पुष्कळ श्रम करीत असूनही वाईट साईट खाणें खाऊन संतोष मानितें. गाढव आपल्या धन्याची व राहाण्याच्या ठिकाणाची ओळख चांगली धरितें, व आण्या येण्याची वाट लक्षात ठेवितें. गाढव निर्बुद्ध व हेकड आहे, अशी लोकांत प्रसिद्धि आहे, पण मनुष्यें त्याला चांगल्या रितीनें वागवीत नाहींत म्हणून; एरवीं गाढवाचे गुण वाईट नाहींत. गाढवाचा शब्द फार कर्कश आहे, म्हणून तो ऐकावयाचा कोणाला संतोष नसतो. गाढवाच्या चाली घोड्याच्या चालींप्रमाणेंच, परंतु तितक्या जलद नसतात.

गुण.

रानगाढवाच्या वर्तनाच्या रीति बहुतकरून रानघोड्याच्या रीतीं सारख्याच असतात. गाढवाचें नाक व कान फार तिखट असतात, ह्यामुळें त्यास धरण्याचें मनुष्यास फार कठीण पडतें. रानांतील गाढवें इतकीं तापट व जहाल असतात तरी त्यांच्या पाठीवर एकदा ओझें पडलें म्हणजे तीं अगदीं गरीब होतात. रानगाढवें आपल्या कळपांत घोड्याला येऊं देत नाहींत. घोड्याप्रमाणें गाढव झोंप थोडी घेतें. थकलें असलें तरच झोंपे करितां जमिनीवर पडतें.

रीति.

खारट व कडू अशा वनस्पति आणि राठ गवत अशांवर गाढव उपजीविका करितें; पण त्याला प्यावयास पाणी स्वच्छ पाहिजे.

भक्ष.

गाढवी सुमारें बारा महिने गाभण राहून प्रसवते. तिला हर खेपेस एकच शिंगरूं होतें. तिची शिंगरावर फारच ममता असते. घोडीप्रमाणें गाढवीला दोन थानें असतात. गाढव सुमारें पंचवीस तीस वर्षे वांचतें. त्याची वाढ चार वर्षे पर्यंत असते.

पोरें.

गाढवें गरिब लोकांस ओझीं वाहण्याच्या कामांत फार उपयोगीं पडतात. शक्तीहून अधिक ओझें असलें तरी तें घेऊन खुशीनें चालतात. डोंगरांतून व अवघड रस्त्यावरून ओझीं घेऊन चालायास घोड्यापेक्षा गाढवें फार उपयोगीं पडतात. गाढवाचें कातडें कठीण व लवचीक असतें. रानगाढवाचें मास तार्तरी लोकांस फार आवडतें. गाढवीचें दूध पुष्कळ रोगांवर औषधाप्रमाणें उपयोगीं पडतें.

उपयोग.

धडा ६२.

गाय बैल.



ही जनावरें रवंथ करणाऱ्या जनावरां पैकींच आहेत. ह्यांच्या

मूलस्थान. वस्ती जेथें आहे तेथें हीं जनावरें बहुतकरून असतात. हीं जनावरें रानांत स्वतंत्र बहुत करून आढळत नाहींत. पोलंद देशाच्या दलदलीच्या रानांत कांहीं आहेत, व केप आफ गुदहोपा जवळच्या रानांत पुष्कळ आहेत. तीं मोठीं असतात. तिबेत देशांत व उत्तर अमेरिकेच्या रानांत वनगाई असतात.

स्वरूप. बैल किंवा गाय हें जनावर आंगानें मोठें असतें. आंगाच्या मानानें पाहिलें तर ह्याचे पाय आखूड दिसतात. त्याला दोन शिंगें असतात, तीं उभीं किंवा वांकलेलीं असतात. त्या शिंगामागें कान असतात; ते रुंद असून पाहिजे तिकडे त्यास हालवितां येतात. त्याच्या गळ्याखालीं एक पातळ कातडी लोंबत असते, तिला पोळी किंवा कांबळी म्हणतात. त्याचें शेपूट लांब असून त्याच्या शेवटीं केसांचा झुबका असतो. त्याच्या पायाच्या खुराला दोनदोन गेळें असतात. हिंदुस्थानांतील बैलाच्या खांद्यावर एक मांसाचा गोळा असतो, त्याला कोळें किंवा वशिंड म्हणतात. असें कोळें दुसऱ्या कोणत्याही देशांतील बैलास नसतें. गाय बैल हीं जनावरें अनेक रंगांचीं असतात.

गुण. हीं जनावरें स्वभावानें गरीब असतात. पाळलेला बैल शांत असून धन्याच्या आज्ञेंत असतो, आणि मनापासून धन्याचें पुष्कळ काम करितो. गाईच्या ओरडण्यास हंबरणें व बैलाच्या ओरडण्यास डुरकणें म्हणतात. रानांतील गाई व बैल हीं द्वाड व मारकीं असतात. ह्या जनावरांस राग आला म्हणजे हीं मोठ्या आवेशानें लढतात; आणि लढतांना आपलीं शिंगें रगडून मारितात.

गाय बैल हीं जनावरें गवत, झाडपाला खाऊन आपली

भक्ष्य.

उपजीविका करितात. इतर रवंथ करणाऱ्या जनावरांप्रमाणें ह्या जनावरांसही चार पुकाशय, म्हणजे अन्नाच्या पिशव्या, आहेत. पहिल्यानें जो चारा तीं सरासरी चावून गिळितात तो पहिल्या पिशवींत जातो; मग तो दुसऱ्या पिशवींत उतरतो, तेथें तो ओला होतो; मग फावल्यावेळीं त्या चाऱ्यांतून थोडा थोडा तोंडांत आणून चघळीत बसतात. ह्याचेंच नांव रवंथ करणें. पुढें तो चघळलेला चारा तिसऱ्या पिशवींत जाऊन मग चवथ्या पिशवींत जातो, तेथें पचन होतें. पाळलेल्या बैलास कोणी दाणा व गाईस चूण पेंड वगैरे चारितात. हीं जनावरें वेळेस असेल तसें पाणी पितात.

गाय फळल्यापासून नऊ महिन्यांनीं विते. गाईला दर

पोरें.

खेपेस बहुत करून एकच पोर होतें, त्याला वासरूं म्हणतात. तें नर असल्यास पाडा व मादी असल्यास पाडी असें म्हणतात. वासरूं आईच्या पोटांतून बाहेर पडलें म्हणजे लागलेंच उभें राहतें, व थान प्यावयास लागतें. ह्याची वाढ तीन वर्षे असते. हें जनावर चवदा पंधरा वर्षां पुढें वांचत नाहीं. शिंगें व दांत पाहून ह्याच्या वयाची परीक्षा करितात. गाईला चार थानें असतात. तिच्या दुधाच्या पिशवीला कांस किंवा ओंटी म्हणतात.

बैल मनुष्याच्या फार कामीं पडतो. प्राचीनकाळापासून

उपयोग.

लोक बैला कडून शेतकीचें काम करवीत आले आहेत. कोणी त्यास गाडीला जुंपितात, व कोणी त्याच्या पाठीवर ओझें घालून चालवितात. बैलापेक्षांही गाय

मनुष्याच्या फार उपयोगी पडते. ती प्रतिदिवशीं दोन वेळ दूध देते, तें दूध व त्यापासून झालेलें दहीं, ताक, लोणी, तूप, हें मनुष्याला फारच आवश्यक आहे.* हिंदुलोक खेरीज करून सर्व लोक ह्या जनावराचें मास खातात. ह्याच्या बहुत करून सर्व अवयवांचा मनुष्याला उपयोग होतो. ह्याचें चर्म, मास, अस्थि, मज्जा, स्नायू, शृंगें ह्यांतून कांहीं वांया जात नाहीं.

धडा ६३.

म्हशी रेडे.



आफ्रिका खंडांतील व हिंदुस्थानांतील जे उष्ण प्रदेश ते ह्या पशूंचें मूलस्थान होय. ख्रिस्ती शकाचे सातवे शतकांत हा पशु येथून इताली देशांत कोणीं नेला होता असें म्हणतात. हल्लीं यूरोप खंडाचे दक्षिण भागीं हे पशु पुष्कळ झाले आहेत. आफ्रिका, हिंदुस्थान, व सिंहलद्वीप येथील रानांत रानम्हशी व रानरेडे आहेत.

मूलस्थान.

---

* हिंदुस्थानाजवळच्या कित्येक देशांतील लोकांस दुभत्याचा फार कंटाळा असतो, हा मोठा चमत्कार आहे.

म्हशी रेडे हे पशु काहीं अंशीं गाई बैल ह्यांसारखे असतात; पण ह्यांचें स्वरूप त्यांच्या इतकें ठवदार नसतें. ह्यांचीं शिंगें काळीं, चापट, व लांब असून मानेच्या दोहों बाजूंकडे पसरलेलीं असतात. ह्या पशूंचें डोकें मोठें, डोळे लहान, व तोंड चापट असतें, ह्यामुळें हे बेढब दिसतात. ह्यांचा रंग काळा असतो. ह्यांच्या कपाळावर, गालफरांवर, व तोंडाच्या खालच्या बाजूस व गुडघ्यापासून खालीं पायांवर राठ केंस असतात. ह्या शिवाय सर्वांगावर फारसे केंस नसतात. शेपटीच्या शेवटास केंसांचा झुबका असतो. ह्यांचे पाय आखूड, व पायाच्या खुराला दोन गेळें असतात.

स्वरूप.

हे पशु गाईबैलांपेक्षां अधिक हट्टी असतात. ह्यांची मुद्रा मूर्खपणाची दिसते. रान रेड्याची मुद्रा तर फार भयंकर व क्रूर असते. ह्या पशूंस पोहतां चांगलें येतें. ह्यांचें घ्राणेंद्रिय त्यास फार उपयोगीं पडतें, म्हणून पळतांना देखील नाक पुढें झालेलें असतें. ह्यांच्या चालण्याची ढब अडाणीपणाची दिसते, तरी ह्यांस जलद पळतां येतें. ह्यांचा शब्द मोठा असून कर्कश असतो. ह्यांस सावलींत बसणें व चिखलांत लोळणें आवडतें; पाण्यांत बसण्याची तर फारच आवड असते. रान म्हशी व रान रेडे ह्यांचे कळप नेहमी झाडींत व दलदलींत असतात; उघड मैदानांत राहणें त्यांस आवडत नाहीं.

गुण.

गवत कडबा हें ह्यांचें भक्ष्य आहे. पाळींव म्हशींस दाणा पेंडही लोक चारितात. गाई बैलांप्रमाणें हे पशु रवंथ करितात.

भक्ष्य.

म्हैस चार वर्षांच्या वयांत आली म्हणजे फळायाजोगी होते,

पोरें. व फळल्यापासून दहा महिन्यांनीं विते. तिला दर खेपेस प्रायः एकच पोर होतें, त्याला पारडूं किंवा रेडकूं म्हणतात. गाईपेक्षां म्हशीला दूध अधिक असतें. बारा वर्षां पुढें म्हैस फळत नाहीं. ह्यांचें आयुष्य गाई बैलांच्या आयुष्या इतकेंच असतें.

उपयोग. हिंदुस्थानांत म्हशी रेडे गरीब लोकांच्या फार उपयोगीं पडतात. नांगर गाडे ओढण्याच्या कामास रेडे लावितात. म्हशीचें दूध गाईच्या दुधा इतकें चांगलें नसतें; तरी त्यापासून तूप पुष्कळ सांपडतें. ह्या पशूचें कातडें बळकट, जाड, व टिकाऊ असतें. शिंगांच्या मुठी वगैरे होतात. ह्यांचें मांस कोणास आवडत नाहीं.

धडा ६४.

बकरें.



मूलस्थान. सर्व देशांत लोक बकरीं बाळगितात. बकरीं रानांतही असतात; तीं आशिया आणि यूरोप ह्या खंडांच्या किती एक डोंगरांत असतात.

बकरें बहुत करून मेंढरासारखेंच असतें. भेद इतकाच कीं बकऱ्याच्या शिंगांचा रोंख वर असतो, व मेंढराच्या शिंगांचा खालीं असतो. आणखी, मेंढराच्या आंगावर लोंकर असते, आणि बकऱ्याच्या आंगावर केंस असतात. आशियामैनरांतील आंगोरा येथें जीं बकरीं आहेत त्यांच्या आंगावर पांढरी लोंकर असते; त्या बकऱ्यांची जात सर्वांत उत्तम आहे.

स्वरूप.

ह्यांतील नरास बकरा किंवा बोकड, आणि मादीस बकरी किंवा शेळी म्हणतात, व पोरास करडूं म्हणतात. बोकडाचे हनवटी खालीं लांब दाढी असते, आणि आंगावरचे केंस जटा किंवा झिंज्या ह्यांसारखे असतात; ह्यामुळें तो मोठा साधूसारखा विरक्त व मौढ दिसतो.

सर्व बकऱ्यांचा रंग एक सारखा नसतो. तीं निरनिराळ्या रंगांचीं असतात. तिबेत देशांत पिंवळ्या रंगाचीं बकरीं निपजतात.

लहानपणीं बकरें खेळकर व चपळ असतें. बकरें मेंढरापेक्षां शहाणें असतें. कोणीं लाड केले तर तें त्याला समजतात. त्याला मनुष्याची माया लैवकर लागते. बकऱ्याचा स्वभाव चंचळ व स्वच्छंदी असतो. त्याला राग येण्यास थोडें कारण पुरतें. कोणीं यत्किंचित् खोडी केली असतां रागावून त्याला बेलाशक मस्तकाची धडक मारितें.

गुण.

बकरीं फार चलाख असतात. कितीही अवघड खडपे असले तरी त्यांवर तीं सहज चढून जातात. जेथें पक्ष्यांशिवाय इतरांस जातां येणार नाहीं अशा डोंगराच्या उंच व अवघड

कड्यावरही त्यास जातां येतें. त्याचे खूर दुभागलेले असून खालून खोलगट असतात, व त्या खुराच्या कडा धारेसारख्या असतात, ह्यामुळें त्यांचा पाय घसरत नाहीं. अवघड जाग्यांवरही पांचसात हातांवर त्यास सहज उडी मारितां येते. दोन बकऱ्यांची सांगड घातली तरी संकेत केल्याप्रमाणें एकदम अचूक उडी मारितात. मेंढरापेक्षां बकरें कटाक्ष असतें. तें भर उन्हांत खुशाल निजतें; त्याला थंड वाऱ्याचें कांहींच भय वाटत नाहीं.

चाली.

रानबकरीं दहापंधरा इतक्यांचा कळप करून असतात; ह्यापेक्षां प्रायः अधिक नसतात. तीं दिवसभर डोंगराच्या कड्यांवर चरतात, आणि रात्रीं खालच्या मैदानांत उतरून चरतात. बकऱ्याला टेंकड्याचे माथ्यावर निरनिराळे ठिकाणीं चरावयास पाहिजे. पाणथळ कुरणें किंवा माजलेल्या गवताचीं रानें त्यास आवडत नाहींत. जितकी उंच आणि अवघड जागा असेल तितकी त्यास आवडते. तशा ठिकाणीं पडून खुशाल झोंप घेतात, किंवा बसून रवंथ करितात. रानबकऱ्यास पारध्यानें गांठिलें असतां एखादे वेळेस तें तुटलेल्या कड्यावरून खालीं उडी टाकून आपणाला शिंगावर सावरून न दुखवतां पार पडतें. रानबकरीं मूळचीं भितरीं असतात, पण एकदा माणसाळलीं म्हणजे त्यास माणसांखेरीज चैन पडत नाहीं.

शेळीला दुसऱ्या जनावराचें पोर पाजावयास लाविलें तर त्याला ती पाजिते. बकऱ्याची जात कुशळ असते. बकऱ्यास जसें शिकवावें तसें तीं करितात. ह्याविषयीं फारसें सांगावयास

नको. माकडाच्या खेळांत एक बोकड असतो तो धन्याच्या हुकमांत कसा वागतो हें पुष्कळांनीं पाहिलेंच आहे. बकऱ्याची लढाई मेंढरांच्या लढाईसारखी नसते. बकरीं मागल्या दोन पायांवर उभीं राहून शिंगाच्या एक्या बाजूनें टकर मारितात. मेंढरांच्या कळपांत बकरीं चरावयास घातलीं तर तीं कळपांत मेंढरांच्या पुढें चालतात.

भक्ष्य. बहुतेक वनस्पती बकऱ्याला आवडतात, म्हणून शेळीचें दूध गुणावह असतें. ओसाड व नापीक अशा माळरानांतही बकरीं आपल्या पोटापुरतें गवत पाला मिळवून खातात.

पोरें. शेळीला दर खेपेस बहुत करून दोन कदाचित् तीन पोरें होतात. मेंढीच्या व गाईच्या दुधापेक्षां शेळीचें दूध दाट व गोड असतें. बकरीं दहा बारा वर्षे जगतात. दातांवरून त्यांचें वय समजतें.

उपयोग. बकऱ्याचें मास लोक खातात, पण मेंढराच्या मासा इतकी त्याची प्रतिष्ठा नाहीं. बकऱ्याचीं शिंगें चाकूच्या मुठी करावयास उपयोगीं पडतात, व त्याच्या चरबीच्या उत्तम मेणबत्त्या होतात. बकऱ्यांच्या कातड्यावर रंग फार चांगला खुलतो, म्हणून त्याच्या पुष्कळ जिनसा करितात. बकऱ्यांच्या केसांचीं कामलेट वगैरे वस्त्रें होतात. बकऱ्याचें कातडें कमावून कागदासारिखें करितां येतें. करडाच्या कातड्याचे हातमोजे फार मऊ होतात.

धडा ६५.

कुत्रा.



मूलस्थान. आफ्रिका खंडांतील कांगो आणि केप आफ गुद होप या देशांत, अमेरिका खंडांत, न्यूहालंदांत, आणि दुसऱ्या पुष्कळ देशांत रानकुत्रे असतात. पाळींव कुत्रे सर्वत्रच आहेत. दक्षिण पासिफिक महासागरांतील कांहीं बेटांत मात्र नाहींत.

स्वरूप. कुत्र्यांच्या जाती पुष्कळ आहेत, पण सर्वांची आगलट बहुत करून सारखीच असते. कुत्र्याच्या शरीराचा बांधा चांगला असतो, व मुद्रा हुशार दिसते. त्याचें शरीर व अवयव पाहिले असतां तो बळकट व चपळ आहे असें मनांत येतें. कित्येक कुत्र्यांच्या आंगावर केंस आंखूड व मऊ असतात, कित्येकांच्या आंगावर राठ व कुरळ असतात, व कित्येकांच्या आंगावर लांब असतात. कुत्र्यांचे रंग पुष्कळ प्रकारचे असतातं. सर्व जातींच्या कुत्र्यांची लांबी रुंदी उंची सारखी नसते; कोणाची थोडी, कोणाची मध्यम, कोणाची फार असते.

कुत्रा सुंदर, चलाख, आणि उल्हासी असून दुसरे चांगले गुण त्याच्या आंगीं पुष्कळ असतात.

पाळीव गुण.

कुत्र्याच्या मनांत धन्याच्या हुकमांत राहून त्याला खुश ठेवावें असें सर्वदा वागत असतें. सर्व पशूंमध्यें कुत्र्या सारखा शहाणा, समजदार, प्रामाणिक, आणि मायाळू असा दुसरा पशु नसेल. त्याचें लक्ष्य धन्याच्या तोंडाकडे व शब्दाकडे असतें. धन्यानें सांगितलेलें काम बिनदिक्कत लागलेंच करितो. तो नेहमीं सावध असतो; रात्रंदिवस धन्याचे दारीं पहारा करितो; धन्याची वस्तू कोणाला नेऊं देत नाहीं. परकी मनुष्य आला तर त्याच्या आंगावर धावतो. धन्यानें मारिलें तरी त्याचा राग मानीत नाहीं. परिचित मनुष्याचा शब्द ओळखितो. कुत्र्याला आठवण चांगली राहते. कुत्र्याला जें नांव ठेवावें तें त्याच्या लक्ष्यांत राहतें. कुत्र्याला जसें कसब शिकवावें तसें त्याला येतें. एखादी वस्तू मागें राहिली किंवा पडली तर तिचा शोध करायाला दूरपर्यंत माघारा जातो. सर्व कुत्र्याचें घ्राणेंद्रिय फार तिखट असतें. कोठें काय आहे, व कोण कोणीकडे गेलें हें त्याला हुंगण्यानें समजतें. कुत्र्याला स्वभावतः पोहतां चांगलें येतें. कुत्र्याचे ओरडण्यास भोंकणें म्हणतात; रागावून शब्द करितो त्याला गुरगुरणें म्हणतात; आणि दुःखानें ओरडतो त्यास केंकावणें म्हणतात.

जाती.

रानांतील कुत्रे कळप करून राहतात, आणि जमून पारध करितात. आफ्रिका खंडांतील रानकुत्रे गुरें, हरणें, मेंढरें यांस देखील मारून खातात. ते बबर थकणारे असतात; कांहीं केल्यानें सांपडत नाहींत.

भक्ष्य.

कुत्रे मांस खाणारे आहेत. कुत्र्याची जात खादाड फार जें खावें तें त्याला पचतें. कुत्रे झाडपाला कधीं खात नाहींत; त्याचें पोट दुखतें तेव्हां मात्र औषध म्हणून गवत खातात. कुत्रे खादाड आहेत तरी किती एक दिवस त्याला खावयाला मिळालें नाहीं तरी दिवस काढितात, पण पाण्यावांचून चालत नाहीं. पाणी थोडेंच पितात, पण वरचेवर प्यावयास पाहिजे. मांजराप्रमाणें ते जिभेनें पाणी तोंडांत घेतात. कुत्र्याची झोंप फार हलकी आहे, कांहीं खुट्ट झालें कीं ते लागलेच जागे होतात. ते निजायाचे वेळीं आंगाचें वेंटाळें करून निजतात.

पोरें.

कुत्री वर्षांतून दोनवेळां विते. तिला दरखेपेस चार पासून आठपर्यंत पिलें होतात. तीं होतात तेव्हां त्याचे डोळे मिटलेले असतात. ते पुढें दहा दिवसांनंतर उघडूं लागतात. त्यांस चालण्याची चांगली शक्ति येण्यास महिना दोन महिने लागतात, आणि ह्याच दोन महिन्यांत तीं लवकर वाढतात. कुत्र्याची पूर्ण वाढ होण्यास दोन वर्षे लागतात. कुत्र्याचें आयुष्य १० वर्षांपासून १४ वर्षांपर्यंत असतें. कुत्रे म्हातारे झाले म्हणजे मनुष्याप्रमाणें ते जराग्रस्त होतात.

उपयोग.

प्राचीन काळापासून कुत्रा मनुष्याच्या उपयोगीं पडत आला आहे. त्याचें घ्राणेंद्रिय तिखट असतें. तो पळणारा बलद व बळकट असतो, ह्यामुळें तो दुष्ट पशूंस शोधून काढून त्यांस मारण्याच्या कामांत फार उपयोगीं पडतो. हा मनुष्याचा हुकमी चाकर इतकेंच नाहीं, जिवलग मित्र म्हटला तरी चिंता नाहीं. हाच एक मनुष्याबरोबर पाहिजे तिकडे आनंदानें जाणारा प्राणी आहे.

कुत्र्याच्या जाती पुष्कळ आहेत. त्यांतील प्रत्येक जात भिन्नभिन्न प्रकारें मनुष्याच्या उपयोगीं पडत आहे. धनगरी कुत्रे मेंढरांचे कळप राखितात. उत्तर ध्रुवाकडील देशांतले कुत्रे बर्फावरून गाडी ओढण्याच्या कामीं पडतात. पाण्यांत पडलेल्या मनुष्यास काढण्याविषयीं पाणकुत्र्याप्रमाणें कांहीं जातींचे कुत्रे कामीं पडतात. मुलांचें किंवा घरांतील पदार्थांचें संरक्षण कुत्रे खडा पहारा करून करितात. शिकारी कुत्रे शिकार धरण्याच्या उपयोगीं पडतात. कांहीं देशाचे लोक कुत्र्याचें मांस खातात. रूस देशांत कुत्र्याच्या कातड्याचीं वस्त्रें करितात, व केंसांचीं भूषणें करितात. कुत्र्याचे आंगीं इतके गुण असतां मुसलमान लोक व हिंदुलोक कुत्र्याला शिवत देखील नाहींत.

धडा ६६.

मांजर.



रान मांजरें बहुत देशांत असतात. गांव मांजरें

कुळस्थान. हीं रानटी लोक खेरीज करून सर्व देशांत लोक बाळगितात.

बांवर दिसण्यांत चांगलें दिसतें. ह्याचें डोकें वाटोळें असतें; कान आखूड असून अणीदार असतात; शेपूट लांब असतें; आणि आंग लांब असून त्यावर

स्वरूप.

रेशमासारखे मऊ केंस असतात. ह्याच्या प्रत्येक पायाच्या पंज्याला पांच पांच नखें असतात; तीं त्याला हवीं तेव्हां बाहेर काढितां येतात व आंत नेतां येतात. ह्याच्या पायाचा तळवा अगदीं मासाळ व मऊ असतो. ह्याच्या वरच्या ओंठाला दोहों-कडे लांब लांब केंस असतात, त्यांना मिशा म्हणतात. ह्याचे डोळे मोठे व घारे असतात. ते रात्रीं अंधारांत हिऱ्यासारखे चमकतात. ह्याच्या डोळ्यांतली बाहुली दिवसास संकुचित होते, आणि बारीक रेषेसारखी दिसते; पण रात्रीं अंधारांत ती पसरून मोठी आणि वाटोळी होते. माजरें तोंडावरून पाहिलीं असतां तीं प्रामाणिकशीं दिसत नाहींत. मांजराचे रंग तऱ्हे तऱ्हेचे असतात; आणि बहुतकरून त्याचे आंगावर चमत्कारिक पटे किंवा ठिपके असतात. इराण देशांतील मांजरांच्या आंगावरचे केंस लांब लांब असतात. आशियामैनर प्रांतांत आंगोरा शहर आहे तेथील मांजरें फार सुंदर असतात. त्यांचा रंग पांढरा, स्वरूप शांत, व आंगावरील केंस लांब असून मऊ असतात.

रानमांजरांची मुद्रा धूर्त व भयंकर दिसते. तीं फार लबाड व खादाड असतात. तीं झाडांच्या ढोलींत किंवा डोंगराच्या कपारांत लपून राहतात. तीं रानांतील पक्षी, उंदीर, खडी, ससा, वगैरे लहान प्राण्यांस

गुण व चाली.

मारून खातात. तीं गांवाजवळ असलीं तर कोंबडीं बदकें वगैरे मारून खातात. तीं आपलें भक्ष्य मिळवायासाठीं रात्रीं

बाहेर हिंडतात. भक्ष्य त्यांच्या दृष्टीस पडलें म्हणजे मोठ्या शिताबीनें उडी घालून तें धरितात. मग त्याच्या आंगांत बळकट दात रोंवून त्याचा जीव घेतात.

पाळींव मांजराचाही आपलें भक्ष्य मिळविण्यास रात्रीं फिरण्याचा स्वभाव असतो. उंदीर वगैरे प्राणी सांपडला म्हणजे त्याचे हाल करून तें त्याचा जीव घेतें. उंदराच्या बिळाजवळ उंदीर धरण्यासाठीं टपत बसतें, व राघू, चिमण्या, पारवे, वगैरे पांखरें धरण्यासाठीं टपत बसतें, आणि तें आटोक्यांत आलें म्हणजे पटकन उडी मारून त्याला धरितें. मांजरें उंचावरून खालीं पडलीं वर पायांवर सांवरतात. मांजराला मळकटपणा अगदीं आवडत नाहीं. दुसरा उद्योग नसला म्हणजे हें, आपलें आंग साफ होण्याकरितां चाटीत बसतें. जेथें जीभ पोहोंचत नाहीं तो भाग जिभेनें पंजा ओला करून त्यानें साफ करितें. त्याला निजायाला मऊ व ऊबदार जागा पाहिजे. मांजरें जेव्हां उगीच बसतात तेव्हां मागला भाग भुईवर टेंकून व पुढला भाग पुढल्या पायांवर तोलून धरून बसतात, आणि शेपूट आपल्या ढुंगणाभोंवतालीं गुंडाळून घेतात. मांजराला पुष्कळ खायाला घातलें तरी त्याची चोरून खाण्याची खोड जात नाहीं. मांजरें भांडूं लागलीं म्हणजे रक्त निघेपर्यंत एकमेकांला ओरबाडतात व डसतात. लहानपणीं मांजर फार खेळकर असतें, पण जसजसें मोठें होतें तसतसें त्याचें खेळणें कमी होतें, व खादाडपणा, लबाडी, व रागीट स्वभाव हीं अधिक अधिक होतात. मांजराची खाण्यावर व सुखावर फार आसक्ति असते. तें मनुष्यापासून मिळतें म्हणून मांजर मनुष्याजवळ लगटून असतें.

मांजरें लहानपणापासून ज्या ज्या घरांत राहतात तें तें घर सोडून जाण्याचें त्याला कठीण पडतें. मांजराला खूण व आठवण चांगली राहते. * त्याला झांकून लांब नेऊन सोडिलें तरी तें माघारें घरास येतें. ओळखीचें मनुष्य पुष्कळ दिवसांनीं पाहिलें तरी तें त्याला व त्याच्या शब्दाला ओळखितें.. मांजराला दिवसास व रात्रीस सारखेंच दिसतें. याचें कर्णेंद्रिय व घ्राणेंद्रिय तिखट असतें.


भक्ष्य. रानांतील मांजरें मास मात्र खातात, पण पाळींव मांजरें मास खाऊन मनुष्याच्या खाण्याचे पदार्थही खातात. त्यांत दूध तर त्याला फारच आवडतें. दूध किंवा पाणी हें जिभेनें चाटून पितें. ओकून पाडण्यासाठीं कधीं कधीं गवतही खातें. मासांत उंदराचें मास मांजराला फार आवडतें.

पोरें. मांजराच्या स्त्रीला भाटी म्हणतात; आणि नराला बोका म्हणतात. भाटी वर्षांतून दोनदां किंवा तीनदां विते. तिला दर खेपेस चोहोंपासून सहापर्यंत पिलें होतात. त्यांचे डोळे नऊ दिवस झांकलेले असतात. बोका पिलें खातो, म्हणून भाटी कोठेंतरी एकीकडे जाऊन विते. ती पिलांस महिना दीडमहिनापर्यंत थान पाजिते; मग तीं अंमळ मोठीं झालीं म्हणजे उंदीर किंवा लहान पांखरूं मारून त्यांस आणून देते. भाटीला दहा थानें असतात. भाटीची आपल्या पिलांवर माया फार असते. बोक्याच्या भयानें ती पिलांचा वरचेवर थारेपालट करिते. मांजराची पूर्ण वाढ होण्यास अठरा महिने लागतात. मांजराचें आयुष्य दहाबारा वर्षें असतें.

उपयोग. मांजर घरांत बाळगिलें असतां उंदरांचा उपद्रव कमी होतो.

धडा ६७.

उंट.



अरबस्तानांतील उष्ण अरण्यें हीं उंटाचें मूलस्थान होत. तेथूनच ते सर्व आशिया खंडांत व आफ्रिका खंडांत पसरले. अरबी उंट, म्हणजे एक मदारीचे, हल्लीं रानांत कोठेंही स्वतंत्र सांपडत नाहींत. दोन मदारींचे उंट तार्तरी देशाच्या रानांत आणि हिंदुस्थान व चीन ह्यांच्या मधल्या रानांत स्वतंत्र आहेत असें म्हणतात.

मूलस्थान.

उंट हें जनावर मोठें असतें; पावलापासून खांद्यापर्यंत त्याची उंची सुमारें आठ विती असते. त्याचें डोकें लहान असून कान आखूड असतात; मान बारीक व लांब असून कमानदार असते; शरीर लांबट असून सडपातळ असतें, आणि पाय कांहींसे बारीक असतात; पाऊल पसरट असून त्याला दोन गेळें असतात; प्रत्येक गेळाच्या शेवटीं एकेक नखी असते. पावलाच्या तळाचें कातडें बळकट व लवचीक असतें. उंटाच्या चार पायांवर मिळून सहा घट्टे असतात, व उराला एक घट्टा असतो; उंट बसतांना ह्या घट्ट्यांवर टेंकून बसतो. त्याच्या पाठीवर जो उंचवटा असतो त्याला मदार म्हणतात.

स्वरूप.

उंटाच्या आंगावर लोंकर असते; तिचा रंग पिंवळसर असतो. सैबीरिया देशांत पांढऱ्या रंगाचे उंट असतात. ह्या जनावराची आकृति फार बेढब दिसते; मुद्रा पाहिली तर शांत दिसते.

गुण.

उंटास तहान भूक सोसण्याची पुष्कळ शक्ति असून तो मनुष्याच्या कह्यांत वागतो. त्याच्या आंगीं चातुर्य-ही बरेंच असतें. त्यानें वाळूच्या मैदानांतून व निर्जल प्रदेशांतून चालावें असा ईश्वरी संकल्प असल्यामुळें पुष्कळ कष्ट सोसण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य आहे. भुसभुशीत वाळवेंतून व तापलेल्या माळरानांतून चालावयाजोगे त्याचे पाय देवानें केले आहेत. त्याला आपल्या नाकपुड्या मिटतां येतात, ह्यामुळें रानांतील उडालेली वाळू त्याच्या नाकांत शिरत नाहीं. त्याच्या पोटांत अन्न राखून ठेवण्याजोगी जागा असते, ह्यामुळें तो त्या जागीं ठेविलेलें अन्न पाहिजे तेव्हां तोंडांत आणून चघळीत म्हणजे रवंथ करीत असतो. एक तासांत खाल्लेलें अन्न त्याला चोवीस तासपर्यंत पुरतें. त्याच्या पोटांत एक पाण्याची जागा चमत्कारिक आहे, तींत तो पाणी सांठवून ठेवितो; ह्यामुळें त्याला शेंकडों कोस पाणी प्याल्या शिवाय चालण्याचें कठीण पडत नाहीं. ह्याला सात आठ दिवस पाण्यावांचून व चार पांच दिवस अन्नावांचून राहतां येतें. मोठालीं ओझीं कांवर घेण्याची उंटाच्या आंगीं शक्ति असते. सांडणी दररोज तीस चाळीस कोस चालतात. उंटाची चालण्याची रीत इतर जनावरांच्या चालण्यांच्या रीतीहून निराळी आहे.

उंटाची उपजीविका केवळ झाडपाल्यावर होते. उंट रवंथ

भक्ष्य. करितो. राठ व कांटेरी झाडें त्यास फार आवड-तात. जेथें झाडपाल्याचें दर्शन नाहीं अशा ओसा-ड रानांत सातूच्या भाकरी, खेवडे, वगैरे ह्यावर त्याचा निर्वाह होतो. त्याच्या पोटांत चार पिशव्या असतात.

पोरें. उंटीण फळल्यापासून बारा महिन्यांनीं विते. तिला दर खेपेस एकच पोर होतें. पोर बारा महिनेपर्यंत आईचें दूध पितें. उंटाची पूर्ण वाढ होण्यास पांच वर्षें लागतात. उंट बहुतकरून चाळीस पन्नास वर्षांपर्यंत वांचतो.

उपयोग. जे देश उंटाच्या प्रकृतीला मानतात त्या देशांत उंट जितका मनुष्याच्या उपयोगीं पडतो तितका दुसरा कोण-ताही पशु पडत नाहीं. ओझीं वाहणारीं जनावरें पुष्कळ आहेत, त्यांमध्यें आफ्रिका व अरबस्थान येथील तापले-ल्या वाळूच्या रानांतून शेंकडों कोसांच्या मजला मारण्यास उंटावांचून दुसरें कोणी समर्थ नाहीं. अरब लोक मानितात कीं, आपल्या देशांत उंट आहेत हा ईश्वरानें आपणास मोठाच प्रसाद दिला आहे. ते असें समजतात कीं, आपल्या देशांत उंट नसते तर आपली उपजीविका न होती, आपला व्यापार न चालता, आणि आपणास घरा बाहेर जातां न येतें. ते उंटा-ला अरण्यनौका असें म्हणतात.

अरबस्तानांतील सर्व लोक उंटिणीचें दूध पितात, उंटाचें मांस खातात, व उंटाचे केंसाचीं वस्त्रें करितात. अरब लोकां-जवळ उंट आहेत त्यामुळें त्यास कोणत्याही गोष्टीचा तोटा असून त्यास कशाचेंहि भय वाटत नाहीं. त्यांना अरबस्ताना-

कान्या मोठ्या अरण्यांतून एके दिवसांत उंटावरून ७५ कोसांची मजल मारितां येते. ह्यामुळें शत्रु त्याचा पाठलाग करीत असले तरी त्याच्या हातीं ते लागत नाहींत. कितीएक देशांत उंट बसावयासाठीं तयार करितात. लष्करी सामान, डेरे, राहुट्या, वगैरे वाहून नेण्याच्या कामास उंट फार उपयोगाचे आहेत. तार्तरी देशांत उंट गाडीला जुंपतात. कितीएक ग्रंथकार असें लिहितात कीं उंटाच्या अंगीं जे गुण आहेत त्यां विषयीं विचार केला असतां असें समजून येईल कीं मनुष्याच्या ताब्यांत जितकीं जनावरें आहेत त्यां सर्वांमध्यें मनुष्यास सर्व प्रकारें उपयोगीं पडणारें जनावर उंटाप्रमाणें कोणतेंच नाहीं. हत्ती घोडे ह्याहून उंटाची योग्यता कमी म्हणतां येत नाहीं. हें जनावर थोडें अन्न खाऊन काम फार करितें.

धडा ६८.

मुलांस उपदेश.

श्लोक.

असा तुला छंदच खेळण्याचा ॥
मऊ बिछान्यावर लोळण्याचा ॥
कशी तुला वाटत लाज नाहीं ॥
सदा हंसावें तुजला जनांहीं ॥१॥
मुलांनो तुम्हीं सर्व हा खेळ सोडा ॥
मनीं काळजी बाळगा ज्ञान जोडा ॥
असा[१४१] काळ कैसा तुम्हांला मिळेल ॥
पुढें[१४२] दुःख होतां तुम्हांला कळेल ॥२॥

आर्या.

तुमचें वय हें आहे, केवळ विद्या शिकून असण्याचें ॥
चित्तीं धरूनि ऐसें, टाकुनि यावें हगीच फिरण्याचें ॥३॥

श्लोक.

चांगल्या सर्व संगती धरीं ॥
त्यामुळें जगीं मान्यता खरी ॥
अन्यथा तुम्हा कोण मानिल ॥
योग्यता जगीं कैशि होइल ॥ ४ ॥
धरूं नका तुम्ही दुष्ट वाट[१४३] ती ॥
जरि तुम्हास ती गोड वाटती ॥
करिल नाश ती हें धरा मनीं ॥
करूं नका हसूं[१४४] आपलें जनीं ॥ ५ ॥
स्मरा नित्य देवा करा मातृसेवा[१४५] ॥
धरा सुस्वभावा[१४६] त्यजा वैरभावा[१४७] ॥
असें केलिया सौख्य तुम्हास आहे ॥
म्हणूनीच मी नित्य बोधीत[१४८] आहें ॥ ६ ॥

आर्या.

उपदेश हा ठसूंद्या, तुमच्या चित्तावरीच बळकटसा ॥
नाहीं पक्षीं तुमचा, होय श्रम[१४९] आमचाहि फुकट तसा ॥ ७ ॥

धडा ६९.

परस्पर प्रीती विषयीं उदाहरण.

आर्या.

एक्या लहान काळ्या, मुंगीला गवसला[१५०] बहु थोर ॥
दाणा गोधूमाचा,[१५१] परि उचलेना जरी करी जोर[१५२] ॥ १ ॥
तेव्हा दैवें तीच्या दृष्टी पडला तिचाच शेजारी ॥
पाहुनि म्हणे तयाला, गेहा[१५३] न्यायास दे मदत भारी ॥ २ ॥
माझें आहे मजला, कार्य[१५४] पहाया असें वदे तोंडें[१५५] ॥

आणि म्हणे इच्छिसि जरि, ने ने तो तूंच आपुल्या घोरें ॥३॥
ऐसें वदूनि चालू झाला तो दुष्टबुद्धि अति गैर[१५६] ॥
धावतधावत गेला, अपुल्या गेहीं निजावया स्वैर[१५७] ॥४॥
इतुक्यामध्यें दुसरी, मार्ग क्रमिता[१५८] पिपीलिका आली[१५९] ॥
गेली मदत कराया, संकटें पाहूनि आपली आली[१६०] ॥५॥
पोंचवि तिला तिच्या त्या, गोधूमा सह गृहास नेऊन ॥
दाखवि सुजनपणातें, ऐशा मोठ्या श्रमास घेऊन ॥६॥
ज्याच्या ज्याच्या श्रवणीं[१६१], पिपीलिकेची पडेल ही गोष्ट ॥
ते हालवुत[१६२] कराया, बाळातें बोध आपुले ओष्ठ ॥७॥
ती सुस्वभाव मुंगी, गेली साह्यास जी स्वइष्टातें ॥
बोध करो बाळांतें, जो होइल मान्य सर्व शिष्टातें ॥८॥
जर करिती प्रेमातें, परस्परें जीव जंतु अति नीच ॥
तर पाहिजे शिशूंच्या, मध्यें ती प्रेमबुद्धि असलीच ॥९॥

धडा ७०.

पद.

क्षणभंगुर[१६३] संसार[१६४] ॥ गड्यांनो, क्षणभंगुर संसार ॥ध्रुवपद॥
धनविद्येचा गर्व कशाला ॥ माथां घ्यावा भार ॥१॥ गड्यांनो,
मानवदेहीं येऊनि जन्मा ॥ पूर्ण करा सुविचार ॥२॥ गड्यां०,
ऐहिकविषया[१६५] साठिं कशाला ॥ फिरतां दारोदार ॥३॥ गड्यां०,
इहलोकींचे तुच्छ मनोरथ ॥ तेहि नपडती पार[१६६] ॥४॥ गड्यां०,
धनसुतदारा सक्त न व्हावें ॥ जाणा सर्व असार[१६७] ॥५॥ गड्यां०
माझें माझें म्हणतां त्याचा ॥ कोण करिल अधिकार[१६८] ॥६॥ ग०,
गुरुचरणाला शरण रिघावें ॥ तोचि तुम्हां आधार ॥७॥ ग०,
हें मज कळलें म्हणुनि सांगतों ॥ तुम्हांस वारंवार ॥८॥ गड्यांनो०॥

तिसऱ्या पुस्तकांतील कवितांमधील कठीण शब्दांवर टिपा.

१ आशा.
२ कृपासागरा.
३ वाईट.
४ इच्छा.
५ आटोपून धर.
६ रक्षितोस.
७ पोशितोस.
८ सांगतोस.
९ तारितोस.
१० संभाळावयास
११ जगाला.
१२ सामर्थ्य.
१३ हे ईश्वरा.
१४ सर्वत्र ज्याची शक्ति चालते असा.
१५ सर्व पाहणारा
१६ जाणूं शकतो.
१७ वर्णवेल.
१८ नाहीं.
१९ ईश्वरप्राप्तीचा
२० आश्रय.
२१ आहेस.
२२ परिणाम.
२३ बरोबर.
२४ उघड्या पायांनीं.
२५ जी गोष्ट घडली नाहीं ती घडली म्हणणें.
२६ दुसऱ्याचा करार आपण पुराकरणारा.
२७ दुसऱ्याचें वस्तु.
२८ दुसऱ्याचे जवळचें पाहिलें जें वस्तु तें.
२९ शब्द.
३० नमावें.
३१ मनापासून.
३२ आईबापाची.
३३ उभें राहूंनये.
३४ नेमलेल्या.
३५ विद्यारूप वृक्षासं-
३६ विद्यावृक्षाचें.
३७ नमन.
३८ धंदा.
३९ स्तवन.
४० मनुष्याची.
४१ योग्य.
४२ मनुष्य.
४३ शब्द.
४४ ऐकतों.
४५ पायांनीं.
४६ जिभेनें.
४७ गोडी.
४८ वाणीनें.
४९ अनेकप्रकारचें.
५० विसावा.
५१ सुखानें.
५२ अस्तित्वानें किंवा शक्तीनें.
५३ उगवतो.
५३॥ वाहतो.
५४ आकाशात.

५५ झाडें वेली.
५६ वर्षाकाळीं.
५७ वाहुन्याः
५८ ईश्वराची.
५९ अज्ञान
६० आहेस.
६१ क्रोध.
६२ रक्षिता.
६३ हे ईश्वरा.
६४ उत्पत्ति.
६५ विद्यारूप धनाची.
६६ मोठेपणा.
६७ सांगितल्या वांचून.
६८ शोभादेणारें वस्तु.
६९ रत्नें सोनें यांची.
७० गाढव.
७१ माकड.
७२ पुष्कळ अलंकारानी.
७३ उत्पन्न केला.
७४ ब्रह्मदेवानें.
७५ विद्याहीन.
७६ देववत नाहीं.
७७ महत्व.
७८ या लोकीं.
७९ स्वर्ग लोकीं.
८० पशुतुल्य.
८१ विद्याविहीनाला.
८२ अंगीकारावी.
८३ मूर्खपणा.
८४ लोकमान्य.
८५ निरंतर.
८६ मोठा प्रवाह.
८७ वाहील.
८८ धन.
८९ अभिमान.
९० द्रव्याचा.
९१ व्यर्थ.
९२ धन.
९३ चिरकाळ.
९४ देहाचें.
९५ थोडावेळराहणारा
९६ आपलें बरें.
९७ कल्याणप्रद.
९८ हितासारखीं.
९९ शेवटीं.
१०० दुष्ट.
१०१ आपल्या बऱ्या करितां.
१०२ चांगल्या गोष्टीला.
१०३ अनुसरावें.
१०४ आपलें मन.
१०५ दुसऱ्याच्या दुःखाला.
१०६ भुकेला जो त्याला.
१०७ भ्याला जो त्याला.
१०८ धैर्य.
१०९ देशोदेशीं फिरणें.
११० विद्वानाशीं सख्य.
१११ राजसभेंत गमन.
११२ अनेक शास्त्रांची माहिती.

११३ आपणाहून श्रेष्ठ.
११४ गरिबांवर.
११५ क्रोध करील.
११६ क्षमा.
११७ स्वीकारावी.
११८ सेवकावर.
११९ संपत्तिआल्यामुळें गर्विष्ठ.
१२० मोठ्या अधिकारास.
१२१ सहनशीलता
१२२ दारिद्र्य किंवा संकट.
१२३ संपत्ति.
१२४ संपदा.
१२५ नाखुष.
१२६ पाऊस.
१२७ ऊन्ह.
१२८ झाडें.
१२९ वृक्षाखालीं जे राहिले त्यांस
१३० मनात.
१३१ गर्वाचें ओझें.
१३२ डोकीवर.
१३३ परांचें धन व पराची स्त्री.
१३४ वांछा.
१३५ पोषण.
१३६ मीपणा.
१३७ मुंगी होऊन साखर खावी.
१३८ चांगलें कर्म.
१३९ देवाच्या चरणावर
१४० हे तीन जगाच्या धण्या.
१४१ बाळपणाचा.
१४२ पूर्व वय गेल्यावर.
१४३ वाईटचाल.
१४४ फजिती.
१४५ आईची सेवा.
१४६ चांगला स्वभाव.
१४७ द्वेषबुद्धि.
१४८ सांगत आहे.
१४९ तुमचा ऐकण्याचा श्रम व आमचा सांगण्याचा श्रम फुकट.
१५० सांपडला.
१५१ गव्हाचा.
१५२ बळ.
१५३ घरास.
१५४ काम.
१५५ गर्वानें.
१५६ मूर्ख.
१५७ स्वच्छंदानें.
१५८ चालतांना
१५९ मुंगी.
१६० मैत्रीण.
१६१ कानीं.
१६२ बोलोत.
१६३ क्षणात नाहींसा होणारा
१६४ प्रपंच.
१६५ या लोकचे विषय अन्न वस्त्रादिक.
१६६ सफल होत नाहींत.
१६७ क्षणिक.
१६८ कोण धनी होईल.